१९३६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५२१.

फ़िकेट परीक्षा सन १९३८ करितां

मननपूर्वक मार्मिक अध्ययनासाठीं मंजूर झालेले

# मराठी गद्य वेंचे.

संपादक,
बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.
हेडमास्तर, स्टेट हायस्कूल,
मुरुड-जंजिरा.

REFBK-0003023

...न किताबखाना, पुणें

किंमत बारा आणे.

१९२८ च्या S. L. परीक्षेस

मननपूर्वक मार्मिक अध्ययनासाठीं मंजूर झालेले

# मराठी वेंचे.

(गद्य)

3023

संग्राहक

बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.,

हेड मास्तर, हायस्कूल, मुरूड जंजिरा.

नवीन किताबखाना, पुणें.

१९२७.

REFBK-0003023

किंमत १२ आणे.

प्रकाशकः—

**विद्याधर हरि दामले,**

मालक, नवीन किताबखाना, पुणे.

मुद्रकः—

**लक्ष्मण भाऊराव कोकाटे,**

३००, सदाशिव पेठ, पुणे.

All rights reserved by the Publisher.

# प्रस्तावना.

या पुस्तकांतील वेंचे हायस्कुलांतलि वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांकरितां निवडलेले आहेत. यांत जुन्या बखरींच्या भाषासरणीचे नमुने म्हणून दोन वेंचे समाविष्ट केले आहेत, परंतु बाकीचे सर्व उतारे आधुनिक लेखकांच्या ग्रंथांतील घेतले असून, आधुनिक मराठीचें स्वरूप त्यांत बिंबलेलें आहे.

वेंचे निवडतांना सामान्यत: असें धोरण ठेविलें आहे, कीं, नैतिक, सामाजिक, धार्मिक, व ऐतिहासिक, बाबतींत विद्यार्थ्यांचा जुने विचार व नवे विचार या दोहोंशीं परिचय व्हावा व त्यांच्या मनोवृत्तीस आणि बुद्धीस चालन मिळून स्वत: विचार करण्याची त्यांस स्फूर्ति व्हावी.

रा. श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोशी, न. चिं. केळकर, व वा. गो. आपटे यांनीं आपापल्या पुस्तकांतील वेंचे घेण्याची कृपेनें परवानगी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. तसेंच चित्रशाळेचे मालक रा. जोशी, व सुबोधपत्रिकेचे रा. वैद्य, यांनीं अनुक्रमें वा. आ. मोडक, व सर् रा. गो. भांडारकर, यांच्या कृतींतून उतारे काढण्यास थोर मनानें अनुज्ञा दिली, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों.

मुरुड जंजिरा,
१५।१।२६

वा. अ. भिडे.

# मराठी वेंचे.

## ( गद्य )

अनुक्रमणिका पृष्ठें


| | | |
|---|---|---|
| * | १ मागासलेल्यांचा उद्धार ( पूर्वार्ध ) | ... १– ४ |
| * | २ ,, ,, ( उत्तरार्ध ) ... | ... ४– ६ |
| * | ३ संपत्तीचा उपभोग ... | ... ६–१२ |
| | ४ दिगंबरचरित्र | ... १२–१५ |
| * | ५ सुखसंवाद | ... १५–१९ |
| * | ६ मराठे व इंग्रज | ... १९–२३ |
| | ७ निंदकाचे उपकार | ... २४–२६ |
| * | ८ अर्थशास्त्र व वेदान्त | ... २६–३० |
| | ९ अलंकारमीमांसा | ... ३१–३५ |
| * | १० जयाप्पा शिंद्यांची मारवाडवरील स्वारी | ... ३५–३९ |
| | ११ आतिथ्य ... | ... ३९–४० |
| | १२ ऐतिहासिक कादंबऱ्या ... | ... ४१–४४ |
| | १३ औरंगजेबाच्या दरबारांत ... | ... ४४–४९ |
| | १४ सन्मित्रांचा सत्कलह (पूर्वार्ध) ... ... | ... ४९–५२ |
| | १५ ,, ,, (उत्तरार्ध) ... ... | ... ५३–५६ |
| | १५ हरिद्वार. ... ... ... | ... ५६–६० |
| | १७ जातिभेदाची सध्यास्थिति ... ... | ... ६०–६३ |
| * | १८ काव्यरचना ... ... ... | ... ६३–६५ |
| * | १९ मुक्तेश्वरांची शिकवण ... ... ... | ... ६५–७१ |
| | २० विनोद ... ... ... | ... ७१–७८ |
| | २१ जयाप्पा शिंद्याचा खून. | ... ७४–७६ |
| * | २२ ईश्वराचें स्मरण ... ... | ... ७७–८० |
| | २३ माझ्या सासरची वडील मंडळी. ... | ... ८०–८४ |
| * | २४ सत्संगति ... ... ... | ... ८५–८७ |
| | २५ ज्ञानयोग व कर्मयोग ... ... ... | ... ८७–९० |
| * | २६ चरित्र. ... ... ... ... | ... ९१–९५ |


## परिशिष्टें.


१ ग्रंथकारांची त्रोटक माहिती. ... ... ... १–४

२ टिप्पणी. ... ... ... .... ... १–१९


* हे उतारे सन १९२८ च्या S. L परीक्षेस नेमिले आहेत.

# शुद्धिपत्रक.

| पृ. | ओ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ७ | १५ | इद्रियजन्य | इन्द्रियजन्य |
| २१ | १३ | मानवीपणा | मानभावीपणा |
| २७ | ११ | ग्रथ | ग्रन्थ |
| २९ | २३ | जीवनत्व | जीवनतत्त्व |
| ३० | ८ | फलावर्ली | फैलावर्ली |
| ४१ | ५ | पात्र | पात्रें |
| ४२ | २० | सवविदित | सर्वविदित |
| ४४ | ३ | कादबरी | कादम्बरी |
| ४७ | २७ | समार | समोर |
| ६१ | २८ | प्राचीन | अर्वाचीन |
| ६२ | २७ | राजरस्ता | राजसत्ता |
| ६६ | २७ | जे | गोष्टींविषयीं जे |
| | | धार्मिक | मार्मिक |
| ७३ | ११ | विनोदशालता | विनोदशीलता |
| ७९ | १३ | महात्म्यानें | माहात्म्यानें |
| ८३ | १६ | आकसनळी | आकसतळी |
| ८६ | २६ | मनुष्यामध्य | मनुष्यामध्यें |

# मराठी वेंचे.

## (गद्य.)

### १. मागसलेल्यांचा उद्धार. (पूर्वार्ध)

ज्या हमालपुऱ्यांत फुरसदीअंतीं जाण्याचा श्यामसुंदराचा परिपाठ असे, त्यांत राहणारे लोक बहुधा स्टेशनावर आणि कापसाच्या गांठी बांधण्याच्या व सरकी काढण्याच्या कारखान्यांत कामावर असत. ते बहुधा अगदीं निरक्षर व व्यसनासक्त असत. त्यांची पैदास इतर मजुरांच्या मानानें बरीच मोठी असे; पण तिचा बहुतेक भाग ते मद्यपानासारख्या व्यसनांत फरत करून टाकीत. दारूप्रमाणे विड्या ओढण्याचें व्यसनही त्यांजमध्यें फैलावलें होतें. व्यसन जडण्यास रिकामटेकडेपणाच बहुधा कारण होत असतो, हें जाणून श्यामनें हमालांचीं मनें गुंतवून टाकण्याकरितां एक भजनाचा अड्डा सुरू केला. तेथें श्याम रोज रात्रीं दोनदोन चारचार घटका प्रार्थनासंगीतांतील पदें म्हणत व त्यांची इतरांना संथा ेत बसत असे. श्यामचा स्वर त्याच्या मुखाप्रमाणेंच अत्यन्त मधुर असे. ो गाऊं लागला म्हणजे अडाणी हमाल नागाप्रमाणें डोलूं लागत व ाच्या स्वरास फारच उठाव मिळून तो, पार्थिव द्रव्यांत मध्येंच दिसून गाऱ्या सोन्याच्या थराप्रमाणें, किंवा काळ्या ढगांतून चमकणाऱ्या शुल्लतेप्रमाणें अत्यन्त चित्ताकर्षक वाटे.

थोडयाच दिवसांत एक बराच मोठा भजनी मेळा तयार झाला, व ाचें भजन ऐकण्याकरितां गर्दीही बरीच जमूं लागली. या मेळ्याच्या 'पयोगाकरितां श्यामनें मुंबईहून प्रार्थनासंगीताचीं पुस्तकें मागविलीं. या पुस्तकांत प्राचीन व अर्वाचीन कवींच्या अत्यन्त प्रेमळ गीतांचा ंग्रह होता. तीं श्यामच्या कंठांतून निघूं लागलीं कीं, श्रोत्यांचीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 3023

चित्तें भक्तिरसानें उचंबळून येत, व त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु वहावयास लागत.

" तूं माझी माउली, मी तुझें लेंकरूं ।
नको पान्हा चोरूं विठाबाई ॥ "
" बाळ जाणेना मातेसी ।
तिचें मन बाळापाशीं ॥ "

अशा ज्या अभंगांत ईश्वरास आईची व भक्तास तिच्या अर्भकाची उपमा दिलेली आहे, ते म्हणतांना सुंदराबाईची आठवण होऊन श्यामचा कंठ दाटून येई; व त्याच्या डोळ्यांतून अश्रुबिंदु वाहूं लागत.

श्यामला प्रार्थनासंगीताच्या पुस्तकांतून रोज नवीन नवीन मधुर व प्रेमळ पदें काढतांना पाहून, त्याच्या श्रोत्यांना त्या पुस्तकाबद्दल फारच कुतूहल वाटूं लागलें. या अमृताच्या ठेव्याची किल्ली हस्तगत करून घेण्याची इच्छाही अनेकांना झाली. केवळ एका महिन्याच्या अभ्यासानें त्या पुस्तकांतील पदें आपणास वाचितां येतील, असें श्यामकडून कळतांच, त्यांनीं लिहिण्यावाचण्याकडे रोज दोनदोन तास देण्याचें ठरविलें. दुसऱ्याच दिवशीं रात्रीचा वर्ग स्थापन झाला. त्यांत, आरंभींच पन्नास पाऊणशें विद्यार्थी जमा झाले. त्यांचा शिक्षक श्याम हा सर्वांच्या मानानें अगदीं अल्पवयस्क दिसे. ज्याप्रमाणें आगगाडीच्या डब्यांस ओढून नेणारें एंजिन त्या सर्वांपेक्षां लहान दिसतें, त्याप्रमाणें श्यामचा देह त्याच्या शिष्यांच्या धिप्पाड देहांपुढें अगदींच किरकोळ दिसे. त्यांपैकीं कित्येकजण इतके उंच होते कीं, त्यांना शासन करण्याकरितां त्यांच्या श्रीमुखांत भडकावण्याचें श्यामला कारण पडलें असतें, तर त्याला उडीच मारावी लागली असती. परंतु तो प्रयोग त्यास कधींच करावा लागला नाहीं. ते सारे विद्यार्थी स्वेच्छेनें शिकावयास गोळा झाले होते. त्यांस उचलबांगडी करून जुलमानें शाळेंत आणून बसविलें नव्हतें, तर त्यांच्या मनांनींच उचल खाऊन त्यांस तेथें खेंचून आणिलें होतें. शिवाय, अनेक वर्षांच्या संवयीनें परिश्रम व मनाची एकाग्रता करणें, हें त्यांच्या अंगवळणीं पडून गेलें होतें. त्यांची समजूतही बालपणांतल्या-

पेक्षां बरीच वाढली होती. यामुळें त्यांची लहानपणची तीव्र बुद्धि बोथट झाली असतांही तिचा ज्ञानांत सपाट्यानें प्रवेश होऊं लागला.

श्यामचें शिकविणेंही सुलभ व ज्ञानग्रहणास अनुकूल असेंच होतें. निर्बुद्ध म्हणून गाजलेला विद्यार्थी प्रौढपणीं गुरु झाल्यास तीक्ष्ण बुद्धीच्या शिक्षकांपेक्षांही अधिक कीर्ति संपादन करितो, हा नेहमींचा अनुभव आहे. याचें कारण असें असतें, कीं, जड बुद्धीच्या विद्यार्थ्यास कोणता विषय कठीण व कोणता सुलभ हें जसें कळतें, तसें तरल बुद्धीच्या विद्यार्थ्यास कळत नाहीं. दुसरें असें कीं, मंद बुद्धीच्या विद्यार्थ्यास जें ज्ञान पायरीपायरीनेंच करून घ्यावें लागतें, त्याचें आकलन पल्लेदार बुद्धीचा विद्यार्थी एका झटक्यासरसें करूं शकतो. शीघ्रग्रहण करूं शकण्याची ही प्रवृत्ति क्रमाक्रमानें ज्ञानदान करण्यास अत्यन्त प्रतिकूळ असते. उलट मंदधी मनुष्य ज्या क्रमानें विद्या शिकला, त्याच क्रमानें विद्यादान करणें त्यास अवघड जात नाहीं. हें बुद्धीसंबंधें झालें. मंद व तल्लख बुद्धींच्या गुरूंच्या स्वभावांमध्येंही ज्ञानदानास अनुकूल व प्रतिकूल अशा प्रकारचा फरक असतो. बुद्धिहीन गुरूस लहानपणीं बुद्धिमंद विद्यार्थ्यांच्या अडचणींचा पूर्ण अनुभव आला असल्यामुळें तो त्या अडचणींकडे क्षमाशील दृष्टीनेंच पहातो. उलट, हुशार शिक्षकास मठ्ठ विद्यार्थ्यांच्या प्रमादांची मीमांसा करितां न आल्यामुळें, तो त्या प्रमादांवर करडी नजर ठेवितो. श्याम बुद्धिमांद्यापासून उद्भवणाऱ्या सर्व दोषांकडे सहानुभूतिपूर्वक पहात असे. कोणत्याही विषयासंबंधानें एका स्पष्टीकरणानें शिष्यांची समजूत पडली नाहीं, तर तो विषय तो अनेकदां व विविध मार्गांनीं स्पष्ट करून दाखवी. त्याचे बहुतेक सारे शिष्य त्याचे व्यवसायबंधु असल्यामुळें तो त्यांस आदरानें वागवीत असे. त्याच्या सौम्य वर्तनावर व गोड स्वभावावर त्याचे विद्यार्थी इतके खूष असत कीं, ते वर्ग सुरू होण्याचे अगोदर किती तरी वेळ येऊन त्याची वाट पहात बसत. वर्गाचें काम संपल्यावर सर्व मिळून कांहीं वेळ भजन करीत; व नतर आदल्या दिवसापेक्षां अधिक संस्कृत बुद्धीनें व अन्तःकरणानें घरोघर परत जात. याप्रमाणें श्यामनें आपल्या अडाणी व्यवसायबंधूंना प्रथम गाण्याची गोडी लावून, नंतर त्याच्या द्वारें त्यांचा सरस्वतीच्या प्रांतांत

प्रवेश करविला. सरस्वती देवीचें ध्यान ज्यानें प्रथम कल्पिलें, त्याचा तिच्या हातीं वीणा देण्यांत विद्या व गायन यांचें साहचर्य प्रस्थापित करण्याचा हेतु होता कीं काय हें माहीत नाहीं; पण पशुकोटींतून मनुष्यकोटींत आणून पोहोंचविणारें गायन मनुष्यकोटींतून देवकोटींत नेऊन बसविणाऱ्या विद्येची पहिली पायरी आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

---

## २. मागसलेल्यांचा उद्धार. ( उत्तरार्ध )

वर्गांतील विद्यार्थ्यांस लिहिणें वाचणें व हिशेब ठिशेब येऊं लागल्याबरोबर श्याम त्यांजकडून इसापनीति, बाळमित्र, पंचतंत्र, इत्यादि सोपीं पुस्तकें वाचून घेऊं लागला. त्यांतील गोष्टी ऐकण्यास बरीच गर्दी होऊं लागली. केवळ दोन तीन महिन्यांचे अवधींत निरक्षर हमालांत केवढें आश्चर्यकारक रूपांतर घडून आलें, हें पहातांच इतरांसही अक्षरओळख करून घेण्याची तीव्र इच्छा झाली, व एका वर्गाचे लौकरच अनेक वर्ग करण्यांत आले. नवीन वर्गांवर शिक्षक म्हणून श्यामच्या पट्ट शिष्यांची योजना करण्यांत आली. व्यसनाप्रमाणें विद्याही सांसर्गिक आहे. तैलबिंदु पाण्यांत टाकला असतां जितक्या शीघ्रगतीनें भोंवतालीं पसरतो, तितक्याच शीघ्रगतीनें तैलबुद्धिहि आपल्या विद्येचा प्रसार भोंवतालच्या जडबुद्धीमध्यें करूं शकते शिवाय, श्याम प्रत्येक विद्यार्थ्यापासून त्यास शिक्षण देण्यापूर्वीं दुसऱ्या एकातरी इसमास आपणांप्रमाणेंच साक्षर करण्याची शपथ घेववीत असे. यामुळें गांवांत विद्येचा प्रसार भूमितिश्रेढीनें होऊं लागला. श्यामच्या वर्गांत केवळ प्रौढ वयाचेच विद्यार्थी शिकावयास येत असें नाहीं, तर दिवसा सरकारी शाळेंत जाणारीं मुलेंही रात्रीच्या वर्गांत सामील होऊन, त्यांत मिळणाऱ्या शिक्षणानें आपल्या ज्ञानांत भर टाकीत. सरकारी शाळांतून मिळणारें शिक्षण मुलांस पाजण्यांत येणाऱ्या वरच्या दुधाप्रमाणें असतें. मूल तें आनंदानें पीत नाहीं, व त्याच्या अंगीं तें नीट लागतहि नाहीं. उलट, स्वयंसेवकांनीं स्वयंप्रेरित विद्यार्थ्यांस दिलेलें शिक्षण अंगावरील दुधाप्रमाणें असतें. विद्यार्थी त्याचें हौसेनें सेवन करितात व त्यानें त्यांच्या मनास पोषणही मिळतें. हळूहळू मुलांबरोबर मुलीही श्यामच्या वर्गांत येऊं लागल्या व अनेक कुटुंबवत्सल

पिते आपल्या मुलांमुलींसह तेथें अध्ययन करतांना दिसूं लागले. ज्ञानलालसेंत कौटुंबिक प्रेमाची भर पडल्यामुळें संपादन केलेलें ज्ञान वज्रलेप होई. संसारांतील इतर प्रसंगीं कुटुंबीयांस परस्परांची मदत झाल्यानें त्या प्रसंगांची आठवण राहून त्यांचें परस्परांवरील प्रेम वृद्धिंगत होई, त्याप्रमाणें शिक्षणसंपादनांतहि त्यांचें परस्परांस साहाय्य होऊन त्यांचें ज्ञान व परस्पर प्रेम दृढ होत असे. आपल्या शिक्षणाचा दुसऱ्यास लाभ देण्याची शपथ मुलांप्रमाणें मुलींसही घ्यावी लागत असल्यामुळें त्या घरीं आपल्या मातांस ज्ञानदान करून जन्मदात्यांचें ऋण फेडूं लागल्या. जो श्याम ब्राह्मणजातींत शिक्षणानें मागसलेला होता, तो मराठ्यांच्या शिक्षणाचा याप्रमाणें एक अद्वितीय पुरस्कर्ता होऊन बसला.

शिक्षणाची जसजशी प्रगति होऊं लागली, तसतसें व्यसनाचें पाऊल सपाट्यानें मागें हटूं लागलें, व प्रत्येक कुटुंबांत अधिकाधिक सुखसमाधान नांदूं लागलें. कांहीं व्यसनी इसम अजून श्यामच्या वर्गापासून अलिप्त राहिले होते. त्यांचें व्यसन सोडविण्याचे कामीं त्यास बरीच दगदग व मानहानि सोसावी लागली. हें व्यसन बहुधा दारूचें असे. श्यामनें हमालपुऱ्यांतील प्रमुख इसमांचीं मनें वळवून त्यांजकडून व इतरांकडून मद्यपान न करण्याच्या शपथा घेवविल्या. शपथ मोडल्यास अपराध्यानें दंडादाखल एक भारी रक्कम द्यावी असें ठरलें. या दंडाच्या रकमा पुष्कळदां अपराध्यांकडून वसूल होत नसत. त्या श्याम आपल्या पदरच्या भरीत असे. अतिरिक्त मद्यसेवनानें बेहोष झालेल्या व रस्त्यांत लोळणाऱ्या इसमांस बाबापुता करून त्यांच्या घरीं बंदोबस्तानें पोंचवावें लागे. अशा प्रसंगीं श्यामला शिव्या व मारही सोसावा लागे. श्यामसारख्या सज्जन पुरुषास आपल्यामुळें किती त्रास सोसावा लागला हें त्या इसमास दुसऱ्या दिवशीं कळे. तेव्हां तो लाजेनें मरून चूर होई; व त्याची इतःपर आपल्या हातून अप्रतिष्ठा होऊं नये अशाबद्दल तो फार जपे. त्यांत त्यास पहिल्याच खेपेस आलें नाहीं, तरी दोनतीन खेपांत हटकून यश येई.

दारूबाजीसारख्या व्यसनांतून सुटका झाल्यामुळें मजूर लोकांपाशीं आतां थोडाबहुत द्रव्यसंचय होऊं लागला. तो छानछोकींत खर्च न होतां सार्थकीं लागावा म्हणून श्यामनें मजुरांची एक समाईक भांडवलाची

ताटावरचें पाटावर, पाटावरचें ताटावर; बसावयाच्या ठिकाणीं जिकडे पडावयाचा दील होईल, तिकडे तक्के, लोड, आहेतच; अंमळ इकडे तिकडे हिंडणें झालें, तर रथ, पालख्या, इत्यादि वाहनांची तयारी; वस्त्रें नेसवायास, पांघरावयास, सावरायास माणसें; स्नान घालण्यास, अंग चोळण्यास, हात धुण्यास, जेथें तेथें चाकर; बरें, इतकेंही होऊन तऱ्हेतऱ्हेची चाकरी घेतल्यामुळें झालेला शीण घालविण्यासच कीं काय, कोण जाणे;—निद्रासमयीं पाय चेपणें, अंग रगडणें, हें पुनः आहेच ! हा श्रीमंतीच्या सोहळ्यांचा नित्यक्रम. सुखाची परमावधि त्यांच्या व लोकांच्या मतें काय ती हीच. आपल्या भाषेंत ‘ सुखी ’ व ‘ श्रीमंत ’ हे शब्द तर पर्यायच होऊन बसले आहेत. यावरून प्रस्तुत विषयावर लोकांचीं मतें कशीं आहेत, हें दिसून येतें. मागील लोकांच्या श्रीमंतीचीं वर्णनें बहुधा सर्वांनीं ऐकिलीं असतीलच:— “ अहो, काय तो दैवशाली ! त्यास बाहेरचें ऊन कधीं माहीत नव्हतें, त्याच्या पायास कधीं खडा लागला नाहीं, कधीं पोटचें पाणी हललें नाहीं. अशी श्रीमंती त्यानें भोगली ! चारी ठाव चमचमीत भोजन करावें, आणि खुशाल निजावें. शेंकडों माणसें सेवेस तत्पर असतच. त्यास इकडचें तिकडे हालायासही लागत नसे ! वाः किती अपरंपार सुख हें हो ! पण याचा परिणाम लवकरच कसा होत असे हेंही येथें सांगितलें पाहिजे. गाड्या, घोडीं, पालख्या, यांनींच वाहनाचें काम सर्वथा पत्करल्यावर, मग ईश्वरदत्त जें वाहन, तें कशाला राहील ? तेव्हां पायांनीं जावें. शरीरांतील कोठ्यास नेहमीं पक्कान्नें पचवायाचीं, व व्यायाम म्हटला तर जेवतांना पानावरचा हात तोंडाशीं न्यायचा अशा प्रकारचा काय अवश्य घडेल, तेवढाच कायतो; तेव्हां अर्थातच पक्कान्नांनीं आपल्या आश्रित वर्गास—निरनिराळ्या रोगांस—निमंत्रण करावें ! याप्रमाणें लुले व रोगी बनल्यावर मग तर श्रीमंतीचे विलास अधिकच. यापूर्वी नुसते चाकरच सेवेस तयार असत, आतां आणखी त्यांत वैद्यही सामील व्हायचे ! आधींच राजश्रींचा आहार नाजूक; मग ही स्थिति प्राप्त झाल्यावर तर कांहीं पुसूंच नये. असो, याप्रमाणें निरंतर उपचार चालले असतां, शेवटीं अशी अवस्था प्राप्त होते कीं, सर्व श्रीमंतीच्या सोहाळ्यांचा त्यावे-

ळेस कळस होतो, कीं, इतःपर हालायास, चालायास, कांहींच नको!
—अरेरे, केवढें मूर्खत्व हें! केवढा वेडेपणा! ईश्वरानें हस्तपादादि जे अवयव दिले, ते आपल्या स्वाधीन ठेवून त्यांस दृढतर करायाचें टाकून मुद्दाम पराधीनपणा पत्करायाचा, हा एकेपरी मूर्खपणा; त्यांतून त्याचें आणखी भूषण मिरवायाचें म्हणजे तर त्याची सीमाच! कांहीं न करतां स्वस्थ पडून असणें हेंच जर श्रीमंतीचें स्वरूप, तर मग मनुष्याची अंत्यावस्था म्हणजे खरोखरी स्वर्गस्थितिच म्हटली असतां चालेल!

येथवर या समजुतीच्या मूर्खपणाबद्दलच लिहिलें. आतां हें क्रियाशून्यत्व वस्तुतः सुखदायक आहे, किंवा होणें शक्य तरी आहे काय, याविषयीं विचार करूं. रिकामपणीं सुस्त बसल्यापासून किती वेळपर्यंत सुख होतें, याचा अनुभव बहुधा प्रत्येकास असेल. याचें थोडेंसें उदाहरण घेतों. आठपंधरादिवसांची, किंवा महिन्या दोन महिन्यांची सुट्टी आली असतां विद्यार्थ्यांस पहिल्यानें केवढा आनंद होतो! त्यांस वाटतें कीं, इतके दिवस आतां खुशाल घरीं बसावयास व मौज मारावयास सांपडेल! असें वाटून, पहिले चारपांच दिवस त्यांस फार बहारीचे वाटतात; पण पुढें लागलीच असा कंटाळा येऊं लागतो कीं, दिवस जातां जात नाहींत; आणि शेवटीं शेवटीं इतका त्रास आलेला असतो कीं, पुनः शाळेंत जाण्याच्या दिवशीं सर्वांस मोठी हुशारी वाटते. या पोरपणाच्या अनुभवांत सर्व सुखदुःखाची किल्ली आहे! नुसतेंच सुख असा कांहीं पदार्थ नाहीं. तें असण्यास दुःखाचा अनुभव वागत असला पाहिजे. जोंवर पोटांत भूक आहे, तोंवरच जेवणाचें सुख, ताहान आहे तोंवरच पाणी पिण्याचें, थंडी आहे तोंवरच उष्णतेचें, उकाडा होत आहे तोंवरच शीतळ उपचाराचें. याप्रमाणें श्रम आणि विश्रांति हेंही द्वंद्व परस्पर सापेक्ष आहे. विश्रांतीचा अनुभव आहे, तोंवरच श्रम सुखदायक वाटतात, आणि श्रमाचा अनुभव आहे, तोंवरच विश्रांतीचें सुख भासतें. हें सर्व जर खरें आहे, तर उद्योग केल्यावांचून रिकामपणाच्या सुखाची आशा करणें आणि श्रम केल्यावांचून विश्रांतिसुख मिळवूं पाहणें, म्हणजे निरभ्र आकाशापासून वृष्टीची अपेक्षा करण्यासारखें असमंजस नव्हे काय? ताहानेल्यास पाणी सुखकर, उन्हांतून

आलेल्यास सावली गोड वाटते, म्हणून जर कोणी मनुष्य प्राणी पिण्यांत सुख आहे, येवढेंच घेऊन सारखा पाणी पीत बसला, किंवा सावली गोड वाटते येवढाच अर्थ उचलून सुखाच्या आशेनें निरंतर सावलींत बसला, तर आपण त्यास केवढा मूर्ख म्हणूं ? पण वर वर्णिलेला श्रीमंतीचा प्रकार थेट यासारखाच आहे, हें स्पष्ट आहे.

याप्रमाणें रिकामपण सुखास कितपत कारण व्हावें, याविषयीं विचार झाला. पण इतकेंच नव्हे, रिकामपणापासून महान् अनर्थही आहेत, हेंही पुढच्यावरून दिसेल. इंग्रजींत एक म्हण आहे, कीं "रिकाम्या मनांत सैतान आपला कारखाना घालतो" याचा अर्थ काय, कीं, मनुष्यास अगदीं रिकामपण सांपडलें, कीं, त्यास नाना प्रकारचे कुमार्ग सुचतात. हें ठीकच आहे; कारण मनुष्याच्या शरीरांतले व्यापार जसे कधीं खळत नाहींत, त्याचप्रमाणें त्याच्या मनाचेही सारखे चाललेले असतात. एरवींच्या मनुष्यांचे ईश्वराच्या योजनेनेंच शरीराचे व मनाचे व्यापार सदोदित चालू राहतात; कारण श्रमाशिवाय चारितार्थच न चालल्यानें त्यांच्या दोहोंचाही चाळा नेहमीं चालू असावा लागतोच. पण श्रम न करितांही कांहीं थोडया लोकांचें चालतें. तेव्हां अर्थात्‌च त्यांचें शरीर व मन हीं दोन्ही इतरांच्या मानानें व्यापारशून्य राहतात. पण अगदीं व्यापार नाहीं, अशी मनाची अवस्था कधींही असूं शकत नाहीं. यास्तव सहजच नाना तऱ्हेचे ढंग व व्यसनें त्यांस जडतात. तीं पैशाच्या जोरावर चालली जातात आणि तशा प्रकारची मंडळी लवकरच त्यांभोंवतीं जमते. अशी एकदां कुमार्गाकडे प्रवृत्ति होऊन निरंतर तोच ध्यास लागल्यावर मग काय विचारावें ?

आतां आणखी एक मात्र संपत्तीचा उपभोग सांगणें राहिला. तो धर्म होय. यास उपभोग म्हणणें सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण उपभोग म्हणजे सुख हाच अर्थ जर आहे, तर धनाचा विनियोग धर्माकडे करणें, हाही त्याचा उपभोगच होय. कां कीं, धर्म करणारास त्यापासून फार समाधान वाटतें. वास्तविक पहातां संपत्तीचा अत्यंत थोर उपयोग म्हणजे ती परोपकारीं लावणें हाच होय; यास्तव तशा महात्म्यांस अशा विनियोगानें जें चित्तास सुख होत असेल, त्यास दुसऱ्या कशाची उपमा साजा-

नों: नं. ......


णार नाहीं. परकीय भूषणांनीं आपलें शरीर लेववून त्यांत संतोष मानणें ही प्राकृत जनांची कोती समजूत होय; तिचें सुख केवळ नेत्रांनींच घेणें हा अत्यंत मूढ व नीच जो प्राणी कृपण त्याचा प्रकार; आणि धनाचा व्यय केवळ स्वार्थपरैक बुद्धीनें विषयभोगांकडेच करणें व त्याच्या जोरावर अनेक अनन्वित कृत्यें करणें, हें तर मानवजातीस कलंक लावणाऱ्या पशूंचें व राक्षसांचें कर्म होय! सत्पुरुषांच्या हातून संपत्तीचा वेंच फार निराळ्या तऱ्हेनें होतो. भर्तृहरि म्हणतो—

श्रोत्रं श्रुतेनैव न कुंडलेन
दानेन पाणिर्नतु कंकणेन ।
विभाति कायः करुणापराणां
परोपकारैर्न तु चंदनेन ॥

तेव्हां हाच उपभोग—प्रकार सर्वांत श्रेष्ठ होय, हें उघड आहे. पण धर्म करण्यांत एका गोष्टीकडे अवश्य लक्ष्य पोंचवावें लागतें; ती गोष्ट पात्रापात्रत्वविचार होय. जर पात्रीं दान घडलें तरच तें उत्तम; नाहींतर, उलटा दाताच दोषांत पडतो. आतां अलीकडे पात्रापात्रत्वाविषयींचे विचार पहिल्यापेक्षां चांगले झाले आहेत, हें सर्वांस माहीत आहेच. त्याविषयीं विशेष लिहिणें नको. यापूर्वीं ब्राह्मणांची—विशेषतः भटांची—सर्वथा भर करण्यांत लोक पुण्य मानीत असत; पण आतां समदृष्टीनें पाहतां, सर्व विपन्न मनुष्य सारखींच सत्पात्र आहेत, अशी उत्तम समजूत पहिलीच्या जागीं आली. पण या नव्या समजुतीनें धर्मबुद्धि वाढली, किंवा ती पहिल्या इतकीच राहून ती दुसऱ्या चांगल्या मार्गास लागली, असें मात्र दृष्टीस पडत नाहीं. दुष्काळादि कहरांत सांपडलेले हजारों लोक तर धर्मास अत्यंत पात्र ना? पण धर्माविषयीं सर्वांचीं मनें येवढीं सुधारलीं असतांही म्हणण्यासारखें दातृत्वाचें श्रेय कितीक घेतात? तेव्हां एकंदरींत पाहतां आमच्या नव्या लोकांची चाल ही दिसते कीं, पथ्यावर पडण्यापुरती मात्र ते सुधारणा उचलतात! असो; या धर्माच्या संबंधानें दुसरी अशीही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, मुळींच हातचा पैसा न सुटण्यापेक्षां कीर्तीच्याही हेतूनें धर्म झालेला बरा; पण तो खरा धर्म नव्हे; कां तर, तितका परोपकार कीर्तीसाठीं विकल्यासारखें

होतें. खरा धर्म तोच कीं, जो अंतःकरणाच्या कळवळ्यानें व निरपेक्ष बुद्धीनें केला असतो, व असाच त्या करणारास अत्यंत सुख देतो यांत संशय नाहीं.

निबंधमाला—विष्णु कृष्ण चिपळूणकर.

---

## ४. दिगंबरचरित्र.

दिगंबरपंतांची पसतिशी उलटली होती, आणि त्यांत आणखी ते अगदीं तरुणाप्रमाणें दिसत असत. त्यांना तीस वर्षे झालीं होतीं असें सुद्धां कोणास वाटणें शक्य नव्हतें. त्यांची अंगकाठी अगदीं बारीक. अंगांतील धडपड व वाचाळतेची तडफड हीं फार जबरदस्त. यामुळें ते सरासरी तीस वर्षांचे असावेत, असें पहाणारास वाटे. आणि तेही आपलें वय कधीं कोणास झटपट सांगत नसत. विचारणारा विचारीत असतां जसा प्रसंग असेल त्या मानानें त्यांचें वय कमी अधिक होत असे चाळिशी उलटून गेलेल्या लोकांत वसून भाषण चाललें असलें व वय अधिक असून शरीराची सर्वांगीण दृढता कायम राहाणें सुदैवाचें आहे, असें कोणीं म्हटलें तर दिगंबरपंत म्हणावयाचे, ' माझें वय एकूणपन्नास वर्षांचें; परंतु आपण तारुण्यांत जी मेहनत केली व कुस्त्या वगैरे मारल्या त्याचीं फळें आपलें शरीर, आरोग्य व बलदार्ढ्य हीं होत''. बरें, तरुण पंचविशीच्या अंमलांत असलेल्या लोकांत बसले असतां गोष्टी निघाल्या तर हे ' अरे, मी तुमच्यांतलाच आहें. एखाददुसरं वर्ष कमी अधिक'; असेंही म्हणण्यास तयार ! केव्हां प्रसंगविशेषीं ते तरुणांत वृद्धत्वाची घमेंड मारीत, केव्हां वृद्धांत तरुणपणाची बढाई झोंकीत. सारांश, त्यांचें भाषण बहुतांशीं वस्तुस्थिति सोडून देऊन प्रसंगोचितपणाकडे लक्ष्य देऊन चाले.

दिगंबरपंतांच्या वडिलांनीं चार पैसे कमावून बऱ्याच जमिनी व दोन चार घरें घेतलीं होतीं. शिवाय थोडाबहुत द्रव्य व सुवर्ण यांचा संचयही केला होता. इतक्या बेताचा कीं, दिगंबरपंतांनीं साधारण देखरेख केली म्हणजे त्यांस स्वतः एक कपर्दिकही न मिळवितां घरीं बसून चारचौघा

सुखवस्तु लोकांप्रमाणें संसार चालवितां यावा. त्यांच्या वडिलांची फार इच्छा होती कीं, दिगंबरपंतांनीं इंग्रजीचा चांगला अभ्यास करून बी. ए. एल्. एल् बी. व्हावें, निदान वकील व्हावें. याकरितां त्यांनीं शाळेव्यतिरिक्त मास्तर वगैरे ठेवून शिकविण्याची व्यवस्था केली. परंतु दिगंबरपंतांस त्या शिकण्याचें महत्त्व वाटेनासें होऊन ते सरासरी म्याट्रिक्युलेशनपर्यंत कसे तरी ढकलत ढकलत आले; आणि त्या परीक्षेच्या दोन वाऱ्या करून त्यांत हुकल्यावर त्यांनीं पुढें शिकण्याचें नाकारलें. तेव्हां "आहे, तो नाहीं शिकला तरी तो नीट राहिला तर त्याच्या पोटापुरतें; चारचौघांत अब्रूनें दिवस काढतां येतील इतकें आहे." असें म्हणून त्यांच्या वडिलांनीं त्यांना शिकण्याबद्दल आग्रह धरला नाहीं. धरला तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं हें ते पक्केपणीं जाणत होते. पुढें लवकरच दिगंबरपंतांचें लग्न झालें. बायको मोठी झाली आणि या सुमारास त्यांचे वडील वारून सर्व व्यवस्था दिगंबरपंतांच्या हातांत आली. ते व्यवस्था पाहूं लागले आणि द्रव्य हातून सुटूं द्यावयाचें नाहीं असा त्यांचा निर्धार असल्यामुळें त्यांचा संसारही नीट सुरू झाला.

पुढें दिगंबरपंतांस अशी इच्छा झाली कीं, आपण नुसते आपली शेतवाडी पाहून स्वस्थ बसतों, तें कांहीं बरें नाहीं; आपण कांहीं तरी लोकहिताचें कार्य हातीं घेऊन आपली कर्तृत्वशक्ति दाखवावी. कुचेष्टेखेरीज प्रतिष्ठा वाढत नाहीं. तेव्हां आतां कुचेष्टा कोणाची करावी म्हणजे आपल्याला आपली प्रतिष्ठा वाढवून घेतां येईल ? याचा त्यांनीं विचार करून सुधारक लोकांस त्यांनीं आपल्या बाणांचें लक्ष्य बनविलें. "या सुधारकांनीं सगळा सत्यनाश केला. यांनीं आमच्या धर्माची नासाडी मांडली. यांचा नायनाट केला पाहिजे;" असलीं भाषणें त्यांनीं सुरू करून व साधारणतः विद्वत्तेमुळें व लोकहिताविषयींच्या कळकळीमुळें लोक ज्यांना फार मानीत, त्यांना शिव्या देण्याचा यांनीं सपाटा चालविला. "आपण जरी बी. ए. झालों नाहीं, तरी आपल्याला इंग्रजी वाचनाचा नाद असल्यामुळें आपण मिल, स्पेन्सर, जॉन्सन, शेक्सपीअर वगैरे वाचले असून आपल्या प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या व कवींच्या पेक्षां ते किती तरी कमी दर्ज्याचे आहेत असें आपलें ठाम मत झालें आहे. त्याचप्रमाणें आपण

इंग्रजी व संस्कृत दोनही भाषांतील धर्मग्रंथांचें परिशीलन केलें आहे. तेव्हां आपल्या पुढे बोलण्याची कोणाचीच प्राज्ञा नाहीं;" असें ते फार जोरानें सांगत; आणि जें काय केलें पाहिजे तें जुन्या धर्माचें, जुन्या भाषेचें, जुन्या चालीरीतींचें पूर्ण संरक्षण केलें पाहिजे, असें ते ज्यास त्यास अट्टाहासानें प्रतिपादीत. जुन्या भटभिक्षुकांत तर स्वतःच्या इंग्रजी ज्ञानाविषयीं त्यांची इतकी घमेंड चाले कीं, त्यांचे श्रोते अगदीं थक्क होऊन जात. त्यांचीं धर्ममतें-त्यांचें धर्माचरण नव्हे हो ! -याप्रमाणें जुन्याच्या अभिमानानें तुडुंब ओथंबलेलीं होतीं. आणि या आपल्या मतांचें उद्घोषण ते रोज रात्रीं मोठ्या अट्टाहासानें करीत असत. त्यांचे घराचे समोरच एक पिंपळाचें फार मोठें झाड होतें. या झाडाखालीं एक मारुती होता. त्या मारुतीला यापूर्वीं कधीं कोणीं महत्त्व दिलें नव्हतें; परंतु आपल्या पेठेंतला हा मारुती आहे, त्याचें महत्त्व आपण राखलें पाहिजे, असें म्हणून त्यांनीं लोकांपासून वर्गण्या गोळा करून त्या मारुतीचें सरासरी चार पांच चौरस फुटांचें देऊळ बांधलें. ज्यांनीं वर्गण्या दिल्या, त्यांची आपसांतील तक्रार अशी होती कीं, दिगंबरपंतांनीं वर्गणी मुळींच दिली नाहीं. परंतु दिगंबरपंत म्हणत, ' सगळा खर्च आपल्यावर पडला. कोणी कांहीं विशेष दिलें नाहीं. ' या मारुतीच्या देवळापुढें त्यांनीं जागा साफ करवून तेथें रोज रात्रीं आपली श्रोते मंडळी जमवावयाचा आरंभ केला. श्रोते मंडळींत अग्रगण्य स्थान कांहीं गांवगुंडांना होतें. कांहीं सरकारी ऑफिसांतले कारकून, दोनतीन भिक्षुक, बरींचशीं चटोर पोरें हा तेथला साधारण समाज. आणि शनिवारीं रात्रीं असाच थोडा मोठा समाज जमे. वक्ते अर्थातच दिगंबरपंत ते जुन्या चालीरीतींचा नाश व सरकारचा जुलूम याबद्दल वक्तृत्वविस्तार करीत. त्यांचा आवाज खणखणीत व शिव्या शेलक्या यामुळें ऐकणारांस गंमत वाटे. स्वधर्माकरितां कसे कसे प्रयत्न झाले पाहिजेत आणि किती बळी पडले पाहिजेत याबद्दल भाषण निघालें म्हणजे त्यांच्या वक्तृत्वाला जो भयंकर पूर येई तो कांहीं विचारूं नये. वर सांगितलेल्या एवढ्याच बाबतींत त्यांचें भाषण होत असे असें नाहीं. गांवांतल्या मोठ्या लोकांच्या निंदा, गरीबगुरीब मथुराताईसारख्या बायाबापड्यांच्या कुटाळक्या व खोट्या नालस्त्या करण्यांत दिगंबरपंतांचा

अगदीं हातखंडा! त्यांची प्रेमाची मंडळी तेवढीच असली, म्हणजे मग या असल्या कुटाळक्या-व्यक्तींच्या नालस्त्या-फार चालावयाच्या आणि ज्यांच्या नालस्त्या त्यांच्याकडून होत, त्यांचें नुकसान जिकडून होईल तिकडून करण्यासाठीं त्यांची धडपड चाललेली असावयाची.

**मायेचा बाजार—ह. ना. आपटे.**

---

## ५. सुखसंवाद.

प्रियब्रह्मस्वामी व आपली विजयगांवकर मंडळी यांमध्यें पुष्कळच संभाषणप्रसंग झाले. त्या सर्व प्रसंगांचें सविस्तरपणें वर्णन करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, त्यांच्या तत्त्वचर्चात्मक, विनोदी व निष्कपट प्रेमसंभाषणासारखीं संभाषणें ज्यांना ऐकावयाला सांपडतील, ते खरोखरच धन्य होत! कितीतरी विषयांचा त्यांनीं त्या आठ दिवसांत ऊहापोह केला! सामाजिक, राजकीय, धार्मिक, काव्यविषयक, ऐतिहासिक, शास्त्रीय, सर्व विषयांची तिथें हजिरी झाली. तात्त्विक चर्चा म्हटली म्हणजे ती दुर्बोध, शाब्दिक, उदास व विनोदरहित असावयाची, असा आपला ग्रह व अनुभवहि आहे; परन्तु त्यांच्या तत्त्वचर्चेंत काव्य भरलें होतें. तें सुबोध व विनोदपरिपूर्ण होतें, आणि गायनाप्रमाणें तें आनंददायक होतें. त्यांच्या काव्यचर्चेंत तत्त्वज्ञान निघत असे व इतिहासाच्या वेळीं वाङ्मयहि डोकावत असे. मधूनमधून पुराणांतील वगैरे मनोरंजक व बोधपूर्ण गोष्टीहि निघावयाच्या, व कधीं तर गहन तात्त्विक चर्चा चालली असतांनासुद्धां एखादी विनोदात्मक गोष्ट किंवा चुटका अथवा कोटि निघून मंडळींत एक दोन मिनिटें हंशा पिकावयाचा! उत्सवप्रसंगीं अत्तरगुलाबाचा वास जसा सर्व दिवाणखान्यांत दुमदुमून भरलेला असतो तसे त्यांच्या विविध चर्चेंत विनोद व आनंद भरून राहिले होते. त्या दिव्य, मधुर, गहन-विनोदी संभाषणाची स्मृति जरी झाली, तरी आमच्या विजयगांवकर मंडळींना अद्यापि कितीतरी आनंद होतो. मग त्यावेळीं त्यांना काय वाटलें असेल, याची कल्पना वाचकांनींच केलेली बरी!

प्रियब्रह्मस्वामींविषयीं आमच्या मंडळीला जरी पूज्यभाव वाटत होता, तरी स्वामींचें वाक्य म्हणजे वेदवाक्याप्रमाणें अविचारणीय, असें ते मानीत नसत. मनाला वाटेल ती शंका नम्रपणानेंच-पण मनांतील भाव न लपवितां ते व्यक्त करीत असत. या गोष्टीचा प्रियब्रह्मस्वामींनाहि कधीं राग आला नाहीं. खरी गोष्ट अशी होती कीं, वाद करितांना स्वामी व ही विमलात्म व सुसंस्कृत मंडळी भेदभाव विसरून जात असत. स्वामींची कीर्ति त्यांनीं बरेच दिवस ऐकिली होती व त्यांची ओळख अशी प्रत्यक्ष जरी फार दिवसांची नव्हती, तथापि सात पावलांच्या संगतीनें सज्जनांचा स्नेह जमतो, या मागच्याच प्रकरणांत निर्दिष्ट केलेल्या उक्तीप्रमाणें या प्रयतात्म स्वामींच्या आणि ह्या शुद्धहृदय व निष्पाप मंडळीच्या परिचयाला अल्पावधींतच स्नेहरूप आलें होतें. ते अगदीं जिवलग मित्रांप्रमाणें थट्टा मस्करी करीत करीत आणि हंसतखेळत एखाद्या विषयाची चर्चा करीत असत.

एक दिवस बोलतां बोलतां " अदृश्यवाद आणि दृश्यवाद " हा विषय निघून वाद वाहवत वाहवत जातां जातां तो " धर्म खरा कीं भौतिक शास्त्रें खरीं ? " या प्रश्नावर येऊन ठेपला.

" भौतिक शास्त्रें कांहींहि म्हणालीं, तरी आम्ही ईश्वर आहे असेंच मानणार ! " शास्त्रीबुवा म्हणाले.

" 'ईश्वर आहे' असें मानावयाला पुरावा काय? " उत्तरेनें विचारिलें.

" याला पुरावा शास्त्राचा. शिवाय, सज्जनांची अन्तःकरणप्रवृत्ति हा एक दुसरा पुरावा. ' सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ' या कविवाक्यावर आमची भिस्त आहे. "

" कवींनीं म्हटलं म्हणून तें सत्य होत नाहीं ! " उत्तरा म्हणाली. ' रसायनशास्त्रवेत्ता आपलं विधान जसं प्रत्यक्ष प्रमाणं देऊन सिद्ध करून देतो, तसं तुमचा कवि किंवा तुमचीं शास्त्रें—

" जगांत जें प्रत्यक्ष दिसत आहे, तेंच खरें मानावयाचें कीं काय ?" स्वामी मध्येंच म्हणाले. त्रिकालदर्शी ऋषींचीं वचनें, प्रतिभावान् कवींची वाणी, सज्जनांची व वीरपुरुषांची अन्तःकरणप्रवृत्ति, हीं सर्व अविश्वसनीय समजायचीं कीं काय ? "

" सज्जनांची उदार अन्तःकरणप्रवृत्ति म्हणजे वेडेपणा आणि कवि-कल्पनासाम्राज्य म्हणजे मनोहर स्वप्नसृष्टि !" उत्तरा बिनदिक्कत म्हणाली,

"अरसिक मनुष्याला कवींचें मर्म समजायचेंच नाहीं" शास्त्रीबुवा म्हणाले. " रानटी लोकांपुढें कालिदासाचे श्लोक म्हटले म्हणून त्यांना आनंद भारीच होणार आहे ! "

" मला जंगली लोकांत काढलंत, याचा मला राग नाहीं. " उत्तरा शांतपणानें म्हणाली, " पण माझं आपलं असं म्हणणं आहे कीं, कवींच्या काल्पनिक वर्णनांनीं जो तात्पुरता आनंद होतो, त्याची खेळांतल्या आनंदाइतकीच योग्यता आहे. त्यांच्या वर्णनांनीं आनंद झाला, म्हणून त्यांचे विचार शास्त्रज्ञांच्या सिद्धान्तासारखेच मान्य होत नाहींत. प्रयोगांनीं सिद्धान्त सिद्ध करून दाखविणारे शास्त्रज्ञ कोणीकडे, आणि मनाला वाटेल तें कविताबद्ध करून गोड शब्दांत बरळणारे कवि कोणीकडे ! कवींचीं उदात्त वर्णनें घटकाभर वाचून ठेवून द्यावींत, एवढाच त्यांचा उपयोग ! कवींच्या वर्णनांत पाहिजे तो वेडेपणा खपतो ! कविसृष्टींत मेघांना दूतांप्रमाणें निरोप सांगतां येतो, सिंहांना वाचा फुटते आणि दगडाला द्रव येतो ! कविसृष्टींतील वानरं समुद्रावर सेतु बांधतात ! कवीला ' गंगेच्या कांठचा पक्षी किंवा साप होणं बरं, पण राजा होणं नको,' असं वाटतं ! त्याला ' वनवासी फूल ' उपदेश करितं ! पुरूरव्याला लतेमध्यें उर्वशी जशी दिसत होती, तसाच कविप्रतिभेला प्रत्येक वस्तूंत ईश्वरांश दिसतो. प्रत्येक वस्तूंत जर ईश्वरांश असेल, तर मग सापाला हातांत कां धरूं नये ? कविवचनांवर जर विश्वास ठेवावयाचा, तर मग आपल्या प्रिय माणसांना पोस्टांतून पत्र न पाठवितां एखाद्या राजहंसाबरोबर किंवा मेघाबरोबर आपला निरोप कां पाठवूं नये ? "

" ताई, कवींची चेष्टा करतेस, तशी भौतिकशास्त्रज्ञांची चेष्टा नाहीं का करतां यावयाची ? " रागिणी म्हणाली, " एका शास्त्रज्ञानं ' सूर्यप्रकाशामुळें दिवसा दिवे लागत नाहींत, ' असा विचार करून सूर्याची योग्यता लाख कोटी रॉकेलच्या दिव्यांबरोबर केली होती, हें तुला ठाऊक आहे ना ? मुंबई येथील एका शास्त्रज्ञाला दिवाळीचा ' लाइट ' पहाव-

याला बोलाविलें असतां त्यानें 'एका दिव्यासारखे लाखों दिवे रांगेनें लावले आहेत,' अशी कल्पना केली, म्हणजे झाला दिवाळीचा लाइट पाहून! असे उद्गार काढले होते, हें तू ऐकलं आहेस ना?'

रागिणीचं बोलणं संपल्याबरोबर उत्तरा लगेच म्हणाली, 'तुम्ही भौतिकशास्त्रांची किती जरी टर उडविलीत, तरी त्यांचीं तत्त्वं प्रयोगसिद्ध आहेत. त्यांच्यापुढं तुमचा विनोद कसा टिकणार? युरोपियन तोफांच्या पुढं जसं पेशवाईतल्या ब्राह्मणांच्या शापांचं किंवा रानटी लोकांच्या तिरकमठयांचं कांहीं चालणार नाहीं, तसंच शास्त्रज्ञांच्या तत्त्वांपुढं तुमच्या धार्मिक वचनांचं किंवा तुमच्या बाष्कळ विनोदाचं कांहीं दिखील चालावयाचं नाहीं!'

'तुमच्या भौतिकशास्त्रज्ञांचे सिद्धांत खरे असतील,' प्रियब्रह्मस्वामी म्हणाले, "पण याचा अर्थ 'धार्मिक तत्त्वें खोटीं,' व 'कविवचनें त्याहून खोटीं' असा मात्र नाहीं. धर्मग्रंथांत जें जें सांगितलें आहे, किंवा कवि जें जें सांगतील, त्यावर अंधपणें विश्वास ठेवा, असें मी म्हणत नाहीं. माझा भावार्थ हा कीं, ईश्वरविषयक गोष्टी प्रत्यक्ष प्रमाणानें किंवा तार्किक युक्तिवादानें सिद्ध करितां येत नाहींत, म्हणून त्या सर्व खोट्या, असें म्हणण्याचा आपणाला अधिकार नाहीं. पाहूं गेलें तर कोणती उच्च, उदार गोष्ट सयुक्तिक व अवश्यकरणीय आहे असें बुद्धिवादानें सिद्ध करतां येईल? 'अपकार केला असतां उपकार करावा' हें श्रेष्ठ तत्त्व सुजनहृदयालाच मान्य होईल; हें तत्त्व बुद्धिवाद करून दुर्जनाला बुद्धिदृष्ट्याहि मान्य करायला लावणें शक्य नाहीं. कोणत्याही वीर पुरुषाकडे, दानशूर मनुष्याकडे, किंवा उदार सुधारकाकडे तुम्ही जा आणि त्याला स्वतःच्या वर्तनांत दिसून येणारें उच्चतम तत्त्व वावदूक तार्किकाला युक्तिवादानें सिद्ध करून दाखवितां येतें का पहा. त्यांना हें सिद्ध करतां येणार नाहीं. उदार तत्त्व हृदयगम्य आहे, तर्कप्रतिपादनीय नाहीं. ज्याच्या पोटांत प्रेम नाहीं, त्याला दुसऱ्यावर प्रेम करण्याची उपयुक्तता कोण सिद्ध करून दाखवील? दुसऱ्यावर प्रेम केल्यानें स्वतःचा फायदा होतो, असें तुम्हीं दाखविल्यास तो जोंपर्यंत स्वतःचा फायदा होण्याचा संभव आहे, तोंपर्यंत प्रेम करावें

एवढी गोष्ट कबूल करील; पण प्रेमाकरितां प्राणपरित्याग किंवा निरपेक्षस्वहितत्याग करायला तो तयार व्हायचा नाहीं. लोकांची वाहवा मिळावी म्हणून तो थोडाबहुत दानधर्म करील; पण रामासारखें राज्य सोडायला किंवा कर्णासारखीं जन्मसिद्ध कुंडलें द्यायला अथवा ख्रिस्तासारखा परहितार्थ स्वदेहयज्ञ करायला तो कधींहि तयार व्हायचा नाहीं. ''

स्वामींच्या या भाषणावर नानासाहेबांनीं बरीच विनोदात्मक टीका केली व नंतर ते व भाऊसाहेब आणि शास्त्रीबुवा यांच्यामध्यें बराच वादविवाद झाला. या वादाला पुढें अनेक शाखा फुटल्या; परन्तु त्यांचें येथें दिग्दर्शनहि करणें शक्य नाहीं. प्रियब्रह्मस्वामी जरी न्यायाधीशासारखे शान्त वृत्तीनें व निःपक्षपातीपणानें प्रश्नाचा निकाल लावण्याचा प्रयत्न करीत होते, तरी वादाचा निकाल लागला नाहीं. त्यांच्या म्हणण्यावरहि नानासाहेब वगैरे मंडळी आक्षेप घ्यावयाचीच ! स्वामी बहुश्रुत व विवेकी होते, परन्तु तात्त्विक दृष्ट्या ते कृतनिश्चय झालेले नव्हते; ते परोपकाररत होते, त्यांचा अहंकार पूर्णपणें गळला होता, ते इतरांहून ज्ञानांत फारच श्रेष्ठ होते; तरी प्रत्यक्ष ब्रह्मवेत्ते नव्हते. त्यांना बऱ्याच योगसिद्धि होत्या व नीतिदृष्ट्या ते फारच उच्च होते; परंतु आपण सर्वज्ञ व सर्वश्रेष्ठ आहों, असें त्यांना वाटत नव्हतें आणि जरी त्यांना तसें वाटत असतें, तरीही विवादशूर विजयगांवकर मंडळी आक्षेप घ्यावयाला भ्याली असती किंवा नाहीं, याची शंकाच आहे !

रागिणी—वामन मल्हार जोशी.

---

## मराठे व इंग्रज.

इंग्रजांचा इकडे ( म्हणजे हिंदुस्थानांत ) येण्यांत मूळ हेतु व्यापाराचा होता, व मराठ्यांनीं जशी दिल्लीच्या पातशाहीची नोकरी बजावतां बजावतां साम्राज्यसत्ता आपल्या हातीं आणली, तसेंच इंग्रजांनीं व्यापार करितां करितां राज्य कमावलें. राज्य हें कदाचित् मूळचें साध्य नसेल, पण निदान व्यापारवृद्धीचें तें एक उत्कृष्ट साधन आहे, ही गोष्ट त्यांना लव-

करचं कळून आली; व तेव्हांपासून ते राज्य कमावण्याच्या उद्योगास लागले. या कामीं त्यांना परिस्थिति बरीच प्रतिकूल होती. मूळ ठिकाण इंग्लंड; हिंदुस्थानास हजारों मैलांवरून केवळ समुद्रमार्गानें यावयाचें; हल्लींप्रमाणें वाफेचीं यंत्रें वगैरे शीघ्र गतीचीं साधनें नव्हतीं; वाटेंत प्रतिस्पर्धी युरोपियन दर्यावर्दी लोकांकडून उपसर्ग लागण्याची भीति; हिंदुस्थानांत मुसलमान, मराठे, यांसारखे प्रबळ लढवय्ये शत्रु; व त्यांना फ्रेंचांसारख्या युरोपियन लोकांची मदत; अशी स्थिति असतां, ईस्ट इंडिया कंपनीच्या पिंपळाची जी मुळी एकदां बंगाल्यांत रुजली, तिनें कालान्तरानें सर्व हिंदुस्थानभर राजेरजवाड्यांच्या सत्तेच्या प्रचंड इमारती भराभर उलथून पाडून जमीनदोस्त केल्या !

इंग्रजांना हें जें अनिरुद्ध यश मिळत गेलें, त्यास इंग्रजांचें सुदैव हें तर एक कारण आहेच; पण दैवाइतकेंच त्यांच्या आंगचे कांहीं ठळक गुणही कारणीभूत झाले आहेत हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. इतिहासाची चर्चा करावयाची तर ती ऐतिहासिक बुद्धीनेंच केली पाहिजे. तेवढ्या वेळेपुरती अभिमानाची भेसळ यांत होऊं देतां उपयोगी नाहीं. निव्वळ ऐतिहासिक दृष्टि लावूनही आपणांस मराठेशाहीविषयीं अभिमान वाटण्यासारखी पुष्कळ जागा आहे. पण इंग्रजांविषयीं बोलण्याचा प्रसंग आला असतां त्यांच्याही चारित्र्याची परीक्षा आपण निःपक्षपातीपणानें केली पाहिजे; तरच आम्हांस थोडीबहुत तरी ऐतिहासिक म्हणून दृष्टि आहे असें ठरेल.

इंग्रजांचें सुदैव म्हणून म्हटलें त्याचीं तीन उदाहरणें तरी आम्हांस सांगतां येतील. तीं अशीं:—इंग्रजांची व मराठ्यांची लढाई प्रत्यक्ष झाली त्याच्या आधीं होण्याची ती टळली. इंग्रजांसंबंधानें महादजी शिंदे व नाना फडणवीस यांना जो संशय आला तो शिवाजीस किंवा बाजीराव—चिमाजीअप्पा यांस येता तर त्यांनीं इंग्रजांची मुंबईची वखार व वसाहत केव्हांच उपटून लाविली असती. इंग्रजांच्या सत्तेचें मुख्य केन्द्र पडलें बंगाल्यांत, व तें मराठ्यांचा हात पोंचण्यापलीकडचें होतें. दुसरें इंग्रज व फ्रेंच यांचें युद्ध जुंपलें व संपलें, तें हिंदी राजेरजवाड्यांना इंग्रजांचा राज्यलोभ स्पष्टपणें दिसून येण्यापूर्वीं; आणि तिसरें एकुणिसाव्या शतकांत वायव्य सरहद्दीच्या बाजूस शीख लोकांसारख्या लढवय्ये लोकांचें राष्ट्र उद-

त्यास येऊन त्यानें वायव्येकडील सरहद्दीचा दरवाजा बंद करून टाकला होता. वरील तिन्हींपैकीं एकही गोष्ट जरी विपरीत घडून येती, तरी हिंदुस्तानांतील इंग्रजी राज्यास धोकाच येता; पण स्वतः काळच पक्षपाती बनून त्यानें इंग्रजांचें मोठें साहाय्य केलें. असो; सुदैवाची जोड गुणवानास लाभली तरच त्याचा झाला तरी खरा उपयोग होतो. नादान मनुष्याला दैव हात देऊन तरी किती देणार? पण सुदैवाच्या लाभास स्वतःला पात्र करून घेण्यासारखे इंग्रजांच्या अंगचे गुण म्हटले म्हणजे (१) शिस्त व व्यवस्थेची आवड; (२) धिम्मेपणाचा स्वभाव व दूरदृष्टि; (३) चिकाटी व करारीपणा; (४) स्वराष्ट्रप्रेम व राष्ट्राच्या कीर्तीची चाड; (५) लोकोत्तर कर्तव्यनिष्ठा. वरील प्रकारचे गुण इंग्रजांचे अंगीं होते, म्हणूनच इतक्या प्रतिकूळ परिस्थितींत त्यांना एवढें राज्य मिळवितां आलें. इंग्रजांच्या अंगीं लोभ, अन्यायाकडे कानाडोळा करण्याचा स्वभाव, मानवीपणा, कपटपटुत्व इत्यादि ठळक दोष नव्हते असें नाहीं; पण मराठ्यांच्या अंगीं हे दोष मुळींच नव्हते, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. अर्थात् मराठे व इंग्रज या दोघांच्याही अंगचे समान धर्म हिशोबांत धरण्यांत अर्थ नाहीं. ती दुबेरजी म्हणून टाकूनच दिली पाहिजे. मराठे व इंग्रज यांच्यामध्यें जर विषमता असेल, तर ती वरील गुणांच्या बाबतींत; आणि वरील गुण मराठ्यांपेक्षां इंग्रजांच्या अंगीं अधिक प्रमाणानें वसत होते, म्हणून आपल्या अंगच्या लोभ, अन्यायबुद्धि, वगैरे दुर्गुणांचाही इंग्रजांस जितका फायदा करून घेतां आला, तितका मराठ्यांस करून घेतां आला नाहीं. या गुणांपैकीं निदान एकदोन गुणांसंबंधें तरी तत्कालीन मराठ्यांनाही खात्री पटली होती, यांत शंका नाहीं. बाजीरावाचे वेळीं मराठी राज्यांतील बेशिस्तपणाचा खुद्द मराठे राज्यांतील लोकांसच वीट आला होता व म्हणूनच बाजीरावशाही नष्ट झाली, तेव्हां कोणाही मराठ्यानें इंग्रजांविरुद्ध हात उचलला नाहीं. पेशव्यांच्या दौलतीएवढी खानदानीची व श्रीमन्त दौलत एरवीं लोकांनीं अशी आपल्या डोळ्यांदेखत नष्ट होऊं दिली असती काय? बाजीराव जाऊन इंग्रज आले, ही राष्ट्रास घातक अशी राज्यक्रांति झाली, असें पुण्यांतील लोकांस न वाटतां, आपण

अनन्वित कृत्यें करणाऱ्या एका नराधमाच्या त्रासांतून सुटलों, असेंच त्यांच्या मनास वाटत होतें. राजाचा पराभव होऊन, तो देशोधडीस गेला असतां, राजाच्या प्रेमामुळें नव्हे, पण राष्ट्रप्रेमानें व स्वाभिमानानें आपल्या राजधानीचें लढून रक्षण केल्याचीं उदाहरणें जगाच्या इतिहासांत कितीतरी सांपडतील! पण पुण्यास शनवारच्या वाड्यावरील पेशव्यांचें निशाण काढून टाकून ज्यानें इंग्रजांचें निशाण लाविलें तो मनुष्य—त्याला देशाभिमानाच्या दृष्टीनें आतां नीच, अधम, कांहींही म्हणा—पण त्या वेळच्या लोकांना तो उपकर्ता असा वाटल्याशिवाय आपल्या छातीवर लोकांनीं कसा नांदूं दिला असता? कागदोपत्रींचा व दन्तकथेचा पुरावा लक्ष्यांत घेतला असतां, आज मर्यादित स्वराज्य मागण्याच्या वेळीं आमची इंग्रजांविषयीं जी आदरबुद्धि आहे, तिच्यापेक्षां शंभर वर्षांपूर्वीं हातीं असलेलें स्वराज्य गमावण्याच्या वेळीं तत्कालीन महाराष्ट्रीयांच्या मनांत इंग्रजांविषयीं अधिक आदरबुद्धि वागत होती, असेंच म्हणावें लागतें. इंग्रज बाजीरावाचें राज्य न घेते, तर पुण्याचे लोक म्हणजे त्यांस तें घेण्यास अर्जच करते, असें नाहीं; पण इंग्रजांनीं तें घेतलेंच तेव्हां मराठे युद्धास प्रवृत्त झाले नाहींत, येवढी गोष्ट खरी. पूर्वीं संभाजीच्या पश्चात् मोगलांनीं महाराष्ट्रावर झडप घातली, तेव्हां ज्या मराठ्यांनीं वीस वर्षेंपर्यंत जिवाचें रान करून स्वातंत्र्यरक्षणार्थ युद्ध केलें, त्यांच्याच चवथ्या पांचव्या पिढीचे वंशज महाराष्ट्रांत या वेळीं होते व हल्लींप्रमाणें ते तेव्हां निःशस्त्रही नव्हते! १८५७ पेक्षांही इंग्रजांशीं लढण्यास मराठ्यांना त्या वेळीं अधिक अनुकूल परिस्थिति होती. असें असतां, सर्व मराठे घरच्या घरीं स्वस्थ बसले, याचा अर्थ काय करावयाचा? आतां त्या वेळीं युद्धास प्रवृत्त होणारास हटकून यश आलें असतेंच असें नाहीं; पण स्वातंत्र्याकरितां बेफाम व जिवावर उदार होऊन कोणतेंही राष्ट्र लढूं लागतें, तेव्हां तें जयापजयाचा आगाऊ विचार करीत नसतें. बोअर लोक इंग्रजांविरुद्ध किंवा बेल्जन लोक जर्मनांविरुद्ध लढण्यास उभे राहिले, तेव्हां आपण प्रतिपक्ष्याशीं तुल्यबळ आहों, किंवा आपणास हटकून यश येईलच, अशा भावनेनें ते उभे राहिले नाहींत. प्रेसिडेंट क्रूगर यांनीं, "आम्ही जगास थक्क करून सोडूं," असें जगजाहीर केलें, याचा अर्थ इंग्रजांचा नाश

करून जगास थक्क करून सोडूं असा नसून, आपल्या स्वातंत्र्यप्रेममूलक आत्मयज्ञानें थक्क करून सोडूं, असाच याचा अर्थ होता. पण मराठे स्वातंत्र्यास विटले होते म्हणा, किंवा इंग्रज आल्यानें आपला फायदा होईल असें वाटत असल्यामुळें म्हणा, त्यांनीं यत्किंचितही हालचाल केली नाहीं. कारण कांहींही असो, तें कार्य घडून आलें एवढें खरें !

**मराठे व इंग्रज—न. चिं. केळकर.**

---

## ७. निंदकाचे उपकार.

मनुष्यमात्राच्या ठिकाणीं देहाभिमान सदा जागरूक असल्यामुळें त्याला स्तुति आवडते व निंदा खपत नाहीं. आत्मस्तुति—परनिंदा हा जीवमात्राचा स्वभाव आहे; पण या स्वभावानें उलट खाऊन परस्तुति—आत्मनिंदा आवडूं लागली कीं, परमार्थबुद्धीचा अंकुर फुटूं लागला आहे असें निश्चित समजावें. साडेतीन हातांचा देह तो मी, अशी बुद्धि बळकट झाली असल्यामुळें व जनीं जनार्दन पाहण्याइतकी समरसता प्राप्त झाली नसल्यामुळें सामान्य मनुष्याला आपली स्तुति कानानें ऐकणें जितकें आवडतें, तितकीच परनिंदा जिव्हेनें करणेंसुद्धां आवडतें. माझ्या भरतानें राज्य करावें व सवतीच्या रामानें वनवास भोगावा, अशी कैकयीची दशरथापाशीं दुहेरी मागणी होती. 'तुझा भरत राज्य करूं दे, पण माझ्या रामाला वनवासाला पाठवूं नकोस' ही दशरथाची सयुक्तिक विनंतीही तिला रुचली नाहीं. देहाहंकृतीचा स्वभावच कैकेयीप्रमाणें असा दुहेरी आहे कीं, स्वस्तुति व परनिंदा हीं सारख्या प्रमाणानें व एकसमयावच्छेदेंकरून तिला आवडत असतात ! आत्मस्तुति पाहिजे तर करीत रहा, पण परनिंदा तरी करूं नकोस, हा दशरथी उपदेशही तिला रुचत नाहीं. ज्याला आत्मस्तुति आवडते, तोच परनिंदेनें खूष होतो. जेथें एक आहे तेथें दोन्ही आहेत; जेथें एक नाहीं, तेथें दोन्ही नाहींत. 'परगुण परमाणूंचे पर्वत करणारे' व त्या उदात्त भावनेनें आपल्या ठिकाणीं डोलणारे सज्जन जगांत फार विरळ आहेत. 'मज आहे तुज साजेना । हें तों ठाउकें आहे जना' असा समर्थांनीं लोकस्वभाव वर्णिला आहेच.

आत्मस्तुति-परनिंदा हा अनिवार जीवभाव असल्यामुळें व मनुष्यप्राणी त्रिगुणात्मक अतएव गुणदोषयुक्त असल्यामुळें कोणीहि सर्वथा निर्दोषी असूं शकत नाहीं व स्तुतिनिंदेच्या तडाख्यांतून प्रायः कोणीहि सुटत नाहीं. परनिंदेच्या पोटांत आत्मस्तुति गर्भित असते व आत्मस्तुतीच्या पोटांत परनिंदाही गर्भित असते, असा सर्वसाधारण नियम आहे.

ॲडिसन ह्या सुप्रसिद्ध इंग्रज निबंधकारानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "Censure is the tax which a man pays to the public for being eminent; it is folly for a wise man to think of escaping it, and a weakness to be affected by it." चारचौघांपेक्षां अधिक गुणवान् व लौकिकवान् असलेल्या प्रत्येक मनुष्याला 'टीका ऊर्फ निंदा' हा कर लोकांना द्यावा लागतोच; म्हणजे लौकिकवान् मनुष्यास लोकांच्या टीकेला किंवा निंदेला पात्र व्हावेंच लागतें. लोकनिंदेपासून मी सुटेन अशी अपेक्षा शहाण्यानें करणें वेडेपणाचें आहे; व लोकनिंदेनें विव्हळ होणें हें दुबळेपणाचें लक्षण आहे! ॲडिसनच्या म्हणण्याचा भावार्थ हा असा आहे. इंग्रजी भाषेंतला प्रख्यात ग्रंथकर्ता व पहिला कोशकर्ता सुप्रसिद्ध डॉ. जॉन्सन हा टीकाकारांच्या कोल्हेकुईला अगदीं न भिणारा धीरपुरुष होता. त्याच्यावर टीकाकारांनीं व निंदकांनीं एकदां वाग्बाणांचा वर्षाव केला असतांना तो वीरपुरुष बॉस्वेल नामक आपल्या शिष्याजवळ एवढेंच म्हणाला होता, "Let the dogs bark, they dare not harm my reputation." म्हणजे कुत्रीं भुंकोत बिचारीं; त्यांच्या भुंकण्यानें माझ्या यशोमंदिराचा एक चिराही ढळणार नाहीं. टीका व निंदा कोणत्याही खऱ्या कार्याची महती कमी करूं शकत नाहींत. फाजील स्तुतीनें जसा कोणी अजरामर होत नाहीं, तसा फाजील निंदेनें कोणीही चिरकालीन अपयशाला पात्र होत नाहीं.

वर ॲडिसन किंवा जॉन्सन यांच्या मुखांतले जे उद्गार दिले आहेत, त्यांत निंदकाविषयीं एक प्रकारची तुच्छबुद्धि तरी दिसते. निंदेचे वाग्बाण बोथट करून टाकणाऱ्या अशा धैर्याचीही प्रशंसा करणें योग्य आहे खरें;

तथापि निंदकांचा तिरस्कार करण्यापेक्षां निंदकांविषयीं उदासीन असणारे पुरुष वरच्या पायरीचे आहेत. डॉ० जॉन्सनच्या वरील उद्गारांपेक्षां भवभूतीचे——

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।

हे उदासीनतेचे उद्गार जास्त वरच्या पायरीचे आहेत. निंदकांची उलट निंदा करणें हा गौण पक्ष, निंदकांविषयीं उदासीन असणें हा मध्यम पक्ष, व निंदकांना व्यापकपणानें आपणांत मिळवून घेणें व त्यांना मित्र व गुरु समजणें हा उत्तम पक्ष! पहिल्या पक्षानें सारा व्यवहार भरला आहे; दुसऱ्या पक्षांत प्रशंसनीय मनोधैर्य प्रगट होतें व तिसरा पक्ष हा साधुसंतांच्या चरित्रांतच पाहण्यास सांपडतो. उदासीन पक्षांत पोटांत तरी जळजळ असण्याचा संभव असतो; पण साधुसंतांच्या विश्वव्यापक प्रेमांत द्वेषासारख्या हीन मनोवृत्तींना थारा मिळणें अशक्य असतें; त्या पार वितळूनच जातात.

ज्याला परमार्थाची कांस धरून भगवत्प्राप्ति करून घ्यावयाची आहे, त्यानें निंदेला निंदा, ठोशाला ठोसा, हा राजसी लोकांचा मार्ग सोडलाच पाहिजे व निंदा गिळून निंदकाला मित्र म्हणून आलिंगन द्यावयाला पुढें सरसावलें पाहिजे; निंदेंत जो ग्राह्यांश असेल तो घेऊन आपले दोष जाणून टाकायला शिकलें पाहिजे. ‘ निंदकाचें घर असावें शेजारीं ’ ही गोष्ट खरी आहे. आपल्या कृतींतले दोष अंध आत्मप्रेमामुळें आपल्यास दिसत नाहींत; ते जो बिनपगारी मित्र आपण होऊन उदारपणानें आपल्यास दाखवून देतो, त्याची ‘ निंदक ’ या अमंगळ नांवानें आपण तरी कां हेळणा करावी बरें? दानस्नानजपोपवासनियमादिकांनीं जें पाप नाहींसें होत नाहीं, तें निंदकांच्या दोषैक दृष्टीमुळें होतें; म्हणून निंदकांची दोषदृष्टि ही आपली उपकारकर्ती गुरुमाउली आहे, अशी भावना ठेवून, साधकानें निंदकांचा राग करितां कामा नये. परहितकार्यांत अग्रेसरत्वाचा मान निंदकांच्या जिव्हेला दिला पाहिजे. परांचा दुरितभर अळें माथां घेणारे निंदक बहुकष्टानें सांचविलेलें आपलें पुण्य परकार्यांत

खर्चतात, म्हणून परोपकारी पुरुषांत त्यांचा नंबर पहिला लागला पाहिजे. म्हणून पंत म्हणतात--

देवा, निरामय सुखी शतवत्सर सर्व खळ असावेच !
न प्रार्थितां, नच करिल पंकाचा तीर्थजळ असा वेंच.

मुद्याची गोष्ट ही कीं, आपल्याला देहबुद्धीची राखरांगोळी करावयाची असेल, तर निंदकांसारखे साह्यकर्ते खरोखरीच दुसरे कोणीही मिळावयाचे नाहींत. मी पांचभौतिक स्थूळाहून निराळा आहें, हें अंतरीं ठसविण्यासाठीं स्थूळाचा कंटाळाच आला पाहिजे व निंदक तरी स्थूळाचीच निंदा करीत असतात. आम्ही होऊनच देहास निंदितों व जो देहास निंदितो तो आमचा पूर्ण हितकर्ता होय. नाथांचें पुढील बहारीचें पद वारंवार गुणगुणून त्याच्या अर्थाचें मनन करीत निंदोक्तींतूनही आपलें हित तेवढें काढून घ्यावें—

निंदक कामाचा, कामाचा । गडी आत्मारामाचा ॥
निंदक अमुची काशी । अमुचीं पातकें अवघीं नाशी ॥
निंदक अमुची गंगा । अमुचीं पातकें नेते भंगा ॥
निंदक अमुचा सखा । अमुचीं वस्त्रें धुतो फुका ॥
निंदक अमुचा गुरू । एका जनार्दन थोरू ॥

**मुमुक्षूचें सिंहावलोकन—ल० रा० पांगारकर.**

---

## ८. अर्थशास्त्र व वेदान्त.

सुधारणेचा गर्व वाहणाऱ्या आधुनिक युगास आज सर्व सुधारणांचा कळस झाला आहे, असें वाटतें. तथापि, सुधारणेच्या कित्येक गोष्टींचा आजकाल केवळ जन्म झाला असून त्यांचें सर्व आयुष्य पुढेंच जावयाचें आहे. दुसरे पक्षीं, इतर कित्येक गोष्टींचा अजून जन्मही झालेला नाहीं—काळाच्या अगाध उदरकुहरांत त्या गुरफटलेल्या असून त्यांची कल्पनाही आजच्या पिढीस नसेल !

शास्त्र या दृष्टीनें पाहतां, अर्थशास्त्र हें अगदीं अर्वाचीन आहे, याबद्दल मतभेद नाहीं. हें फक्त दीडशें वर्षांचें जुनें आहे. या शास्त्राच्या

केवळ नांवावरूनच, अर्थशास्त्राचा विषय 'अर्थ' म्हणजे द्रव्य, पैसा, किंवा ऐहिक सुखोपभोग मिळविण्याचें बाह्य साधन हा होय, हें उघड दिसून येईल. परंतु यावरून असा एक प्रश्न आपोआप उद्भवतो कीं, अर्थशास्त्राचा विषय जर अर्थ म्हणजे धनसंपत्ति, तर अर्थशास्त्र अर्वाचीन कां असावें ? हिंदुस्थानांत प्राचीनकाळीं धनसंपत्ति हा पदार्थच लोकांस माहीत नव्हता कीं काय ? व जर असेल तर इतर शास्त्रांप्रमाणें अर्थशास्त्रही प्राचीन आचार्यांनीं व ग्रंथकारांनीं लिहिण्यास काय हरकत होती ? धनसंपत्ति, तिच्या उपभोगाची इच्छा व ज्ञान, आणि समाजांतील विद्वान् लोकांस ग्रंथकर्तृत्वाची आवड, या गोष्टींचें जर सामानाधिकरण्य बहुधा अनादि कालापासून चालत आलें आहे, तर प्राचीनकाळीं अर्थशास्त्रावर सोपपत्तिक असे ग्रंथ निर्माण न होण्यास कांहीं विशेष कारणें असलीं पाहिजेत, हें उघड आहे. हीं विशेष कारणें कोणतीं ?

जातिभेदाचें कारण कदाचित् कांहीं अंशीं ग्राह्य मानतां येईल. पूर्वकालीं हिंदुस्थानांत जातिपरत्वें धंद्याची योजना होती, हें खरें आहे. विद्या आणि ऐहिक धंदे यांची एक प्रकारें फारकतच झालेली होती. ग्रंथकर्तृत्व हें मुख्यतः ब्राह्मणवर्गाकडे होतें, व त्याची मजल फार तर विद्यासंपन्न अशा क्षत्रिय वर्गापर्यंत पोंहोचे. उद्योगधंदा करून द्रव्योत्पादन करण्याचें काम वैश्यवर्गाकडे असे. अर्थात् ब्राह्मणवर्गाचें लक्ष्य द्रव्योत्पादनाच्या रहस्याकडे नसल्यामुळें अर्थशास्त्रासारख्या विषयावर त्यांच्या हातून ग्रंथ निर्माण होणें शक्य नव्हतें. वैश्यवर्गास व्यवहाराचें ज्ञान उत्कृष्ट असे, परंतु ग्रंथकर्तृत्वास लागणारा विद्याव्यासंग, स्वस्थता, शांतताप्रियता, या गोष्टी वैश्यवर्गाच्या अंगवळणीं नसल्यामुळें आणि त्यांच्या व्यवहाराचें यश ग्रंथावर अवलंबून नसल्यामुळें अर्थशास्त्र हें ग्रंथकर्तृत्वाच्या टापूंतून वेगळें राहिलें असावें, असा तर्क सर्वस्वीं अयुक्तिक होणार नाहीं.

पण हिंदु लोकांच्या मनावर निवृत्तिपर वेदांताचा पगडा बसलेला होता, म्हणून हिंदु लोकांत अर्थशास्त्रावर ग्रंथ निर्माण झाले नाहींत, ही उपपत्ति मात्र फारशी मान्य होण्यासारखी नाहीं. गरीब बिचारा वेदान्त ! त्याच्यावर पुष्कळ वेळां नसत्या दोषांचा आरोप करण्यांत येतो, त्यांत-

-अच हाही एक आहे, असें आम्हांस वाटतें. आधीं वेदांतान्तर्गत सिद्धान्तांबद्दल सर्वकाळ समर्पक रीतीनें लागू पडेल असें एखादें विधान करितां येईल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

वेदान्त—अर्थात् अद्वैती वेदान्त—जीवात्मा व परमात्मा एकच आहे, असें सांगतो, हें खरें. परंतु या प्रचंड एकरूपतेच्या शिक्षणापासून मन निवृत्तिपर, निष्क्रिय, नेभळें व हताश व्हावें, असें त्या शिक्षणांत काय आहे, हें आम्हांस तरी कळत नाहीं! तामस निवृत्तिपरता हेंच वेदान्ताचें व्यवहारलक्षण आहे, असें घेऊन चाललें तरी हें लक्षण वेदान्तास अमुक एके वेळींच येऊन जडलें हें दाखविणें कठीण आहे; आणि हें लक्ष्य व हें लक्षण हीं दोन्ही जर वास्तविक सनातन किंवा अनादि आहेत तर हिंदु समाजाची निष्क्रियता ही सनातन असल्याचें ऐतिहासिक रीत्या सिद्ध करितां येईल काय ?

दुसरी गोष्ट अशी कीं, हा वेदान्त जर हिंदुसमाजाच्या मनास व्यापून बसलेला होता असें मानलें तर, सर्व समाज धनदौलत व द्रव्यसंपत्ति यांपासून नेहमीं पराङ्मुख होता—पैशाच्या उलाढालींत तो आवेशानें व हौसेनें केव्हांही पडला नाहीं—हें खरोखर सिद्ध करितां येईल काय ? आमच्या मतें हें सिद्ध करणें कठीण आहे. वेदान्ताचें प्रवृत्तिपर शिक्षण देणें सर्वस्वीं शक्य आहे, हें जर स्वामी विवेकानंदांसारख्यांनीं चालू पिढींत सिद्ध केलें तर, तें शिक्षण पूर्वींच्या शेकडों पिढ्यांत त्या त्या वेळच्या समाजशिक्षकांनीं दिलें नसेल, असें मानतां येईल काय ? अथवा हिंदुसमाज ज्या काळीं प्रचंड उलाढाली करीत होता, असें इतिहासावरून निर्विवाद सिद्ध करतां येतें, त्यावेळीं हिंदुस्थानांत अद्वैती वेदान्त प्रचलित नव्हता कीं काय ? अद्वैती वेदान्त जर निवृत्तिपर तर द्वैती वेदान्त तरी प्रवृत्तिपर असावा कीं नाहीं ? पण द्वैती वेदान्त मान्य करणाऱ्या समाजांत तरी अर्थशास्त्रावर ग्रंथ कोठें झाले आहेत ?

जुन्या संस्कृत वाङ्मयांत धनसंपत्तीची निंदा करणारीं पुष्कळच वचनें सांपडतात, हें खरें; पण अशीं वचनें इतर देशांच्या वाङ्मयांतही थोडीं आहेत असें नाहीं, आणि तसें असणारच. ज्या भाषेंत अर्थशास्त्रावर ग्रंथ सांपडतात, ती भाषा बोलणाऱ्या समाजांत झालें तरी

धनसंपत्तीची गैरवाजवी हाव धरणें या गोष्टीचा निषेधच केलेला असणार आणि हिंदी वाङ्मयांतही जीं द्रव्यनिंदात्मक वचनें आहेत, तीं केवळ धनसंपत्तीच्या निंदेचीं नसून, तिचा अयोग्य हव्यास किंवा तिच्या संग्रहाचा केवळ स्वार्थपरायणतेनें खर्च, याच्या निषेधाबद्दलचींच आहेत, हें सहज दाखवितां येईल. हिंदुस्थानांत जे साधु लोक स्वतः निरिच्छ होते, त्यांना सर्व जग निरिच्छ असणें शक्य नाहीं हें माहीत नव्हतें असें नाहीं; किंबहुना ही एकान्तिक निरिच्छता थोडयाशा फटिंगांनाच योग्य; बहुजनसमाजानें संपत्तीची इच्छा धरली पाहिजे, द्रव्य मिळविलें पाहिजे, त्याचा उपभोग घेतला पाहिजे व व्यय केला पाहिजे, ही जाणीव त्यांस होती. त्यांचा येऊन जाऊन जो काय उपदेश होता तो इतकाच कीं, इच्छा धरावी, पण अतितृष्णा धरूं नये. पैसा मिळवावा, पण तो सदुपयोगाकरितांच मिळवावयाचा, असें मनांत बाळगावें. "मूढ जहीहि धनागमतृष्णां, कुरु तनुबद्धे मनसि वितृष्णां" याचा अर्थ "पैसा मिळवूं नको" असा नव्हे. 'पुत्रादपि धनभाजां भीतिः' या वाक्यावरून नियमाचा नव्हे, तर केवळ अपवादाचाच बोध घेण्याचा आहे.

आम्हांस तर असें वाटतें कीं, अर्थशास्त्रीय ग्रंथांचा अभाव याचा संबंध केवळ धर्मविषयक कल्पनांकडेच नेहमीं लागतो असें नाहीं. या गोष्टीचें प्रत्यन्तर हिंदुस्थान सोडून इतर देशांचें उदाहरण घेतलें असतांही मिळणार आहे. हिंदुस्थानांत कचित् खोटा वेदान्त आणि जातिभेद बोकाळला असल्यानें अर्थशास्त्राच्या विषयास महत्त्व आलें नसेल. पण ग्रीक, रोम, इजिप्त, वगैरे देशांत आपणांस काय आढळतें ? याही देशांत हीच स्थिति. अर्थशास्त्राच्या इतिहासकारांनीं जुन्या काळाविषयीं असा सरसकट शेरा मारलेला आढळतो कीं, ज्या राष्ट्रांत धर्म, कायदा, राजनीति जीवतत्वज्ञान उदयास आलें, अशा सर्वच राष्ट्रांत प्राचीनकाळीं द्रव्योत्पादनाच्या कलेसंबंधानें अनादर दिसून येतो. येऊन जाऊन एक धंदा काय तो शेतकी; त्याच्याविषयीं काय तो आदर. बाकीचे सर्व धंदे म्हणजे शरीरसंपत्ति, सुखसमाधान, बुद्धि व सद्गुण यांना अपायकारक होत, अशी समजूत असे. पण खरें पाहूं गेलें, तर या समजुतीचें कारण तत्त्वज्ञान किंवा धर्म नव्हे; खरें कारण हेंच कीं, जुन्या लोकांनीं द्रव्योत्पादन करण्याचें

मनांत आणिलें असतें, तरी तें साधण्यास फारसा वाव नव्हता. आठराव्या शतकापूर्वी हजारों वर्षे द्रव्योत्पादनाचे मार्ग नियमित आणि त्याच्याच बरोबर अर्थशास्त्रविषयक कल्पनाही खुरटलेल्या ज्या आपणास दिसतात, व पुढे अवघ्या एका शतकांत या दोन्ही बाबींत जें जमीनअस्मानाचें अन्तर पडलेलें दिसतें, याचें कारण द्रव्योत्पादनाच्या मानवी इच्छेंत फरक पडला—ती पूर्वी कमी होती आणि १९ व्या शतकांत मात्र बेसुमार भडकली—असें नव्हे; तर द्रव्योत्पादनाचीं साधनेंच पूर्वी नियमित होतीं, तीं गेल्या शतकांत एकदम फैलावलीं हेंच होय. रोम व ग्रीस या राष्ट्रांत हिंदुस्थानाप्रमाणें निवृत्तिपर वेदान्ताचा पगडा बसलेला नव्हता व त्यांजवर जातिभेदाचीं बंधनेंही नव्हतीं. या राष्ट्रांनीं निरंतर युद्धें केलीं, देश जिंकले, वसाहती वसविल्या, राज्यें गाजविलीं; तात्पर्य, ऐहिक स्वार्थबुद्धीचीं सर्व लक्षणें त्याजमध्यें पूर्णपणें विनटलीं होतीं. तसेंच विद्याव्यासंग व ग्रंथकर्तृत्व हींही अमुक एका वर्गाकडेच सोंपविलीं गेलीं होतीं असेंही नाहीं. प्लेटो, ॲरिस्टॉटल् यांच्या ग्रंथांतून अर्थशास्त्रीय विषयांचा थोडथोडा उल्लेख सांपडतो; परंतु तो बराच जुजबी व किरकोळ आहे. सामान्य राजनीतींतच अर्थशास्त्राचा त्यांनीं समावेश केलेला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या दोन ग्रंथकारांनीं अर्थशास्त्राचा दुरून विचार केलेला आहे, तितका दुरून केलेला विचार इकडील जुन्या ग्रंथांमध्येंही अगदींच सांपडणार नाहीं असें नाहीं. अर्थशास्त्राचा इतिहास लिहिणाऱ्या एखाद्या ग्रंथकारानें अर्थशास्त्रांतील निरनिराळ्या बाबींसंबंधानें प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांतून चिमणीनें दाणे टिपल्याप्रमाणें माहिती टिपणें हें वेगळें; आणि अर्थशास्त्र हें स्वतंत्र शास्त्रच आहे, अशा दृष्टीनें त्याचा विचार करणें व त्यासंबंधीं ग्रंथ लिहिणें वेगळें.

**व्याख्यानें व लेख—न. चिं. केळकर.**

———

## ९. अलंकारमीमांसा.

मनुष्याच्या हातून ज्या अनेक असंबद्ध किंवा परस्परविरोधी गोष्टी होत असतात, त्यांतच अलंकारांचा समावेश करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. बोलण्यांत साधेपणाची तारीफ करीत नाहीं, असा कोण आहे? दागिन्यांत कांहीं अर्थ नाहीं; दागिने घालण्यासाठीं नाकाला, ओठाला, कानाला, भोंकें पाडणें हा रानटीपणा होय; दागिन्यांमुळें चोरांपासून त्रास होतो; लहान मुलांच्या अंगावर सोनें घातल्यामुळें त्यांच्या जिवास अपाय घडतो; दागिन्यांत पैसे अडवून ठेवल्यानें देशांतील उत्पादक भांडवलापासून व्हावा तितका फायदा होत नाहीं; दागिन्यांपासून कोणत्याही प्रकारचें खरें सुख होत नाहीं;—वगैरे पोकळ वेदांताच्या गप्पांत आम्हांस बिलकूल हंशील वाटत नाहीं, दागिने घालावयाचे नाहींत; चांगलीं वस्त्रें वापरावयाचीं नाहींत; सुग्रास अन्न खावयाचें नाहीं; सुरेख घरांत रहावयाचें नाहीं; तर करावयाचें तरी काय? सकाळपासून संध्याकाळपर्यंत जे कष्ट करावयाचे ते ओलीकोरडी भाकर, जाडाभरडा कपडा, आणि थंडीवाऱ्याचें निवारण होण्यासारखें एखादें मजबूत खोपट यासाठींच काय? यावर कोणी असें उत्तर देतील कीं, कोणतीही गोष्ट फाजील करूं नये. फाजीलपणापासून नुकसान आहे. पण यावर आमचें प्रत्युत्तर असें आहे कीं, या उपदेशाची विशेष गरज नाहीं. एकादा मनुष्य अत्यंत उपयोगी वस्तूकडे दुर्लक्ष करून अलंकारांकडे आपली सर्व प्राप्ति लावीत असला म्हणून अलंकार घालण्याच्या पद्धतीवर चाल करून जाणें अगदीं अप्रशस्त आहे. सर्व ठिकाणचे रानटी लोक सुधारलेल्या राष्ट्रांतील सर्व अज्ञान लोक, सुशिक्षित कुटुंबांतील, स्त्रिया व मुलें, या साऱ्यांस अलंकारांची मोठी हौस असते, हें अल्प अवलोकनावरून दिसून येणार आहे. उतारवय झालेल्या कांहीं मोठमोठ्या व विचारी विद्वानांस मात्र प्रत्यक्ष आपल्या अंगावर अलंकार घालण्यांत मोठीशी हौस वाटत नाहीं. कोणी काय पाहिजे तें म्हणो, अलंकारांची हौस समूळ नाहींशी होण्याचा संभव नाहीं. एका प्रकारचे अलंकार नाहींसे केले तर दुसऱ्या प्रकारचे अस्तित्वांत येतील. उच्च धातू वापरण्याचा प्रघात कमी झाल्यास लत्ताकपड्यावर अधिक खर्च होऊं लागेल व दोहींच्या फेऱ्यांतून सुटलों तरी

घरांवर, घोड्यांवर, नोकरांवर, किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्या तरी ताब्यांतल्या वस्तूंवर अलंकार व वस्त्रें चढवून त्या आपल्या सभोंवतीं ठेवण्यांत व त्यांच्याकडे पाहण्यांत मनुष्यांना आनंद वाटत राहील.

ज्याच्या योगानें वस्तूचें रूप विशेष खुलल्यासारखें वाटतें, त्यास आपण अलंकार असें म्हणतों; पण प्रस्तुत लेखांत अलंकाराची थोडी मर्यादित व्याख्या करणें जरूर आहे. मूळचें स्वरूप अधिक चांगलें दिसण्यासाठीं मौल्यवान् धातूच्या व पाषाणांच्या ज्या नाना तऱ्हेच्या चिजा स्त्रीपुरुषें अंगावर घालतात, त्यांसच येथें अलंकार असें समजून त्यांविषयीं थोडी चर्चा करूं.

अलंकारांपासून स्वाभाविक सौंदर्याच्या मोहकपणांत भर पडते असा सर्वांचा अनुभव आहे. आपण दुसऱ्याला प्रिय व्हावें अशी मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. दागिन्यांमुळें स्वाभाविक सौंदर्यांत खरोखरींच भर पडेनाशी होईल, निदान पडत नाहीं असें वाटूं लागेल, तेव्हांच हा मनुष्यास लागलेला दागिन्यांचा नाद सुटण्याचा संभव आहे.

दागिन्यांवर मनुष्यांचें इतकें प्रेम बसण्याचें दुसरें एक कारण असें आहे कीं, त्यामुळें आपण श्रीमंत आहों, असें इतरांस सहज रीतीनें दाखवितां येतें. दहा पांच हजारांच्या नोटा आंगरख्यावर किंवा लुगड्यावर चिकटवल्या तर तो हेतु सिद्धीस जाणार आहे, हें खरें आहे. पण तसें केल्यानें सौंदर्यांत भर न पडतां, तें उलट विद्रूप दिसण्याचा संभव आहे. तेव्हां सौंदर्याला मदत होऊन, पुनः श्रीमंती दाखवितां येण्यास अलंकार घालण्यासारखें दुसरें साधन नाहीं. शिवाय, एकदां दागिन्यांचा पक्का नाद लागला म्हणजे काटकसर करण्याची सवय लागते, आणि तीमुळें दुर्व्यसनांत किंवा दुसऱ्या कोणत्याही वाईट गोष्टीकडे खर्च करण्याची इच्छा होत नाहीं, हा आणखी एक फायदा आहे. तसेंच, एखादा प्रसंग गुदरला असतां, दागिने जसे उपयोगीं पडतात, तसें दुसरें कांहींएक उपयोगास येण्याचा संभव नाहीं. व्यापारांत घातलेला पैसा पाहिजे तेव्हां हातीं येऊं शकत नाहीं, इतकेंच नाहीं तर बुडण्याची भीति असून, त्याचे योगानें रूपाला मोहकता आणण्यास कांहींच साहाय्य मिळत नाहीं. ब्यांकेतला पैसा पाहिजे तेव्हां हातीं येण्यासारखा

असतो, पण ठुशीच्या जागीं का ‘ ब्यांकबुक ’ घालतां येणार आहे ? तात्पर्य, दागिने ही एक प्रकारची अत्युत्तम ठेव आहे. ह्या ठेवीपासून सौंदर्यवृद्धि होत असून खेरीज अनेक फायदे होतात.

कोणी असें म्हणतात कीं, दागिन्यांत पैसा घालण्यापेक्षां तो वस्त्र-प्रावरणांत खर्चणें विशेष इष्ट आहे; कारण कापड दागिन्यांपेक्षां विशेष उपयोगाचें व सुखाचें आहे. पण यास एक असें उत्तर आहे कीं, शीत कटिबंधांतले लोक अवश्यकतेमुळें आपल्या पैशाचा चूर पेहरावांत करतात, म्हणून आम्हीं उष्ण कटिबंधांतील लोकांनींही तसेंच करीत सुटावें हें योग्य नाहीं. अवश्य असेल तेवढा पैसा कपडयांत खर्च करण्यास आमची हरकत नाहीं. पण अवश्यकतेबाहेर जितका पैसा वांचेल, तितका सारा कपडयापेक्षां असंख्यपट अधिक टिकाऊ आणि उपयोगी अशा अलंकारांत खर्चणें हेंच प्रशस्त आहे. कपडा, दागिन्याइतका टिकाऊ नसल्यामुळें त्यांतील पैशाचा व्यय लौकर होतो व दागिन्यांतील पैसा फार दिवस टिकतो. वस्त्र जुनें झालें म्हणजे त्यापैकीं कांहींच हातीं लागत नाहीं; जुन्या दागिन्यापासून रुपयाचे आठ आणे तरी मिळतात ! तेव्हां वस्त्रावर फार खर्च न करितां तो दागिन्यांत करणें विशेष प्रशस्त आहे.

दागिन्यांमुळें चोऱ्या व खून होतात, म्हणून दागिने घालूं नयेत, असें म्हणणें म्हणजे आगगाडया व आगबोटी यांस अपघात होऊन प्राणहानि होते, म्हणून प्रवासाच्या कामीं त्यांचा कधीं उपयोग करूं नये, असें प्रतिपादण्यासारखेंच आहे. लोक दरिद्री नसतील व सुशिक्षित आणि सद्‌गुणी असतील आणि पोलिसाचा बंदोबस्तही चांगला असेल, तर सुदाम्याच्या घराप्रमाणें कुबेराचें घर व शरीर कां सुरक्षित असूं नये, हें सांगतां येणार नाहीं. ऐषआरामाच्या वस्तूंत दागिन्यांचा समावेश होतो. जेथें राष्ट्र आहे, तेथें थोडाबहुत ऐषआराम असलाच पाहिजे. देशकालानुरोधानें या ऐषआरामाची तऱ्हा निराळी असेल; पण जेथें मुळींच ऐषआराम नाहीं, असें राष्ट्र सांपडावयाचें नाहीं. आम्ही हिंदुलोक दागिन्यांत म्हणजे एका प्रकारच्या ऐषआरामांत थोडाबहुत पैसा खर्च करतों, हें खरें आहे; पण हा खर्च प्राप्तीच्या मानानें इतर लोकांच्या ऐषआरामा-

कडे होत असलेल्या खर्चाहून फार कमी असून, प्रसंग पडेल त्या वेळेस या खर्चाच्या बऱ्याच भागाचा पैसा करतां येतो, हा यांत एक विशेष फायदा आहे, असें प्रसिद्ध दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या एका निबंधांत सिद्ध करून दाखविलें आहे. ‘ काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत सुरक्षितपणें प्रवास करतां येण्यासारखा ’ पोलिसाचा बंदोबस्त सरकार ठेवील, तर चोऱ्यांच्या आणि खुनांच्या हरकतीमुळें दागिने वापरूं नयेत, असें म्हणतां येणार नाहीं, हें उघड आहे.

तथापि या वादग्रस्त विषयाच्या संबंधानें आम्ही थोडयाबहुत समयास येण्यास, म्हणजे आमच्या प्रतिपक्ष्यांस रुचेल तर त्यांशीं तह करण्यास तयार आहों. कारण, कांहीं म्हटलें तरी जनसमूहास एकाएकीं सुशिक्षित, सुवृत्त व निर्लोभी करणें जितकें अशक्य आहे, तितकेंच ‘ काठीला बांधलेल्या सोन्यास ’ कोणीं हात लावूं नये, असा बंदोबस्त होणेंही अशक्य आहे. तेव्हां दागिन्यांपासून होणारा फायदा तेवढा साधून, नुकसान टाळतां येईल, अशी युक्ति कोणीं सुचविली, तर ती स्वीकारण्यास लोकांनीं एका पायावर उभें असलें पाहिजे. ही युक्ति फार सोपी आहे. खरे दागिने न घालतां खोटे दागिने घालावे म्हणजे झालें ! असें केलें असतां श्रीमंतापासून गरीबापर्यंत पाहिजे त्याला दागिन्यांपासून सौंदर्यास होणाऱ्या मदतीचा फायदा घेतां येऊन, शिवाय आपल्या मगदुराप्रमाणें लत्ता कपडयावर अधिक खर्च करण्यास सवड सांपडेल, इतकेंच नाहीं तर देशांतील बरेंच धन दागिन्यांत अडकून पडल्यामुळें त्याचें नुकसान होत आहे, असें ज्यांचें म्हणणें आहे, त्यांचीही दागिने वापरण्यास असलेली बहुतेक हरकत दूर करतां येणार आहे ! एकदां हा खोटे दागिने घालण्याचा प्रघात रूढ झाला, म्हणजे त्यांसाठीं घरें फोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें चोरलोकांस समजून येईल आणि द्रव्यलोलुप लोक लहान मुलांचे खून करण्यास प्रवृत्त होणार नाहींत ! यावर कोणी आक्षेप घेतील कीं, लहानथोरांच्या बायका सारख्याच श्रीमंत दिसूं लागल्या तर, धनाढ्यांनीं आपली श्रीमंती कशी दाखवावी ? या प्रश्नास आमचें प्रत्युत्तर येवढेंच आहे कीं, अलंकारांनीं देह अलंकृत करणें, हा त्यांचा आद्य उपयोग आहे. त्यांपासून होणारीं इतर कामें केवळ आनुषंगिक आहेत.

तेव्हां त्यांचेकडून मुख्य काम करून घेऊन बाकीचीं कामें साधण्यास दुसऱ्या तोडी काढाव्या, हें योग्य आहे. श्रीमंतांनीं पाहिजे तर आपल्या लत्ताकपडयानें आपली श्रीमंती दाखवावी अथवा लोंकर व कापूस आणि यंत्रें यांच्या समृद्धीनें श्रीमंती दाखविण्याचें तें द्वारही बंद झालें असेल तर त्या लोकांनीं आपल्या कपाळावर 'आमच्यापाशीं इतकी माया आहे' अशा अर्थाचीं अक्षरें गोंदून घ्यावीं किंवा त्यांना सुचेल तसला दुसरा एखादा उपाय काढावा अथवा जबाबदारी पतकरून खरे दागिने वापरीत रहावें! मात्र तसें करतांना इतकें ध्यानांत ठेवावें कीं, दिसण्यांत खऱ्या व खोटया दागिन्यांत म्हणण्यासारखा फरक दिसत नाहीं; इतकेंच नव्हे तर, सौंदर्याची उठावणी करण्यांतही दोहोंचा सारखाच उपयोग असल्यामुळें, गरीबांच्या बायका श्रीमंतांच्या बायकांप्रमाणें कसले बसले सारे दागिने वापरूं लागल्या म्हणजे श्रीमंतांच्या बायकांच्या अंगावर असलेल्या खऱ्या दागिन्यांपासून त्यांस म्हणण्यासारखा कोणताही फायदा होणार नाहीं!

**सुधारकपत्र—गो. ग. आगरकर.**

---

## १०. जयाप्पा शिंद्यांची मारवाडवरील स्वारी.

[ मारवाडचा राजा अजितसिंग याचा वडील मुलगा जोधपुरच्या गादीवर इ. स. १७२५ मध्यें बसून १७५० मध्यें वारला. त्याचा मुलगा रामसिंग हा दुर्बल व दुराचारी असल्यामुळें, त्याच्या चुलत्यानें गादी बळकावली व त्याच्या मागें त्याचा मुलगा विजयसिंग यानेंही मल्हारराव होळकरांच्या भिस्तीवर बापाचाच कित्ता गिरविला. रामसिंग हा पदच्युत होऊन अजमिरास राहात असे; पण तेथेंही त्याला विजयसिंगाकडून मधून मधून उपद्रव पोंचत असे. ]

असें जाणोन त्याजकडील चैतराम वकील होता, त्यास बोलावून (रामसिंगानें) विचार केला कीं, 'आतां वैरियानें अगदीं राज्यमदें लोभास गुंतोन आम्हांस निर्माल्यवत् ठेविलें. असें जगावें याहून प्राणत्याग करावा हें उत्तम. दोहींतून एक अर्थ करावा.' तेव्हां चैतराम यानें

उत्तर केलें कीं, ' महाराजाची हांडी उतरावी आणि आपली हांडी चढवावी. तुम्ही संस्थानी राजपुत्र, त्यांत हटेले हाडे राजपूत. ' हिंमत मर्दा, मदत खुदा. ' मारतां मारतां मरावें, परंतु केवळ आजिज होऊं नये. तुम्हांस मसलत करणें, तरी मसलत एक मात्र आहे. दक्षण देशांतील गनिमांची प्रबलता झाली आहे. त्यांस निमें राज्य द्यावें आणि आपलें साध्य करून घ्यावें. त्यास प्रस्तुत गनिमाची फौज कुंभेरीस लागली आहे. होळकरांचे हातून कार्य करून घ्यावें, तरी ते बिजेसिंगाचे स्नेही होत. आतां नेकजात एक जयाजी शिंदे मात्र आहेत. त्यांस पगडीभाई करून त्यांचे हातोन कार्य करोन घ्यावें. ' म्हणोन मनसबा खचित करून इमान प्रमाण, बेलभंडार व शिरींची पगडी चैतराम यासमागमें जयाजी शिंदे यांजकडे पाठविली. तो कुंभेरीस येऊन शिंदे यांस भेटून, येथील कच्चापक्का वृत्तांत सर्व निवेदन केला आणि राजियाचे डोईची पगडी जयाजी शिंदे यांचे डोईस घातली आणि त्यांची पगडी आपणापाशीं घेतली. खुरनीस करून जाबसाल केला कीं, ' आम्ही रोड, दुर्बळ म्हणून तुम्हांस शरण आलों. आतां मान–अभिमानाचे धनी तुम्ही आहां. ' म्हणोन उत्तर केलें. ( यावरून ) शिंदे यांनीं कूच करून दरकूच मारवाड प्रांतावर चाल केली.

हें वर्तमान बिजेसिंग यानें ऐकून आपली फौज जमा करून नागूर सोडून चार कोस येऊन राहिला. समागमें पंधरा हजार फौज व दहा हजार पायदळ व पन्नास तोफा व पंचवीस गंजिफियाच्या गाड्या व शंभर उंट बाणांच्या कैच्या, पांचसातशें उंटांवर सुतरनाले व जेजाला, बरकंदाज, युद्धास सिद्ध जाले. ते राठोड रजपूत हाडे, परम हाटेले, त्यांचे ध्यानांत गनिमांची फौज नाहीं. हें वर्तमान जयाजी शिंदे यांनीं ऐकून तमाम उमराव यांस बोलावून विचार केला कीं, ' मारवाडी हाटेले रजपूत, महापराक्रमी, शिरच्छेद झाला तरी कबंध नाचतें. त्यांचे मर्दुमकीची शर्थ तों या प्रकारची. आम्हांकडील गनीम यांचे आधींच कच्चे दील, गोडहत्यारी, निसवले तरी, झाडास बांधले तरी झाड घेऊन जातील ! आणि आम्ही तों प्रतिज्ञापूर्वक राजश्री रघुनाथराव दादा यांजपासोन निघालों, आणि जन्मादारभ्य मल्हारराव यांचे जुगांतून निघालों. एकजागा होतों

तेव्हां यशअपेश आलें, तरी त्याचा खेद नव्हता. आतां अपेश आलें तरी पुनः त्यांस तोंड तरी कसें दाखवावें ? ' हें ऐकून दत्ताजी शिंदे भीमबहाद्दर आणि लहानथोर सरदार यांनीं हिंमत दिली कीं, ' पुण्यप्रताप श्रीमंत नानासाहेब यांचे पदरीं आहे आणि तुम्ही एकनिष्ठ सेवा करीत आहां. ईश्वर यश देईल. आम्ही तेथून रामसिंग याचा अंगीकार करून आलों आणि बिजेसिंग युद्धास आला, म्हणोन नामोहरम व्हावें, तरी जालेपणाचें सार्थक काय ? नामर्दुमकीची जघन्यता होईल ! युद्ध करावें यांत यशअपेश शूराचा वांटा. याची क्षिती काय ? ' युद्ध करावें असा निश्चय ठरला.

त्यांस यांस दहा कोशांचा छाटा होता. यांनीं स्नानें करून तमाम एकमेकांस निरवानिरव करून तमाम अंगांत चिलखतें व बक्तरें घालून, जिरेटोप पेटया बांधून, दारूगोळा लोकांस वाटून, तंगवार करून मुहूर्तें सिद्ध होऊन चालिले. मार्गीं शकूनही चांगले झाले. तेव्हां अधिकच हिंमत येऊं लागली. तीस हजार फौज होती. त्यांची निवड करून दोन भाग केले. एकीकडे दत्ताजी शिंदे झाले आणि एकीकडे जयाजी शिंदे झाले. दोन्ही सैन्यांच्या गांठी पडल्या. बिजेसिंग यानें तमाम आपले फौजेंत ताकीद करून, बमय सामान सिद्ध झाले. भोंवतीं रिसाला, तोफा वगैरे तयार झाले. जोंपर्यंत आंगाशीं आंग लागलें नव्हतें तों तोफांचे मार व हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व रेकले व गंजिफियाच्या गाडया व बरखंदाज अशी एकदांच सरबत्ती झाली. बाणांचा वर्षाव मेघाप्रमाणें झाला. मोठा कडाखा झाला. धुराची व धुळीची धुंदी झाली. कोणाचें तोंड कोणाचे दृष्टीस पडेनासें झालें. यंत्रांच्या धडाकियाखालीं घोडीं-मनुष्यें बधिर झालीं. क्षणभर अशी गर्दी होऊन दोहींकडून ' हर ! हर ! ' म्हणोन एकदांच घोडे घातले. दोहींकडून घोडियांचीं तोंडें आंत शिरलीं. ते समयींचा कडाखा, तेथील अनुभविक असतील त्यांस ठाऊक असेल. ऐशी आग जाली. नंतर आगीचा मार राहून तरवारींची खणाखणी झाली. त्यांत ते आधींच रजपूत, त्यांत मारवाडी हाडे, त्यांचे मर्दुमीचें नवल नाहीं. परंतु मराठियांनीं फार शर्थ केली. असें युद्ध गनिमांत कोणीं केलें नाहीं. मल्हारराव यांचे इरेनें दांतानिकीस येऊन मोठ-

मोठे खेतांत येऊन जीवा—अधिक केली. मोठा प्रलय जाहला. न भूतो न भविष्यति. पांचसातशें भले चांगले लोक गनिमाकडील ठार झाले. जखमीघायाळ दोन अडीचशें मनुष्यें झालीं. पांचसातशें घोडींही पडलीं. मारवाडियाकडील दोनअडीच हजार मनुष्यें ठार जालीं. तोफा व रिसाला कांहीं पाडाव केला. ऐसा प्रळय जाला ! परंतु, धन्य ! रजपुताची माय रजपुतासच व्याली ! असें गनिमास होतें, तरी धुरोळा दृष्टीस पडूं न देते. त्यांत गनीम यांचा उत्कर्ष, चढती सद्दी ! नाहीं तरी मारवाडियांसी तंबी पोहोंचवावी असें नव्हतें. त्यांतही हाटेले रजपूत; जैसा मोटेचा बैल सरतो, तैसे मार खातच खेती सोडून, आपले मुर्दे संभाळोन, दोन कोस माघारे निघाले. शिंदे यांणीं ती जागा फत्ते करून साहाजनें वाजवीत खेतीवर उभे राहिले; आणि आपले भले लोकांचे मुर्दे जमा करून, अग्नप्रसाद दिला. घाया-ळांच्या जखमा बांधोन परम खुशाली केली. तो आनंद पत्रीं लिहून कळवावा तो काय ? तेथें असतील, ते अनुभाविक जाणतील शिंदे यांस असें जालें कीं, मल्हारराव यांजपासून निघालियास ईश्वरें अबरू राखिली. जन्माचें सार्थक जालें ! म्हणोन रात्री तेथें मुकाम केला. रात्रौ भोंवतालें छबिन्यांस राऊत उभे केले. मारवाडियांस वेढावयास अवसान राहिलें नाहीं. त्यांची फौज शिकस्त जाली. हिंदुस्थानांतील स्वधर्म कीं, फौज मोडली, तरी दोन चार गांवें पळावें लागत नाहीं. खेती, म्हणजे रण, सोडून गोळीची खास्त निघाले, तरी नामोहरम जाले. मारवाडियांनीं अपजय जाणून रात्रौ नागुरांत पोंचले. मारवाडियांस समोरच जखमा होत्या, त्यांच्या स्त्रियांनीं काया कुरवंडी करून जयजयकार केला. ज्यांस पाठीवर जखमा होत्या, त्यांच्या स्त्रियांनीं पतीचे त्याग केले. मारवाडप्रांतीं दस्तूर हाच कीं, समूर घाव घेतला तरी उत्तम, नाहीं तरी पुरुषांचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये ! रजपूत स्त्रियांची हिंमत या रीतीची, तेथें पुरुषांची शिफारस कोठवर लिहावी !

—भाऊसाहेबांची बखर.

———

## ११. आतिथ्य.

आपला जीव जसा आपल्याला अत्यन्त प्रिय, त्याचप्रमाणें इतरांसहीं त्यांचा जीव प्रिय असतो. सुखदुःखाचा अनुभव जसा आपल्यास, तसा इतरांसही असतो. हें जाणून विचारी मनुष्यानें, अतिथि प्राप्त झाला असतां, त्याचा सत्कार करावा. पांथस्थ मार्गक्रमण करीत असतां श्रमून मध्याह्नकाळीं एकाद्या गांवाच्या समीप आला म्हणजे त्यास किती आनंद होतो ! व आपण एकाद्याच्या घरीं जाऊन विश्रान्ति घेऊन, क्षुधेतृषेचा परिहार करूं, अशी केवढी आशा धरून तो आपल्या घरीं येतो बरें ? अशा स्थितीमध्यें जो आपल्या घरीं येतो, त्याचा यत्नेंकरून आपण सत्कार केला पाहिजे. तो अतिथि, एवढ्याच कारणानें आपल्या सत्कारास पात्र होय; मग तो कोणत्याही वर्णाचा किंवा जातीचा असो.

अतिथीची क्षुधा, तृषा व श्रम, यांचा परिहार करावा, हें तर आपलें पहिलें कर्तव्य कर्म होय परंतु, त्याचा पूर्ण सत्कार करणें म्हणजे त्याकडे आनंदित मुद्रेनें पहावें, मनापासून त्याचा आदर करावा, मधुर वाणीनें त्यापाशीं भाषण करावें, आपला समागम त्यास सुखप्रद करावा व तो आपला निरोप घेऊन जाऊं लागला असतां त्याच्या मागें चार पावलें जाऊन त्याची बोळवण करावी; हा अतिथि-यज्ञ होय; व पूर्वोक्त पांच प्रकारची त्याची सेवा, ही त्या यज्ञाची पांच प्रकारची दक्षिणा होय. या प्रकारें अतिथीचा सत्कार करणें, हें गृहस्थास अत्यन्त श्रेयस्कर होय.

आतां अतिथि कोणास म्हणावें, या गोष्टीचा विचार केला पाहिजे. गांवांतल्या गांवांत आळसानें आपला काळ क्रमण करणारा व चांगला सशक्त व सुदृढ असून आपल्या उदरनिर्वाहार्थ कांहींच यत्न न करणारा, दुपारच्या वेळीं कोणाच्या तरी घरीं भोजनाच्या इच्छेनें जाणारा, तो खरा अतिथि नव्हे; किंवा परस्थ असूनही चांगला सशक्त व सुदृढ असतां आपल्या उदरनिर्वाहार्थ कांहीं उद्योगधंदा न करितां, गांवोगांव फिरून आपली उपजीविका करणारा, तोही खरा अतिथि नव्हे; किंवा एकाद्या गृहस्थाच्या घरीं आल्यागेल्याचा सत्कार चांगला होतो, म्हणून बुद्धिपुरःसर कधीं कधीं त्याच्या घरीं केवळ अन्नार्थी जाणारा, तोही खरा अतिथि नव्हे. खरा अतिथि तोच होय कीं, जो प्रसंगवशात् परस्थ व पांथस्थ

असून केवळ नाइलाजामुळें प्रवासांत अकस्मात् एकाद्याच्या घरीं आश्रयास जातो. असा अतिथि मार्गामध्यें श्रान्त होऊन अनोळखी ठिकाणीं आला असतां, त्यास संतोषानें जो भोजनादिक समर्पण करतो, त्यासच खरी पुण्यप्राप्ति होते. ही अतिथिभक्ति थोडीबहुत सर्व देशांमध्यें प्राचीन काळापासून चालू आहे. परंतु या देशामध्यें आतिथ्याविषयीं लोकांच्या मनामध्यें जितकी निष्ठा आहे, तितकी अन्यत्र कोठें असल्याचें ऐकिवांत नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं प्रवासाचा अनुभव थोडासा घेतला आहे, त्यांस आपल्या देशांत जेथें आदरानें आतिथ्यसत्कार होतो अशीं थोडकीं स्थळें आढळलीं असतील असें नाहीं. अशा स्थळीं घरांत कशीही अडचण असली व एकाच वेळीं अतिथि कितीही आले तरी त्यांचा कंटाळा न करितां यजमान त्यांचा यथाशक्ति सत्कार केल्यावांचून त्यांस जाऊं देत नाहीं.

आजकाल अदृश्य होत चाललेल्या पिढीच्या अंगीं हा मोठा स्तुत्य गुण आपल्या पाहण्यांत आलेला आहे. अलीकडे मात्र मनुष्यमात्रानें आपापल्या निर्वाहाची तजवीज करावी व दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये, ही जी अगदीं आवश्यक समजूत होत चालली आहे, त्या समजुतीच्या ओघांत हा अतिथि–भक्तिरूप पूर्वोक्त गुण प्रायः एक प्रकारें नष्ट होत चालला आहे, ही मोठी खेदकारक गोष्ट होय. अतएव ज्यांस आपल्या देशांतील प्राचीन प्रशस्त रूढी व आपल्या लोकांमधील प्राचीन काळापासून परंपरागत चालत आलेले सद्गुण यांचें संरक्षण व्हावें, असें वाटत असेल त्यांनीं प्रयत्नेंकरून 'अतिथिदेवो भव' या शास्त्राज्ञेचें यथाशक्ति परिपालन करून आपल्या देशांत विशेष प्रचारांत असलेला आतिथ्यरूप जो धर्म, त्याचा सहसा लोप होऊं देऊं नये.

आपल्या घरीं आश्रयास कोणी आला असतां त्यास परत लावूं नये, हें गृहस्थाचें व्रत होय.

—वामन आबाजी मोडक.

---

## १२. ऐतिहासिक कादंबऱ्या.

गतकालीन गोष्टींच्या वृत्तांतालाच इतिहास ही संज्ञा बहुधा आपण लावितों. म्हणून ' ऐतिहासिक ' ही संज्ञाहि अर्थातच गतकालीन व्यक्ति व घटना यांचें चित्र रेखाटणाऱ्या कादंबऱ्यांनाच विशेषतः लावण्यांत येते. ' ऐतिहासिक ' या विशेषणावरून जर कोणी अशी समजूत करून घेईल कीं, या कादंबऱ्यांतील सगळीं पात्रं व सगळ्या घटना भूतकाळांत प्रत्यक्ष झालेल्या होत्या किंवा सत्यकथनाशिवाय या कादंबऱ्यांतून दुसरें कांहीं दिसावयाचें नाहीं, कल्पनेला त्यांत कांहीं वाव नाहीं तर ही समजूत निखालस चुकीची म्हटली पाहिजे. कारण, मग इतिहास आणि कादंबरी यांच्यांत भिन्नताच राहिली नसती आणि जर राहिली असती तर ती केवळ लेखनपद्धतीपुरतीच. ऐतिहासिक कादंबऱ्यांतून कल्पनेला कांहीं थोडाथोडका वाव असतो असें नाहीं, हें स्कॉटच्या कादंबऱ्यांचीं मराठींत झालेलीं भाषांतरें किंवा रूपांतरें आणि हरिभाऊ आपट्यांच्या उषःकाल, रूपनगरची राजकन्या इ० कादंबऱ्या मूळ इतिहासाशीं ताडून पहाणारांना सहज कळण्यासारखें आहे. ऐतिहासिक कादंबऱ्यांवर ऐतिहासिक सत्याचा निर्बंध असला पाहिजे ही गोष्ट खरी आहे; पण तो निर्बंध इतका कडक नसावा कीं, तो कादंबरीचें कादंबरीत्वच नष्ट करून टाकील. त्या निर्बंधाला कांहीं मर्यादा आहे. ही मर्यादा कोणती तें आपण पाहूं.

प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, इतिहास व ऐतिहासिक कादंबऱ्या यांचे उद्देशच भिन्नभिन्न आहेत. इतिहासाला एकाद्या विशिष्ट काळांतल्या घटनांविषयीं सत्यनिर्णय करून तत्कालीन स्थितीचें सत्यचित्र वाचकांपुढें मांडावयाचें असतें; कादंबरीची दृष्टि पूर्ण सत्याकडे नसते, सामान्य सत्याकडे असते. मनुष्यस्वभाव, समाजाच्या उन्नतावनत स्थितीचीं तत्त्वें, त्यांचा विकास आणि बाह्य सृष्टि व माणसांची अन्तः-सृष्टि यांचा अन्योन्य संबंध इ० गोष्टी उदाहरणांच्या द्वारें मनोरंजक रीतीनें दाखविण्यापुरतें साह्य ती इतिहासापासून घेते. ऐतिहासिक कादंबरीकाराला इतिहासकार व्हावयाचें नसतें; कवीचें काम करावयाचें असतें. अर्थात् इतिहासाच्या कडक निर्बंधापुढें त्यांना मान वांकविण्याचें

कारण नाहीं; तशी त्यांच्यापासून अपेक्षा करणें योग्यहि होणार नाहीं. इतिहासाशीं विरोध न करतां तें काम त्याला यथास्थितपणें करतां आलें तर उत्तमच; पण रसपरिपाकासाठीं वेळेस इतिहासाच्या तंगड्या त्याला मुरगळाव्या लागल्या तरी त्याबद्दल त्याला कोणी दोष देणार नाहीं. तथापि ऐतिहासिक कादंबरीकारानें या स्वातंत्र्याचा दुरुपयोग मात्र करतां कामा नये. कारण नसतांना त्यानें इतिहासावर अत्याचार केला तर तो गुन्हेगार ठरेल हें सांगणें अवश्य आहे. उदाहरणार्थ, रामायणाच्या कथेवर कादंबरी लिहिणारानें श्रीरामचंद्राला दुष्टबुद्धि, कपटी, अन्यायी किंवा दुराचरणी बनविलें आणि रावणाला साधूच्या स्वरूपांत दाखविलें, तर त्यानें स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला असें होईल. हा अपराध त्यानें इतिहासाचा खून केला म्हणून नव्हे, तर काव्याचा खून केला म्हणून, साहित्य-राज्यांतल्या पीनलकोडांतल्या रसहानीच्या कलमाखालीं येईल. कारण, श्रीरामचंद्र व रावण यांच्या संबंधाच्या लोकांच्या ज्या प्रचलित समजुती आहेत, त्यांच्या विरुद्ध जाण्यानें रसभंग होतो. या रसाला आपल्या साहित्यशास्त्रांत जरी समर्पक नांव नसलें, (मी याला इतिहासरस असें नांव देतों), तरी या प्रकारांत रसहानि होते, हा प्रत्येकाचा अनुभव आहे. रामासारख्या ऐतिहासिक व्यक्तीला विद्रूप करणारी कादंबरी वाचतांना वाचक तोंडें वेडीवांकडीं करतील. वाचकांची वृत्ति कथानकाशीं तल्लीन होणार नाहीं. लेखकाची व वाचकांची वृत्ति समरस व्हावयाला पाहिजे ती होणार नाहीं. सारांश काय कीं, सर्वविदित अशा इतिहासविषयक गोष्टीं-संबंधींच्या समजुतींना धक्का न बसेल अशा विषयींची पूर्ण खबरदारी घेऊन बाकीच्या अप्रसिद्ध गोष्टींचा कादंबरीकारानें कितीहि विपर्यास केला, तरी जोंपर्यंत त्यानें रसपोषण होत आहे तोंपर्यंत तो करण्यास कादंबरीकाराला मुभा आहे असें म्हटलें पाहिजे.

ऐतिहासिक कादंबऱ्यांसंबंधानें आणखी कांहीं प्रश्न वेळोवेळीं उपस्थित होतात. त्यांच्याही संबंधानें येथें थोडासा ऊहापोह करणें अवश्य दिसतें. एक प्रश्न असा विचारण्यांत येतो कीं, इतिहास म्हणजे राजघराणीं, युद्धें, कारस्थानें, रक्तपात, तह किंवा लूटमार यांचा वृत्तांत. ही इतिहासाची जुनी कल्पना अत्यंत संकुचित आणि चुकीची अतएव

त्याज्य आहे, ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली असतां अजून आमचे ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखक तिलाच उराशीं कां धरून बसले आहेत ? अशोक, बुद्ध, विक्रमादित्य, शिवाजीमहाराज किंवा माधवराव पेशवे यांच्या वेळची किंवा सध्यांच्या काळची सामाजिक, धार्मिक किंवा औद्योगिक स्थिति वर्णन करणारी कादंबरी कोणी कां लिहीत नाहींत ? तिला लोक ऐतिहासिक समजणार नाहींत अशी भीति लेखकांना कां वाटावी ? कादंबरी हेंच मुळीं जर पाश्चात्यांचें अनुकरण आहे, तर तें करीत असतांना जुन्या वळणाला चिकटून राहण्याची आपल्या लोकांची संवय कां सुटत नाहीं ? धामधुमीच्या काळांत युद्धें, वीरांचे पराक्रम आणि कारस्थानें यांच्याविषयींची वाचनाभिरुचि लोकांत असणें स्वाभाविक आहे. पण सध्यांच्या शांततेच्या काळांत अशा प्रकारच्या कादंबऱ्यांना ऊत काय म्हणून यावा ? अशा प्रकारच्या कादंबऱ्यांपासून सध्यांच्या काळीं समाजाचें कोणतें मोठेंसें हित होणार आहे ? हल्लींच्या काळांत सद्यःकालीन स्थितीच्या विवेचनपर कादंबऱ्याच लोकांत जागृति उत्पन्न करण्याला अधिक उपयोगी पडतील; नाहीं काय ?

हा प्रश्न कादंबरीकारांनीं खरोखर विचार करण्यासारखा आणि महत्त्वाचा आहे. बौद्धकालीन किंवा मध्ययुगीन कालांतल्या समाजस्थितीवर मराठींत अगदींच थोड्या कादंबऱ्या झालेल्या आहेत यांत शंका नाहीं. पण त्याचें कारण, तत्कालीन स्थितीवर प्रकाश पाडणारा इतिहासच फारसा उपलब्ध नाहीं हें होय. शिवाय आम्हां महाराष्ट्रीयांची दृष्टि अद्यापि थोडीशी संकुचित आहे. जें शौर्य रणसंग्रामांतच दाखविण्यांत येतें त्यालाच आम्ही लोक विशेष मान देतों, आणि त्याचा गौरव करितों. धार्मिक किंवा इतर बाबतींत लोकांचा छळ सोसून सत्याचें पालन करणाऱ्याचे ठायीं दिसून येणारें नैतिक धैर्य आमच्या दृष्टींत तितकें भरत नाहीं. म्हणून मराठींतल्या ऐतिहासिक कादंबऱ्या बहुधा मराठे किंवा रजपूत वीरपुरुषांच्या चरित्रांवर लिहिलेल्या दिसतात. सद्यःस्थितीच्या विवेचनपर कादंबऱ्या होणें सर्वतोपरी इष्ट आहे. त्यांपासून लोकशिक्षणाचे कामीं मोठें साह्य होण्यासारखें आहे. पण अशा कादंबऱ्यांना ऐतिहासिक न म्हणतां वस्तुस्थितिनिदर्शक कादंबऱ्यांच्या सदराखालींच घालणें जास्त सयुक्तिक होईल असें वाटतें.

ऐतिहासिक कादंबरी लिहूं पाहणारांच्या पुढें दुसरा एक असा प्रश्न उभा राहतो कीं, ऐतिहासिक व्यक्तींच्या संबंधानें लिहितांना एकाच व्यक्तीला प्राधान्य देऊन त्याच्या चरित्रांतला विशिष्ट भाग कादंबरीरूपानें वर्णावा? कीं त्या व्यक्तीला निमित्त करून तत्कालीन समाजस्थितीचें चित्र रेखाटणें हें उद्दिष्ट डोळ्यांपुढें ठेवावें? उपयुक्ततेच्या दृष्टीनें विचार केला तर दुसरें उद्दिष्ट ठेवणें जास्त श्रेयस्कर दिसतें; पण कलेच्या दृष्टीनें पहिलें उद्दिष्ट कथानकाच्या रचनेला अधिक सोयीचें असतें. कारण, एका व्यक्तीच्या चरित्रावर लेखकाला व वाचकालाहि आपल्या दृष्टीची जशी एकाग्रता करतां येते, तशी समाजस्थितीच्या व्यापकतेमुळें तिच्यावर करतां येणार नाहीं. समाजस्थितीला अनेक अंगें आहेत. त्या सगळ्या अंगांचें सामुदायिक चित्र काढणें हें बाजाराचें चित्र काढण्यासारखें होणार आहे. समाजस्थितीचीं चित्रें एका मुख्य व्यक्तीच्या चरित्रचित्राची पार्श्वभूमिका किंवा आनुषंगिक गोष्टी म्हणून देण्यास हरकत नाहीं. किंबहुना अशी पृष्ठभूमिका सौंदर्याच्या म्हणजे कलेच्या दृष्टीनें आवश्यकच आहे—पण त्यांना कादंबरींत मुख्य स्थान देणें इष्ट होणार नाहीं.

लेखनकला—वा. गो. आपटे.

---

## १३. औरंगजेबाच्या दरबारांत.

" मराठेशाही मीं पार धुळीस मिळविली! आज मी खराखुरा सम्राट् झालों! "

बादशहा औरंगजेबाच्या मुखांतून आनंदाचे उद्गार बाहेर पडले! नुकताच तो आपल्या निमाज पढण्याच्या तंबूतून संध्याकाळचा निमाज पढून बाहेर आला होता; इतक्यांत मुकर्रबखानाकडून आलेल्या जासुदानें वर्दी दिली कीं, 'मराठ्यांची राणी आणि युवराज यांना कैद करून एका मुक्कामावर आणलें आहे; शहानशहाचा हुकूम होतांच कैद्यांना चरणाजवळ हजर करतों!' हा निरोप ऐकतांच बादशहाच्या मुखांतून वरील आनंदाचे उद्गार बाहेर पडले. त्यानें तत्काळ कैद्यांना घेऊन येण्याची आज्ञा केली, आणि तो आनंदानें आपल्या दाढीवरून हात फिरवीत

क्षणभर आपल्या शामियान्यांत इकडून तिकडे येरझारा घालूं लागला. त्याचा खुद्द शामियाना अत्यंत साधा होता; तेथें कोणत्याही प्रकारचें बादशाही वैभव दिसत नव्हतें; परंतु परक्यांच्या भेटी घेण्याकरितां त्याला लागूनच जो दुसरा शामियाना उभारला होता, तेथें मात्र बादशाही ऐश्वर्य ओतप्रोत भरलेलें होतें. याच शामियान्यांत तो आपला दरबार भरवीत असे. संपूर्ण किनखापाचें छत, त्यास लावलेले भारी किंमतीचे कलाबतूचे गोंडे आणि सोन्याच्या तारीनें विणलेल्या झालरी डोळ्यांस दिपवीत होत्या. बादशाहानें त्या शामियान्यांत येऊन सर्व सरदार उमरावांना तांतडीनें बोलावणें पाठविलें. आपण मराठ्यांचा राजा मारला, त्याची राजधानी हस्तगत केली आणि बाकी राहिलेल्या राजवंशांतील माणसें, म्हणजे राणी आणि मराठ्यांचा भावी राजा आपण कैद करून आणला. आतां बिनवारशी बनलेली मराठेशाही आपल्या असंख्य आणि बलाढ्य सेने-कडून हां हां म्हणतां सहज चिरडून टाकूं, अशी त्याची आतां खात्री झाली. हें आनंदाचें वर्तमान तो स्वतः ज्याला त्याला सांगूं लागला. त्याच्या हुकुमाप्रमाणें जमूं लागलेले सरदार उमराव तितक्याच आनंदानें ती बातमी ग्रहण करीत होते. शेवटीं बादशहाला राहवेना, म्हणून तो स्वतः आपल्या मुलीच्या तंबूंत गेला आणि तिला तें आनंदाचें वर्तमान त्यानें सांगितले. त्यावेळीं झेबुन्निसा बेगम आपली आवडतीं काव्याचीं पुस्तकें घेऊन वाचीत बसली होती. मरा-ठ्यांची राणी आणि भावी राजा यांना मुकर्रबखान सरदारानें कैद करून आणलें आहे, ही बातमी ऐकतांच तिला कसेंसेंच वाटलें. वास्तविक पाहिलें असतां बापानें ही बातमी देतांच तिनें सुद्धां आनंदानें बादशहा-सारखें नाचावयास पाहिजे होतें आणि बादशहालाही तसेंच वाटलें होतें; परंतु ती विस्मयचकित होऊन आपणाकडे पहात आहे, असें पाहून बादशहा म्हणाला, ‘ बेटी, तुला आनंद नाहीं का झाला ? माझ्या खास प्रीतींतल्या खानानें मराठ्यांच्या राजधानीची धूळधाण करून रायगड— जेथें त्या पहाडांतील चोरानें राजधानी केली—’

‘ बाबा, आतां त्या थोर पुरुषाच्या नांवाचा उल्लेख हीन वाचेनें तुम्ही कां करतां ? ’ झेबुन्निसा म्हणाली, ‘ शिवाजीराजा तुमचा शत्रु

होता म्हणून तुम्हीं त्याला त्याच्या मृत्यूनन्तरही अशा हीन वाचेनें संबोधावें ही मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे. मनुष्य जिवन्त असेपर्यंत शत्रु, तो मरतांच त्याचें शत्रुत्व नाहींसें होतें, असें आपल्या कुराणांत सांगितलें आहे !'

'बरें, बरें; बेटी, तूं तर मला मुळींच बोलूं देत नाहींस. शिवाजीनें माझ्याशीं धरलेलें वैर तो मेला तरी मी कसें विसरूं ? सबन्ध हिंदुस्थानांत एकजात महम्मद पैगंबराची प्रजा करून सोडण्याचा माझा निर्धार, त्याच्या आड तो आला म्हणून माझा जीव इतका तळमळतो आहे. त्याच्या मुलाला मीं मारलें, त्याचा नातू आणि सून यांना कैद करून आणलें आहे. आतां ही मराठेशाही बुडवून ही सर्व पैगंबराची प्रजा मी करणार ! चल, दरबारांत चल आणि ते कैदी पहा. आपल्या बापाची इच्छा पूर्ण होत आहे, हें त्या कैद्यांना पाहून बेटी, तुलाही दिसेल व खात्रीनें आनंदच होईल !'

'चला, बाबा, मीही आलें. तुम्हांला ज्यांत आनंद तोच माझा आनंद !'

बादशहा परत फिरला आणि आपल्या शामियान्यांत गेला. आज खानाकडून आलेली बातमी ऐकून जितका उत्साह बादशहाला वाटला, त्याच्या एकशतांशही त्याच्या मुलीला—झेबुन्निसाला—उत्साह वाटला नाहीं. उलट पक्षीं, ती बातमी ऐकून तिला वाईटच वाटलें. एका काळीं तिनें शिवाजीमहाराजांवर दिव्य प्रेम केलें होतें. त्या दिव्य प्रेमाच्या स्मृतींतच ती आजपर्यंत अविवाहित राहिली होती. शिवाजीचा नातू आणि सून ह्यांना खानानें कैद करून आणलें आहे, ही वडिलांच्या तोंडून हकिकत ऐकतांच तिच्या डोक्यांत नानातऱ्हेचे विचार येऊं लागले. बऱ्याच वेळानें ती उठली आणि स्वतःशीं पुटपुटून म्हणाली, "माझा तो नातूच ! त्या थोर पुरुषानें जर माझा त्या वेळीं स्वीकार केला असता, तर मी आज त्याच्या नातवाकडे कोणत्या दृष्टीनें पाहिलें असतें ? माझा नातू, ह्याच ना ?—होय याच दृष्टीनें मी पाहिलें असतें ! तो बापांचा आज कैदी असला, तरी तो माझा नातूच आहे ! " असें म्हणून तिनें आपली

बारीक झिरझिरीत बुट्टेदार ओढणी डोक्यावरून घेतली आणि शामियान्याकडे आपला मोर्चा वळविला.

खानानें पाठविलेल्या निरोपामुळें बादशाहाच्या सर्व छावणींत आनंदीआनंद पसरला. बादशहानें मुकर्रबखानाला छावणींत आणण्याकरितां कांहीं थोर सरदार आणि उमराव सामोरे पाठविले. थोडया वेळानें ती सर्व मंडळी छावणींत आली. राणी येसूबाई आणि बालराजे शिवाजी यांचा स्वतंत्र मेणा बंदोबस्तांत पुढें होता. त्याच्या मागून बरेच मेणे होते. पहिल्या मेण्याबरोबर मेण्याच्या दरवाज्याला धरून जोत्याजी केसरकर चालत होता. मुख्य मेणा बादशहाच्या शामियान्याजवळ येऊन उभा राहतांच कोण कोण कैदी आहेत, याची बादशहानें चौकशी केली आणि फक्त बालराजे यांस पुढें घेऊन येण्यास सांगितलें. तेव्हां खान मेण्याजवळ जाऊन म्हणाला, " राणीसाहेब, मी कुराणावर हात ठेवून तुम्हांला दिलेली शपथ विसरणार नाहीं. तुमच्या किंवा युवराजांच्या जीवाला किंचित्‌ही अपाय होणार नाहीं, ही खात्री ठेवा, आणि माझ्या विश्वासावर युवराजांना बादशहाच्या भेटीकरितां माझ्याबरोबर पाठवा ! "

" खान, तुमच्या शब्दावर माझा विश्वास आहे. तुम्ही देवास भिऊन वागणारे आहांत, अशी माझी खात्री झाली आहे. तरी देखील माझ्या बाळाला बादशहासमोर नेतांना जोत्याजीला न्या ! " मेण्यांतून येसूबाई म्हणाली.

" राणीसाहेब, तसें मला करतां येत नाहीं. मी आतां येथें बादशहाच्या हुकमाचा पूर्ण बांधलेला आहें. युवराज एकटे माझ्याबरोबर आले, तरी त्यांच्या केसाला मी किंचित्‌ही धक्का लागूं देणार नाहीं, अशी मी पुनः कसम खातों. "

परिस्थितीकडे लक्ष देऊन जास्त ओढून न धरतां येसूबाईनें बालशिवाजीला खानाच्या स्वाधीन केलें. बालशिवाजी मोठ्या ऐटीनें खानाबरोबर निघाला. आपण कोण आहोंत, सांप्रत कोणत्या स्थितींत सांपडलों आहोंत, आणि कोणासमोर जात आहोंत, यांपैकीं एकतरी गोष्ट त्या बालकाला समजली असेल काय ? तो आनंदानें खानाच्या पुढें चालत मुख्य शामियान्यांत आला. त्याबरोबर सर्वांचे डोळे त्यांच्याकडे लागले.

मध्यभागीं सिंहासनावर बादशहा बसला असून आजूबाजूला त्याचे सर्व अमीरउमराव आणि सरदार मोठ्या विनयानें उभे होते. मागच्या बाजूला झेबुन्निसा उभी होती. तिला पडदा नव्हता. बादशहानें तिला पूर्ण मोकळीक दिली असल्यामुळें ती सर्व छावणींत वाटेल तेथें संचार करीत असे. बादशहाइतकाच सर्व फौजेंत तिचा दरारा होता. तिचा शब्द म्हणजे प्रत्यक्ष बादशहाचा शब्द, इतका तिच्या शब्दाला मान होता. खानानें बालशिवाजीला आंत आणतांच ती झटकन् पुढें झाली आणि त्या बालमूर्तीकडे पहात तटस्थ उभी राहिली. काय असेल तें असो; तिच्या मनांत चालू असलेल्या विचारांमुळें म्हणा किंवा बालशिवाजीच्या तेजस्वी मुद्रेनें आकर्षण केलें म्हणून म्हणा, तिला त्याच्याविषयीं आपलेपणाच वाटूं लागला. पाहातां पाहातां तिनें बालशिवाजीच्या मुखावरून हात फिरविले आणि आपल्या कानशिलावर कडाकड बोटें वाजविलीं. मुलीची ही चमत्कारिक कृति पाहून बादशहा म्हणाला, " बेटी, तूं अशी वेडयासारखी पहात काय राहिलीस ? तुला भांबावण्यासारखें त्या मुलांत काय आहे ? "

" राजतेज आहे. " बालशिवाजीकडे बोट दाखवून झेबुन्निसा धिटाईनें म्हणाली. " बाबा, हें खरें राजतेज आहे ! तुम्ही स्वतःला सम्राट् म्हणवतां, परंतु तुमच्या चर्येवर जें तेज मला दिसत नाहीं, तें राजतेज आज मला पहावयास सांपडलें ! "

" बरें, बरें; तुझ्या कविकल्पना कांहीं तरी भराऱ्या मारतात, झालें !" मनांत ओशाळून बादशहा म्हणाला, " त्याला कुर्निसात करायला सांग!"

" बाबा, हें आपण काय बोलतां ? आपण खालीं उतरून ह्या बालकाचा हात हातांत धरा. हा बालक आज जरी आपला कैदी असला, तरी तो मराठयांचा राजा आहे ! संपूर्ण महाराष्ट्राची मान त्याच्यापुढें वांकत आहे. हें आपण कसें विसरतां ? आणि कुर्निसात करायला त्याला कसें सांगतां ? कुर्निसात करण्याचें काम तुमच्या सभोंवार जमलेल्या ह्या मंडळीचें आहे, आणि ह्या बालकाचा अधिकार तुमच्या शेजारीं बसण्याचा आहे ! या बालकाच्या आजानें एका काळीं आपला अधिकार कोणता, हें प्रत्यक्ष तुमच्या अनुभवास आणून दिलेलेंच आहे ! मग आतां ह्या

बालकाच्या अज्ञानपणाचा तुम्ही फायदा घेऊं पहातां काय? नाहीं, नाहीं! असा अन्याय मी आपल्याकडून होऊं द्यावयाची नाहीं!"

बादशहा मनांत वरमला! त्याला कांहींच बोलतां येईना. क्षणभरानें तो आपण होऊनच म्हणाला, "बेटा, तुझें नांव काय?"

"शिवाजी!" जोरानें अस्खलित शिवाजीनें उत्तर दिलें.

"तोबा! तुझें नाव शिवाजी? हें शिवाजी नांव तर तुझ्या आज्याचें! मला सतावून सोडलेल्या त्या चोराचें! पण तूं कांहीं चोर नाहींस!"

"मी चोर नाहीं–मी शिवाजी आहें!"

"तूं चोर शिवाजी नाहींस, तूं साव आहेस!"

स्वराज्याचें परिवर्तन, पृ. १३४-३९. —नाथमाधव पितळे.

## १४. सन्मित्रांचा सत्कलह (पूर्वार्ध).

"भय्यासाहेब," आनंदराव आवेशानें म्हणाले, हा "केवळ तुमचा भित्रेपणा आहे! जगांत पाप, दुःख, दुष्टत्व, इत्यादि आहेत हें कबूल; पण या अनिष्ट गोष्टी दूर करण्याचा प्रयत्न न करितां, जगाला पाठ दाखवून अरण्यांत जाणें म्हणजे मोठेपणा नसून शुद्ध भ्याडपणा आहे! तुम्हांला जगांत सुख, सत्य, सदाचार, पावित्र्य, पाहिजे आहेत ना? तुम्हांला ज्ञान पाहिजे आहे ना? ज्ञानाचा राजमार्ग तुमच्याकरितां मोकळा आहे. नाक मुठींत धरून कधीं ज्ञान मिळणार आहे का?"

भय्यासाहेब हळूहळू म्हणाले, "म्हणा, आम्हांला भित्रे म्हणा तुम्ही; पण आम्हांला वाटतें कीं, जगांत राहून आत्मिक उन्नति व्हावयाची नाहीं, व खरें ज्ञानही व्हावयाचें नाहीं. आपण दोघांनीं कॉलेजांत युरोपियन शास्त्रांचा अभ्यास केला. पण ज्ञान काय मिळालें? 'जीव' म्हणजे काय? 'जीवतत्त्व' म्हणजे काय? याचा अर्थ अजून कोणी शास्त्रज्ञ सांगू शकतो का? बरें, या प्रचंड जगाचा अर्थ काय, हें तरी तुमच्या भौतिक शास्त्रां वरून कळेल काय?"

आनंदराव म्हणाले, "आज नाहीं, उद्यां–परवां–वर्षानें–हजार–लाख वर्षांनीं तरी कळेलच कळेल. आकाशांतील तारागणाकडे मोठमोठे लोक-

सुद्धां न्यूटनच्या पूर्वी साश्चर्य दृष्टीनें पहात होते. परंतु, आतां शाळेंतल्या मुलाला सुद्धां गुरुत्वाकर्षणाचा नियम ठाऊक झाला आहे; व त्याला आतां तारांच्या गतींचें कांहींच आश्चर्य वाटत नाहीं. अवयवभूत तत्त्वांचें अधिकाधिक ज्ञान जसजसें होत जाईल, तसतसें जगद्विषयक ज्ञानही अधिक समर्पक होत जाईल. आज नभोमंडळांतील तारांच्या गतीचें ज्ञान झालें; त्यांच्या वजनाचें, त्यांच्यावर असलेल्या पदार्थांचें ज्ञान होत चाललें आहे; व पुढें—"

भय्यासाहेब मध्येंच म्हणाले, "कांहीं केलेंत तरी या तारागणांचा अर्थ काय? हे कोठून आले, कां, कशाला आले, याचा कांहीं तरी उलगडा होण्याची आशा आहे काय?"

"त्याचाही उलगडा होत चालला आहे. निरनिराळ्या पदार्थांचे गुण-धर्म व कार्यकारणभाव जसजसे कळत जातील, तसतसें जगाचें कोडेंही उलगडत जाईल."

"हें अशक्य आहे! नुसत्या बुद्धीनें हें कोडें सुटावयाचें नाहीं. आदिकारण म्हणून तुम्ही जें आज म्हणाल त्याचें कारण काय, असें उद्यां बुद्धि म्हणणार. हें कारण सांगितलें तर, पुनः या कारणाचें कारण काय? अशी ही कारणपरंपरा अनंत असल्यामुळें कार्यकारणभावानें जगाचें कोडें कसें सुटेल? आणि भौतिक शास्त्रांचें ज्ञान म्हणजे केवळ कार्यकारण संबंधाचें ज्ञान, दुसरें काय? अनाद्यनन्त, अतीन्द्रिय, तर्कातीत, वस्तूचें ज्ञान दिक्कालादि उपाधि असलेल्या बुद्धीला होईल तरी कसें? 'आत्मा' 'ब्रह्म' इत्यादि गोष्टींचें ज्ञान तर्कानें व बौद्धिक शास्त्रानें होणार नाहीं, तर ब्रह्मद्रष्ट्या ऋषींनीं घालून दिलेल्या मार्गानेंच होईल. मग या मार्गाला तुम्ही गूढ मार्ग म्हणा किंवा कांहीं म्हणा. पाहिजे तर त्याला भित्रेपणा म्हणा."

"ब्रह्मज्ञान भौतिक शास्त्रानें होणार नाहीं, तर योगमार्गानेंच होणार, हें तत्त्व तुम्हांला तुमच्या बुद्धीमुळेंच कळलें ना? भय्यासाहेब, मी आतां वादाकरितां शब्दच्छल करीत नाहीं. माझी ही शंकाच विचार करण्या-सारखी आहे. मी तुमच्याशीं आतां चर्चा करतों आहें, ती तात्त्विक वादासाठीं नव्हे; याच्यांत माझा दुसरा महत्त्वाचा हेतु आहे. तुम्ही या

योगमार्गांत पडून स्वतःचाच केवळ नाहीं, तर आपल्याबरोबर बिचाऱ्या रागिणीचाही नाश करीत आहां. तुम्हीं योजिलेला मार्ग चुकीचाच केवळ नाहीं, तर अनीतीचाही आहे ! यांच्यांत धैर्य नसून भ्याडपणा आहे. तुमचा योगमार्ग खात्रीनेंच जगाचें कोडें सोडवील, जगांतील दुःख, मोह, पाप, दुष्टत्व–या मार्गानें गेल्यास थोडें बहुत तरी कमी होईल, अशी माझी खात्री करून द्याल, तर मीही तुमच्या बरोबर येतों, व रागिणीलाही तुमच्याबरोबर जायाला सांगतों. पण जर तुम्हांला माझी अशी खात्री करून देतां आली नाहीं, तर तुम्हीं आपला बेत सोडून दिला पाहिजे. "

" मीं या सर्व गोष्टींचा विचार केला आहे आणि मी तुमची खात्री करून द्यायलाही तयार आहें. सोपाधिक बुद्धीनें या अनाद्यनन्त जगाचें गूढ तत्त्व समजणें शक्य नाहीं, हें मघाशीं दाखवलेंच. "

" कबूल; पण प्राणायाम करून व नाक दाबून हें ज्ञान कसें मिळणार ? का तुम्ही अंधश्रद्धेनें या मार्गाचें अवलंबन करणार ? "

" श्रद्धा–श्रद्धा–श्रद्धा ! श्रद्धेशिवाय जगांत काय आहे ? आनंदराव, जग म्हणजे काय, याचा अर्थ काय, ईश्वर आहे किंवा नाहीं, या प्रश्नांचा विचार जगाच्या आरंभापासून चालला आहे. पण ह्याचें उत्तर कोणाला मिळालें आहे का ? आणि पुढें मिळण्याची आशा आहे का ? आशा जर नाहीं, तर मोठमोठया ऋषींनीं व तपस्व्यांनीं ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांवर श्रद्धा ठेवून त्यांच्या मार्गानें आत्मज्ञान करून कां घेऊं नये ? "

" आत्मज्ञान होण्याची खात्री नाहीं म्हणून. तर्काच्या मार्गानें अजून पूर्ण ज्ञान झालेलें नाहीं खरें; पण हा मार्ग स्पष्ट व सुगम आहे. या मार्गानें ज्ञानाची दिवसेंदिवस प्रगति होत आहे; पण तुमच्या गूढ मार्गानें कोणतें खात्रीलायक ज्ञान मिळालें आहे ? "

" नरेंद्र नांवाचे एक सुशिक्षित गृहस्थ प्रथम तुमच्यासारखेच तर्कज्ञानी नास्तिक होते. त्यांनीं रामकृष्ण परमहंसांना 'देव तुम्हीं पाहिला आहे काय व मला दाखवितां का ?' असा प्रश्न विचारला असतां, त्या परमहंसांनीं नरेंद्रांच्या जिज्ञासेची तीव्रता कशी आहे, याची प्रथम परीक्षा केली,

व मग त्याना प्रत्यक्ष देवदर्शन घडविलें. तोच नास्तिक नरेन्द्र नंतर साधु विवेकानंद झाला ! ज्याला विवेकानंदांसारखी तळमळ असेल, त्यांच्या-सारखा ज्याच्यांत दृढ निश्चय असेल, त्याला गुरु प्रत्यक्ष ज्ञान करून देतात. तुम्हां लोकांना तेवढी जिज्ञासा तर नाहींच, पण उगाच शंका-कुशंका मात्र काढतां ! ''

'' शंका निरर्थक असतील, तर त्यांचें समाधान करा. ब्रह्मज्ञान हें बुद्धिगम्य नाहीं, हें सिद्ध करून द्या. ' ज्ञान ' जर बुद्धीलाच व्हावयाचें, तर बुद्धीच्या मार्गानें विचार करा. ' आत्मा ' वगैरे गोष्टी ' बुद्धयतीत ' म्हणतां पण खरोखरच जर आत्मा बुद्धयतीत असता, तर हें तरी विधान करतां आलें असतें का ? ' बुद्ध्यतीत ' वस्तूविषयीं कांहींच विधान करितां यावयाचें नाहीं. बुद्धयतीत वस्तूंचें ज्ञान अमुक मार्गानें होतें, हें तुम्हीं सिद्ध कसें करणार ? बुद्धीनेंच ना ? मग बुद्धि सांगेल तें खोटें, हें जग खोटें आणि ब्रह्म खरें, हें कसें म्हणतां ? ''

'' आनंदराव, तुम्ही बुद्धिवादी आहांत. तर्कानें, दुर्बिणीनें व सूक्ष्म-दर्शक यंत्रानें सत्यज्ञान होईल, असें तुम्हांला वाटतें. पण तर्क हाच एक सत्याचा मार्ग आहे, असें नाहीं. मधमाशांना व मुंग्यांना जें विलक्षण ज्ञान असतें, तें तर्कमार्गानें मिळालेलें नसतें. असें जर आहे, तर योग-मार्गानेंही सत्याचें ज्ञान होईल; यांत अशक्य असें काय आहे ? ''

'' अशक्य नसेल, पण ही गोष्ट असिद्ध आहे. योगानें सत्यज्ञान होईल ही श्रद्धा आहे, हें ज्ञान नव्हे ! ''

'' जगांतील कोणतें सन्मान्य ध्येय तर्कानें सिद्ध होण्यासारखें आहे ? श्रद्धा जर नसती, तर जगांत उच्च, उदार, उदात्त असें कांहीं राहिलें असतें का ? जगांतील सर्वमान्य, पूज्य, पवित्र गोष्टी श्रद्धेच्या आधारा-वर आहेत. तुमची बुद्धि तरी केवळ तर्काच्या दृष्टीनें किती विश्वसनीय ठरेल ? तुमची बुद्धि तुम्हांला फसवीत नाहीं, हें नुसत्या तर्कानें सिद्ध करून द्या पाहूं ? जें जें कारण तुम्ही दाखवाल, तें तें तुमच्या संशयित बुद्धीनेंच काढलेलें असल्यामुळें तें अविश्वसनीय होणार नाहीं काय ? ''

---

## १५. सन्मित्रांचा सत्कलह (उत्तरार्ध).

" कांहीं कांहीं गोष्टींवर श्रद्धा ठेविलीच पाहिजे; पण याचा अर्थ योगमार्गावर श्रद्धा ठेविली पाहिजे, असा नाहीं. "

" नसेल; पण तुम्ही बुद्धीची फार थोरवी गात होतां व आमच्या श्रद्धेची टर उडवीत होतां, म्हणून म्हणतों कीं, तुमची बुद्धि तरी केवळ तर्कानें विश्वसनीय ठरते का ? मी तर्कानें विचार करूं लागलों, म्हणजे मला वाटतें कीं, प्रत्येक मनुष्याची बुद्धि त्याला फसवीत आहे; एवढेंच नव्हे, तर या बुद्धीच्या योगानें खरें ज्ञान झालें तरच नवल ! बुद्धि मेंदूवर अवलंबून-आणि मेंदु कोठून कसा आला ? जगाच्या आरंभाकडे भौतिक शास्त्राच्या दृष्टीनें पहा, आणि हे मेंदूचे परमाणु कोठून कसे आले, याचा विचार करा. आकर्षण व उत्सारण या दोन मार्गांमुळें मूलभूत अणूंमध्यें आघातप्रत्याघात सुरू झाले, आणि जगांतील कोठले तरी अणुपरमाणु कोठल्यातरी दुसऱ्या अणुपरमाणूंशीं संयोग व संघर्षण पावून कांहीं युगांनीं त्यांच्यामधून मानवपिंड कसे तरी बाहेर निघाले, व या पिंडांचा कसातरी संयोग होऊन त्यांच्या कोणत्या तरी अणूंचा दुसरा पिंड बनून तो बोलूं चालूं लागला, व मेंदूच्या परमाणूंना आपल्या बुद्धीची प्रौढी वाटूं लागली. यदृच्छेनें संयोग पावलेल्या परमाणूंची ही प्रौढी कितीशी तर्काला धरून आहे ? "

"भय्यासाहेब, जगाचें गूढ आपल्या बुद्धीनें सुटेल, असें का मी म्हणतों? सध्यांच्या स्थितींत तरी श्रद्धा पाहिजे आहे; पण श्रद्धा कोणावर, कशावर ठेवायची, हा विवेक नको का ? पूर्वींचे काश्यपवसिष्ठादि ऋषि जर आतां असते, तर मींही त्यांच्यावर श्रद्धा ठेविली असती; पण हल्लींच्या भोंदू गोसावड्यांवर का विश्वास ठेवावा ? "

आनंदराव चिडलेले पाहून भय्यासाहेब शांतपणें म्हणाले, " सगळेच भोंदू नसतात कांहीं !

आनंदराव आवेशानें म्हणाले, " सगळेच साधु नी स्वामी भोंदू असतात, असें मी म्हणत नाहीं. आपले ते रामभाऊ फाटक योगाभ्यास शिकले आहेत व दोनशें रुपयांची नोकरी आणि सारा संसार सोडून पुरश्चरणाकरितां हिमालयावर गेले आहेत. त्यांच्यासारख्यांना कोण भोंदू म्हणेल ?

पण तुमचे हे बोधस्वरूपस्वामी, यांचा आगा ना पिच्छा; यांच्यावर तुम्हीं एवढी श्रद्धा कां ठेवावी ?”

भय्यासाहेब म्हणाले, “ कां, याला उत्तर नाहीं. जग म्हणजे काय आहे? बुद्धीनें हा प्रश्न सुटत नाहीं, मग योगमार्गानें तरी पाहूं या ! हा प्रश्न जर तुम्हांला त्रास देत नसेल तर तुम्ही संसारांत खुशाल रहा. या प्रश्नाचें उत्तर मिळाल्याशिवाय मला चैन पडत नाहीं. या प्रश्नाचें उत्तर ज्याला मिळालें नाहीं, आत्मज्ञान ज्याला झालें नाहीं, तो मनुष्य कसला ? त्याचें जीवित आणि पशूचें जीवित, यांमध्यें फरक काय ? ” बोलतां बोलतां भय्यासाहेबांचा आवाज चढूं लागला.

आनंदराव जरा नरम पडून म्हणाले, “सगळें खरें, पण या साधूंवर आम्हीं श्रद्धा कां ठेवावी ? ”

भय्यासाहेब, “ तुम्ही नका ठेवूं ! आम्हांला दुसरा मार्ग सांपडत नाहीं, म्हणून आम्ही ठेवणार ! आम्ही ‘वेडे’ असलों, ‘भ्याड’ असलों, तर आमचा वेडेपणा आणि भ्याडपणा आमच्यापाशीं. आम्हांला ब्रह्मजिज्ञासेची भूक लागली आहे. ही भूक तुमच्या संसारानें आणि भौतिक शास्त्रांनीं शांत व्हावयाची नाहीं ! ”

भय्यासाहेबांच्या भाषणाचा रोख पाहून आनंदरावांच्या आवेशानें पुन्हां उचल खाल्ली; पण शक्य तितका आपला स्वर मृदु करून ते म्हणाले, ,, म्हणून गुहेंत जाऊन, नाक दाबून, आणि आसन करून, ही भूक शांत होणार आहे ! भय्यासाहेब, मी योगमार्गाच्या उलट नाहीं. पण किती केलें, तरी तो मार्ग गूढ आहे. या गूढ मार्गांत यश मिळेल किंवा नाहीं, याची वानवाच आहे; आणि अशा या गूढ संशयित मार्गाच्या नादीं लागून प्रत्यक्ष दिसणाऱ्या कर्तव्यमार्गाला तुम्ही झुगारून देतां, हें समंजसपणाचें लक्षण काय ? देव आहे किंवा नाहीं, आणि योगमार्गानें तो दिसेल किंवा नाहीं, याची खात्री नाहीं; पण रागिणी तुमची पत्नी आहे, तिचा सांभाळ करण्याचें अग्निब्राह्मणांसमोर तुम्हीं वचन दिलेलें आहे, ती कोमल व प्रेमळ मनाची आहे, या गोष्टी संशयित आहेत का ? ‘देव’ दिसत नाहीं, पण ‘कर्तव्यकर्म’ स्पष्ट दिसतें ना ? हें प्रत्यक्ष स्पष्ट कर्तव्य-

कर्म सोडून, गूढ संशयित 'ब्रह्मज्ञानाकरितां' धर्माला, प्रेमाला, स्नेहाला, विचाराला तुम्ही फांटा देतां तेव्हां तुम्हांला काय म्हणावें ? "

भय्यासाहब गंभीरपणें म्हणाले, "तुम्हांला 'ब्रह्मज्ञानाची माझ्यासारखी भूक लागली नाहीं, म्हणून तुम्ही असें म्हणतां !"

आनंदराव चिडून म्हणाले, " भुकेनें व्याकूळ होऊन बायकोला किंवा पोराला मारणें चांगलें का ? ब्रह्मजिज्ञासेकरितां रागिणीला सोडणें काय, आणि क्षुधेसाठीं बायकोला मारणें काय, दोन्ही सारख्याच दर्ज्याचीं कृत्यें आहेत ! "

भय्यासाहेब स्थिर स्वरानें म्हणाले, " मला तसें वाटत नाहीं. उच्च ब्रह्मजिज्ञासा कोठें, आणि क्षुद्र क्षुधा कोठें ? ब्रह्मज्ञानापुढें रागिणीचीच काय, पण साऱ्या जगाची कांहीं तरी किंमत आहे का ? "

आतां मात्र आनंदरावांना आपला मनोनिग्रह करणें अशक्य झालें. ते क्रुद्ध होऊन म्हणाले, " तुमचें हें आत्मवंचन आहे ! व्यसनी मनुष्याला आपल्या नादापुढें जग तुच्छ वाटणें साहजिक आहे. ब्रह्मज्ञानाचा नाद, विद्येचा नाद, गाण्याबजावण्याचा नाद, नाटकाचा नाद, हीं व्यवहारांत कमीजास्त शिष्टतेचीं आहेत, पण तात्त्विक दृष्ट्या—"

आनंदरावांची भाषणपद्धति पाहून भय्यासाहेब चकित होऊन म्हणाले, " तुमच्यापुढें बोलण्याची सोय नाहीं राहिली आज ! "

भय्यासाहेबांकडे तिरस्कारानें पहात आनंदराव संतापून म्हणाले, " तुमच्यापुढेंच नाहीं ! कारण आपल्या ज्ञानलालसेपुढें रागिणीसारख्या मूर्तिमंत पवित्रतेचा जो त्याग करतो, त्या अविचारी स्वार्थाच्या पुतळ्यापुढें काय बोलायचें ! आपली जिज्ञासा तृप्त करण्याकरितां, आपल्या काल्पनिक सुखाकरितां, कोमल-प्रेमळ मनाच्या आपल्या धर्मपत्नीचा जो कठोर मनुष्य नाश करितो, तो पापी आपलपोट्या नव्हे तर काय ? 'उच्च आपलपोटेपणा '-म्हणा पाहिजे तर त्याला; पण या कृत्यांत परोपकार, औदार्य, कोमलता, प्रेम, धर्म, कांहीं नाहीं ! असला मनुष्य म्हणजे केवळ वेडाच नव्हे, तर—"

भय्यासाहेब मागें खुर्चीवर रेलून शांतपणें म्हणाले, " आनंदराव, तुम्ही मला पाहिजे तें म्हणा. तिला मी सोडून जात आहें, म्हणून

तुम्हाला राग येणें साहजिक आहे; पण तुम्ही शांतपणें विचार करा आणि मग मला दोष द्या. ”

भय्यासाहेबांचा हा बेपर्वाई दाखविणारा शांतपणा पाहून आनंदराव अधिकच संतापून म्हणाले, “ आपणच शांतपणें विचार करून पहा. भय्यासाहेब, आपण केवढी भयंकर गोष्ट करीत आहां ! भाऊसाहेबांनीं व माईनीं रागिणी तुमच्या स्वाधीन केली, ती याकरितांच काय ? तुमच्या वर ती अनन्यभावानें प्रेम करिते, त्याची फेड अशीच करतां काय ? भय्यासाहेब, आपला दुराग्रह—हेका—आप्पलपोटेपणा सोडून द्या. नाहीं तर, तुमच्या आमच्या स्नेहाचा आजपासून अंत झाला, असें समजा! ”

भय्यासाहेब तक्तपोशीकडे पहात किंचित् काल स्तब्ध पडले होते. नंतर थोडासा हंसण्याचा प्रयत्न करून ते म्हणाले, “ बहिणीच्या प्रेमानें तुम्ही अंध झालां आहां ! ”

आनंदराव जोरानें म्हणाले, “ ब्रह्मज्ञानाच्या नादानें तुम्ही वेडे झालां आहां ! ”

**रागिणी—वा. म. जोशी.**

---

## १६. हरिद्वार.

हरिद्वार हें गांव गंगेच्या दक्षिण तीरावर शिवालिक नांवाच्या हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या टेकड्यांच्या बाजूला वसलेलें आहे व गंगानदी थेट गांवाला व टेकडयांना लागून गेली आहे. नदीच्या दोन्ही तीरांस टेकडयांची रांग आहे व मध्यें एक दरी आहे. यामुळें हिमालयानें जणूं काय आपल्या लहान लहान टेकडयांचें एक दार बनवून त्यांतून गंगेला जाण्यास वाट दिली आहे कीं काय, असा भास होतो. कारण, दोन टेकडयांमधला भाग खिंड किंवा द्वार यासारखाच खरोखरी दिसतो व म्हणून गंगाद्वार हें नांव जास्त अन्वर्थक आहे. गांवच्या वरच्या बाजूला नदीकिनाऱ्यावर उभें राहून उत्तर दिशेकडे दृष्टि फेंकली म्हणजे अद्वितीय देखावा दिसतो. दृष्टि पोंचत नाहीं येथपर्यंत सारखी टेकडयांची रांगची रांग लागलेली दिसते. या टेकडया एकावर एक अशा सारख्या चढत चढत गेलेल्या आहेत व आपण दृष्टि कितीही उंच केली तरी या

टेकडया म्हणून संपत नाहींत. अगदीं दूरवर डोळे ताणून ताणून पाहिलें म्हणजे पांढऱ्या शुभ्र रंगाची पर्वतराजि दिसूं लागते. ही पर्वतराजि आहे किंवा पांढऱ्या दगांचा समुदाय आहे याबद्दल भ्रांति उत्पन्न होते. परंतु बर्फाच्छादित म्हणूनच सदाधवल अशा हिमवानाचा हा धवलध्वज होय, अशी खात्री झाली म्हणजे मन सानंदाश्चर्यांत निमग्न होतें. या पर्वतराजीच्या खालीं पाहिलें म्हणजे स्फटिकाप्रमाणें शुभ्र असा गंगाप्रवाह दूरपर्यंत दिसतो. गंगेच्या पाण्याइतकें शुभ्र व निर्मळ पाणी दुसऱ्या कोणत्याही नदीचें नसेल. मी पहिल्यानें हरिद्वारास गेलों तो आक्टोबरमध्यें. तो ऋतु हरिद्वारास जाण्यास सर्वांत उत्तम. त्या ऋतूंत येथील हवा फारच चांगली असते. फार थंडीही नाहीं आणि फार उष्णताही नाहीं. पाणी तर इतकें निर्मळ व स्वच्छ असतें कीं, गळाभर खोल पाण्यांत सुद्धां एकादी सुई किंवा टांचणी स्पष्टपणें दिसते. या नदीच्या प्रसन्न पाण्याकडे पाहून प्राण्याचें मन प्रसन्न झाल्याखेरीज राहतच नाहीं. एकीकडे त्या हिरव्यागार टेकडया व त्यांचेच पायथ्याशीं शुभ्र दगड व तो स्फटिकाप्रमाणें शुभ्र पाण्याचा प्रवाह हा देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिला म्हणजे कसाही मनुष्य असो, त्याचा अंतरात्मा गारीगार झाल्याखेरीज रहात नाहीं. त्या पवित्र स्थानीं क्षणभर उभें राहिल्यावर आमचीही तीच अवस्था झाली. हिमालयाचा शुभ्र विस्तार, जणूं कांहीं स्वर्गापर्यंत पोंचलेला दिसत होता व त्याची एक सोपानपरंपरा झाली आहे, असा भास होई. गंगा स्वर्गांतून आली ती याच सोपानपरंपरेनें आली. ती प्रथम स्वर्गांतून शंकराच्या डोक्यावर पडली, तेथून हिमवानाच्या माथ्यावर पडली व तेथून अवनतीला पोंचून खालीं खालीं जात शेवटीं सागराला मिळाली, असें भर्तृहरीनें वर्णन केलें आहे, तें अत्यंत यथार्थ आहे असें मला वाटलें. तसेंच सृष्टिदेवीचे अद्वितीय देखावे पाहिल्यावर त्यांचें रूपकात्मक वर्णन करण्याची कवीला स्फूर्ति होऊन त्या रूपकात्मक वर्णनाच्याच पुढें पुराणांतील कथा होतात असें जें म्हणतात, त्याचीही सत्यता माझ्या डोळ्यापुढें उभी राहिली व असलाच एकादा गंगेचा देखावा पाहून महाभारतांतील किंवा रामायणांतील गंगावतरणाची कथा एकाद्या कवीच्या डोक्यांत आली असावी असें मला

त्यावेळीं वाटलें व त्या देखाव्यानें मला माझ्या लहानपणच्या एका अदृष्टपूर्व अनुभवाचें स्मरण झालें.

मी लहानपणीं पुण्यांत इंग्रजी शिकण्यास होतों, त्या वेळीं आम्हांला पुण्यास कोंकणांतून येण्याजाण्यास बैलगाडीच्या रस्त्यानें जावें लागत असे. एका मे महिन्यांत आम्ही पुण्याहून निघून आमच्या गांवीं जात होतों. वाटेंत आम्हांला प्रचंड सह्याद्रि ओलांडावा लागतो. आम्ही पहाटेच्या सुमारास सह्याद्रीच्या पुष्कळ उंचउंच टेकडया उतरून एका पर्वताच्या शेवटाला आलों, तों तेथें मीं एक अद्वितीय देखावा पाहिला. त्यादिवशीं धुकें फार आलें होतें. आम्ही समोर दिसणारे डोंगर ओलांडून कोंकणाच्या बाजूकडील डोंगराच्या माथ्यावर आलों मात्र, तों आमच्यापुढें एक अफाट समुद्र पसरला आहे असें आम्हांला वाटलें ! तें सर्व जग व्यापणारें धुकें थेट समुद्राप्रमाणें भासत होतें. ज्या ठिकाणीं धुकें किंचित् कमी दाट होतें, तेथें थोडा भाग दृग्गोचर होत होता. असे भूमिभागाचे लहान लहान तुकडे समुद्रांतील लहान लहान बेटांप्रमाणें दिसत होते. हा विलक्षण देखावा पहात आम्ही किती वेळ तरी उभे होतों. इतक्यांत आमच्या मागें पूर्व दिशेला सूर्यानें आपलें डोकें उदयाचलाच्या माथ्यावर काढल्याबरोबर त्याचे किरण त्या हिमतुषारमय समुद्रावर पडूं लागले, तसतसें तें धुकें वितळून आम्हांला समुद्राच्या ठिकाणीं जमीन दिसूं लागली व या समुद्राचा हा पालट एका क्षणांत झाला. हा विलक्षण देखावा पाहून कोंकणप्रांत निर्माण झाल्याची कथा कशी उत्पन्न झाली असेल त्याची मला उत्तम कल्पना आली. पुढें परशुरामानें आपल्या बाणानें समुद्राचें पाणी मागें हटवून कोंकणाचा भूमिभाग निर्माण केला अशी दंतकथा आहे ही दंतकथा मीं पाहिलेल्या देखाव्यावर उत्तम रूपक आहे. तेव्हां माझ्यासारख्या प्रत्यक्ष अनुभव आलेल्या एकाद्या कवीनें ही दंतकथा रचिली असावी असें मला त्यावेळीं वाटलें.

हरिद्वारच्या गंगाकिनाऱ्यावरील अलौकिक देखावा अवलोकन करून गंगावतरणाची कथा अशीच रूपकानें निर्माण झाली असावी, असें मला वाटतें. ही कथा रामायणांत व महाभारतांत बहुतेक सारखीच आहे. महाभारतांत गंगावतरणाचा अगस्त्य ऋषीनें समुद्र प्राशन करून टाकण्याच्या

कथेशीं संबंध जोडला आहे येवढेंच. इक्ष्वाकु वंशांत फार प्राचीन काळीं सगर म्हणून मोठा राजा होऊन गेला. त्याला दोन बायका होत्या. एकीपासून त्याला असमंजस म्हणून चिरकालिक कीर्ति मिळविणारा मुलगा झाला, व दुसरीपासून साठ सहस्र मुलगे झाले. सगरानें एकादां अश्वयज्ञास प्रारंभ केला, परंतु तो अश्व असूयाप्रेरित इंद्रानें पळवून नेऊन पाताळांत कपिल महामुनि तप करीत होते, तेथें ठेवला. सगरानें आपल्या साठ सहस्र मुलांना अश्वशोधार्थ पाठविलें. त्यांनीं अश्वाचा दश दिशा शोध केला, तरी त्याचा सुगावा लागला नाहीं. तेव्हां पित्राज्ञेनें पृथ्वी खणण्यास प्रारंभ करून, ते पाताळापर्यंत खणीत गेले. तेथें त्यांनीं कपिल महामुनि व त्यांचे शेजारीं आपला यज्ञाश्व पाहिला. हाच चोर समजून ते त्याच्या अंगावर धावले. कपिल महामुनींना राग येऊन त्यांनीं त्या साठ सहस्र सगरपुत्रांना भस्मसात् करून टाकिलें. इकडे सगर आपले मुलगे अजून कां येत नाहींत, अशा विवंचनेंत होता. शेवटीं फार काळ लोटला म्हणून त्यानें आपला नातू अंशुमान् याला त्यांचे शोधार्थ पाठविलें. तो शोध करीत करांत कपिल महामुनि ज्या ठिकाणीं होते, त्या ठिकाणीं आला, व त्यानें त्या मुनींला प्रणाम करून त्यांना कुशल प्रश्न केले. व आपल्या चुलत्यांची माहिती विचारली. तेव्हां कपिल महामुनि संतुष्ट होऊन, त्यांनीं त्याला अश्व परत दिला, व सगराच्या भस्मसात् झालेल्या मुलांच्या उद्धाराकरितां गंगा पातालाप्रत आणण्यास सांगितलें. अंशुमानाला गंगा खालीं कशी आणावी हें समजलें नाहीं. पुढें त्याला दिलीप म्हणून मुलगा झाला. त्यानेंही गंगा आणण्याची खटपट केली, परंतु त्याचेही हातून सगरपुत्रांचा उद्धार झाला नाहीं. परंतु दिलीपाचा मुलगा भरत म्हणून होता. तो फार धार्मिक व दृढनिश्चयी होता. त्यानें आपल्या पूर्वजांचा उद्धार करण्याचा निश्चय केला, व त्याकरितां त्यानें घोर तप आरंभिलें. त्या तपानें प्रसन्न होऊन गंगेनें पाताळामध्यें जाण्याचें कबूल केलें; परंतु " स्वर्गाहून खालीं पडतांना माझा वेग पृथ्वीला सहन होणार नाहीं. तरी तूं शंकरांची आराधना करून, त्यांना आपल्या डोक्यावर मला घेण्यास विनंती कर, " असें गंगेनें सांगितलें. गंगेच्या सांगण्याप्रमाणें भगीरथानें पुनः तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरही त्याच्या तपानें

प्रसन्न होऊन त्यानें गंगेला धारण करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें प्रथमतः गंगा स्वर्गांतून शंकराच्या डोक्यावर पडली, तेथून हिमालयाच्या माथ्यावर पडली, तेथून जमिनीवर फार वेगानें आली व पुढें भगीरथाच्या रथाचे मागोमाग समुद्रापर्यंत जाऊन पुढें पाताळांत गेली. तेथें भगीरथानें आपल्या पूर्वजांच्या भस्मावर गंगाजल शिंपडलें व त्यांना जलदान केलें, व त्या योगानें ते सर्व स्वर्गाप्रत गेले. गंगावतरणाची ही कथा म्हणजे स्वाभाविक दिसणाऱ्या सृष्टीच्या देखाव्यावर एक प्रकारचे कविकृत रूपक आहे, असें कोणास वाटणार नाहीं ?

**उत्तर हिंदुस्तानचा प्रवास—गो. चि. भाटे.**

---

## १७. जातिभेदाची सद्यःस्थिति.

अत्यंत प्राचीन काळीं चातुर्वर्ण्य जन्मावर नसून गुणकर्मावर अवलंबून असे. यामुळें शूद्रादि कनिष्ठ जातींसही उद्योगानें ज्ञान, सत्ता व संपत्ति संपादन करून, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य, या वरिष्ठ जातींचे अधिकार प्राप्त करून घेतां येत. त्या युगांत प्रत्येक जातीस तिच्या विशिष्ट अधिकाराबरोबर विशिष्ट कर्तव्येंही असत; व त्यांचें योग्य रीतीनें पालनही होई. त्या काळीं स्त्रियांनाही वेदाध्ययनाचा अधिकार असे. त्या युगास आपण ‘सुवर्ण युग’ म्हणूं.

त्यापुढील युगांत मात्र ही सर्व व्यवस्था बदलली. अधिकार व कर्तव्यें हीं पूर्वीं एकाच ठिकाणीं रहात, त्यांची या मध्ययुगांत फारकत झाली; आणि ज्ञान, सत्ता व संपत्ति, हीं पूर्वीं गुणकर्मसाध्य असत, तीं जन्मसिद्ध होऊन बसलीं. समाजाचा अर्धा भाग अर्थातच स्त्रिया असावयाचा; बाकीच्या अर्ध्या भागांत चार जातींचे पुरुष समसमान प्रमाणांत होते, अशी कल्पना केली, तरी शूद्रांचें एकंदर समाजाशीं प्रमाण रुपयास दोन आणे पडावयाचें. याप्रमाणें स्त्रिया व शूद्र मिळून होणाऱ्या दहा आण्यांच्या हिश्श्याकडे बहुधा निव्वळ सेवारूप कर्तव्य देण्यांत आलें; आणि बाकीच्या सहा आण्यांच्या हिश्श्यांत ज्ञान ब्राह्मणांकडे, सत्ता क्षत्रियांकडे व संपत्ति वैश्यांकडे, पृथक्पणें देण्यांत आली; म्हणजे त्या वस्तूंचा त्या जातींकडे मक्ताच देण्यांत आला. या तीन जातींचे

आपापल्या क्षेत्रांतील अधिकार अमर्याद असून कर्तव्यें मात्र स्त्रियांच्या व शूद्रांच्या मानानें फार मर्यादित असत.

या जाती जन्मावरूनच ठरविण्यांत येऊं लागल्यामुळें बुद्धिमान् ऋषींचा निर्बुद्ध वंशज सुद्धां ब्राह्मण म्हणवून घेऊन त्या जातीचे अधिकार उपभोगूं लागला. पराक्रमी राजाचा नेभळा वंशजसुद्धां क्षत्रिय म्हणवून घेऊन इतरांवर सत्ता गाजवूं लागला. कृषिकर्मकुशल शेतकऱ्याचा किंवा धाडसी व्यापाऱ्याचा अडाणी अगर भित्रा वंशजसुद्धां वैश्य म्हणवून घेऊन शेती अगर व्यापार करण्यास अधिकारी गणिला जाऊं लागला. या समाजव्यवस्थेस धर्माचें पाठबळ असल्यामुळें ती दीर्घकाल टिकली; परंतु ती कृत्रिम असल्यामुळें भिन्न भिन्न जातींनीं आपापल्या अधिकाराचें अतिक्रमण केल्याचे प्रकार मधून मधून घडून येत. पेशव्यांनीं ब्राह्मण्य बाजूस ठेवून राज्यसत्ता आपल्या हातीं घेतली, हें अशा अतिक्रमणाचें अगदीं अलीकडचें उदाहरण होय. पण हे प्रकार अपवादरूप होत.

एकंदरीनें चातुर्वर्ण्य संस्था बऱ्याच अव्यंग स्थितींत कायम राहिली. त्याचा परिणाम असा झाला, कीं, प्रत्येक जातींत त्या जातीच्या विशिष्ट गुणाचा मागमूसही नसलेल्या नादानांचा भरणा वाढूं लागला, ब्राह्मणांचा व वैश्यांचा पराक्रम क्षत्रियांच्या उपयोगीं पडेनासा झाला; शूद्रांची व स्त्रियांची नैसर्गिक बुद्धिमत्ता राष्ट्राची बौद्धिक संपत्ति वाढविण्याच्या कामीं येईनाशी झाली. याप्रमाणें बहुतांशीं निर्बुद्ध, निस्तेज व निःसत्त्व, बनलेल्या समाजावर परकीयांनीं स्वाऱ्या करावयास सुरवात करितांच, त्याचीं शकलें उडण्यास अवधि लागला नाहीं. यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नष्ट होऊन, तो एकामागून एक अनेक परकीयांच्या अमलाखालीं गेला.

आपल्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांनीं याच देशांत कायम वस्ती केल्यामुळें त्यांचे हितसंबंध आपल्या हितसंबंधाशीं बऱ्याच अंशांनीं निगडित राहिले; पण हल्लीचे राज्यकर्ते परदेशांत रहात असल्यामुळें यांचे व आपले हितसंबंध परस्परांहून भिन्न आहेत. शिवाय, हे राज्यकर्ते प्राचीन काळीं ज्ञान, सत्ता व संपत्ति, यांपैकीं प्रत्येक बाबतींत आपणाहून श्रेष्ठ आहेत; आणि

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिन्ही जातींचे अधिकार त्यांजमध्यें एकवटलेले असल्यामुळें ते आपणामधील एका एका जातीला भारी आहेत. आपण संख्येनें जरी आधिक असलों, तरी आपली संख्या शेंकडों पोटजातींमध्यें विभागलेली असल्यामुळें तिचा उपयोग आपणांस न होतां राज्यकर्त्यांसच होत आहे.

आपल्या देशांतील संपत्तीचा परदेशांत जो ओघ चालला आहे, तो आडवावयाचा असेल तर आपणास स्वयंसत्ताक शासनपद्धति प्राप्त करून घेऊन व्यापाराचीं व इतर धंद्यांचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं पाहिजेत. मध्ययुगांतील बहुजनसमाज अज्ञानी असल्यामुळें एकतंत्री अमलावर संतुष्ट राहिला; पण हल्लींच्या प्रजेपैकीं कांहीं भाग ब्राह्मणादि श्रेष्ठ व एकदां अधिकाराचा उपभोग घेतलेल्या जातींनीं बनलेला असल्यामुळें तो भाग तरी परकीय एकतंत्री अंमलावर संतुष्ट राहणें शक्य नाहीं. पण आपणापेक्षां श्रेष्ठ अशा राज्यकर्त्यांपाशीं हक्कांची मागणी परिणामकारक रीतीनें करण्यापूर्वीं त्यांस आपणाहून कनिष्ठ असलेल्या वर्गांस समान हक्क दिल्याशिवाय गत्यन्तर नाहीं; व ते दिले म्हणजे चातुर्वर्ण्यपद्धतीस शिथिलता येणार, ही गोष्ट कळून त्यांना पूर्णपणें चुकली आहे. परकीय राजसत्तेमुळें आपली राजकीय, आर्थिक, वगैरे बाबतींत कितीही अवनति झाली असली, तरी तिनेंच आम्हांला नवीन दृष्टि देऊन भावी उन्नतीची दिशा व मार्ग ठरविण्याच्या कामीं साहाय्यही केलें आहे. हल्लीं आपण प्रत्येक गोष्टीकडे धार्मिक दृष्टीनें न पहातां, राजकीय व सामाजिक दृष्टींनीं पाहूं लागलों आहोंत. श्रेष्ठ जातीस स्वतःसाठीं समान हक्क मागतांना इतर जातींना समान हक्क देण्याच्या इष्टतेचा विचार करणें भाग पडत आहे. याप्रमाणें वरिष्ठ जातींकडूनच उपक्रम झाल्यामुळें ज्ञान, सत्ता व संपत्ति, यांमधील कुंपणें भराभर नष्ट व्हावयास लागून, ती त्रयी सर्व ज्ञातींस सारखीच साध्य होऊं लागली आहे. शिक्षण सार्वत्रिक होण्याच्या मार्गाला लागलें आहे. राजसत्ता मागेंपुढें प्रजेच्या ताब्यांत येण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. पूर्वीं व्यक्तिनिष्ठ असलेली संपत्ति आतां समाईक भांडवलाच्या रूपानें संघनिष्ठ होऊं लागली आहे. कुळांच्या व मजुरांच्या संघांमुळें जमीनदार व भांडवलवाले

टेंकीस येऊन त्यांस मागेंपुढें आपल्या नफ्याचे वांटेकरी करतील अशीं लक्षणें दिसत आहेत. याप्रमाणें ज्ञान, सत्ता व संपत्ति, ही त्रयी आतां समाजाची मालमत्ता बनत चालली आहे. अशा स्थितींत पूर्वीं सेवेचेच अधिकारी गणिले गेलेले शूद्र व स्त्रिया, हे वर्ग अचल राहणें शक्य नाहीं.

**श्यामसुंदर—श्री. कृ. कोल्हटकर.**

---

## × १८. काव्यरचना.

काव्य म्हणजे भावनांच्या उत्कटतेचें व्यक्त स्वरूप. अपक्व वयांत बुद्धि जरी अपरिपक्व असली तरी भावना त्याच कारणामुळें उच्छृंखल असतात व यामुळें कवितेचा मुख्य मालमसाला बाळपणींच तयार असतो. पण त्यास व्यक्त व व्यवस्थित स्वरूप देण्यास जी बुद्धि आवश्यक असते, तिचा उदय जरा उशिरानें होत असल्यामुळें काव्यशक्तीचा उत्कर्ष अगदीं बालवयांत होऊं शकत नाहीं. कवीस सृष्टीचा गायक म्हणतात व तें लाक्षणिक अर्थानें खरेंही आहे. पण गायनापेक्षां काव्यास बुद्धीची जरूर पुष्कळच अधिक असते. अनेक बालगायकांत एकादा बालगंधर्व असूं शकेल; पण हजारों बालपद्यलेखकांत एक तरी बालकवि आढळेल कीं काय याची शंका वाटते. एकाद्या मुलास 'बालकवि' ही पदवी अर्पण करितांना आपण बहुधा 'बाल' शब्दाच्या व्याप्तीचा विस्तार किंवा कवीच्या आवश्यक गुणांचा संकोच करीत असतों.

कवीस कल्पनासृष्टींत यथेच्छ विहार करण्याची मोकळीक असल्यामुळें स्वातंत्र्य जसें विपुल असतें, त्याप्रमाणें स्वतःची कृति रसिकांच्या ग्रहणशक्तीच्या आटोक्यांत आणणें, किंबहुना त्यांस शक्य तितकी प्रिय वाटण्यासारखी करणें भाग असल्यामुळें बंधनेंही भारी असतात. शब्द गाळण्याची किंवा त्यांचीं रूपें व क्रम बदलण्याची त्यास मोकळीक असली तरी त्यास अक्षरांची योजना नादबद्ध व तालबद्ध रचनेस पोषक म्हणजे कर्णमधुर व वृत्तानुकूल करावी लागते. सत्य सृष्टींतील नियम जरी त्यानें झुगारून दिले तरी कल्पनासृष्टींतील नियम त्याला पाळावे लागतात. त्यानें निर्माण केलेली सृष्टि कितीही काल्पनिक असली तरी त्यास तिच्या सत्यत्वाबद्दल रसिकाच्या चित्तांत प्रत्यय उत्पन्न करावयाचा

असल्यामुळें त्यानें कल्पिलेल्या व्यक्तींच्या प्रकृति, वृत्ति व कृति रसिकचित्तास पटण्यासारख्या स्वाभाविक असाव्या लागतात. त्यानें रंगविलेलीं पात्रें कितीही दैवी किंवा राक्षसी स्वभावाचीं असलीं तरी त्यांची परीक्षा करणारा रसिक या जगांतीलच असल्यामुळें त्याचें वर्तन निसर्ग नियमांस सोडून असतां कामा नये. सारांश, कवीस आपल्या कल्पनास्वातंत्र्यास औचित्याचा पायबंद घालावा लागतो.

याशिवाय भाषाशुद्धि, पूर्वापरसंबंध, दूरान्वयाचा व असंबद्धतेचा अभाव, पुनरुक्तिराहित्य, शब्दांचीं काटकसर, त्यांची कांटेतोल योजना, कल्पनांचा ग्रहणानुकूल क्रम, इत्यादि गोष्टी गद्यलेखांत जशा साधाव्या लागतात, तशाच काव्यांतही साधाव्या लागतात. ज्याप्रमाणें शरीर सुदृढ किंवा सुंदर होण्यापूर्वीं निरामय असणें जरूर असतें, त्याप्रमाणें काव्य सालंकार व सरस होण्यापूर्वीं निर्दोष असणें इष्ट असतें. स्फूर्तीच्या उसळीसरसें बाहेर आलेल्या काव्यांत दोष राहिलेच पाहिजेत, असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. स्फूर्तीची लहर कितीही अल्पजीवी असली, तरी त्या अल्प अवधींत तिला वृत्ताची व अनुप्रासांचीं बंधनें पाळितां येतात, हें निर्विवाद आहे. मग दोष काढून टाकणेंच कां जड जावें ? बरें, तितकी फुरसद त्या लग्नघाईंत मिळण्यासारखी नसते, असें जरी घटकाभर कबूल केलें, तरी मागाहून सावकाशीनें तें काम करण्यास तरी मुळींच हरकत नसावी. जे दोष थोड्याशा श्रमा अन्तीं इतरांस दूर करतां येतात, ते खुद्द कवीस दूर करणें कां जड जावें ? गुणांच्या नाहीं तर दोषांच्या तरी आधिक्यावरून स्फूर्तीच्या अभावाबरोबर दक्षतेचा व चिकाटीचा प्रभाव मात्र दृष्टीस पडतो.

जुन्या कवींच्या रचनेंत ते दोष खपतात, म्हणून ते आपल्याही रचनेंत खपतील, असा कवीनें स्वतःचा समज करून घेतां कामा नये. एक तर, त्या कवींनीं ते दोष जाणून बुजून राहूं दिलेले नसतात. दुसरें असें कीं, त्या काळच्या कवींत व रसिकांत शिक्षणाचें व संस्कृतीचें सरासरीनें जें प्रमाण होतें, त्यापेक्षां सांप्रतच्या कवींत व रसिकांत अधिक असल्यामुळें सांप्रतच्या कवींपासून सांप्रतचे रसिक अपेक्षाही अधिक करितात. तुल्य योग्यतेच्या दोन काव्यांत जें अधिक निर्दोष, तेंच अधिक दीर्घजीवी होणार, हेंही कवीनें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. आम्ही स्वतंत्र असून, आम्हांस रसि-

कांशीं कांहीं कर्तव्य नाहीं, असें जे कवि म्हणतात, ते स्वतःची फसवणूक करून घेतात, असें समजावें. स्वतःची कविता प्रसिद्ध करण्याची त्यांना जी घाई सुटते, तिजवरून ही गोष्ट उत्तम रीतीनें सिद्ध होते. इतर कलांप्रमाणें काव्य हेंही रसिकोपजीवी आहे. गाण्याच्या बैठकींत गवई श्रोत्यांकडे पाठ करून गाऊं लागला, तर तें जसें शोभणार नाहीं, तसें कवीनें रसिकांकडे कानाडोळा करणेंही शोभणार नाहीं.

**दुटप्पी कीं दुहेरी—श्री. कृ. कोल्हटकर.**

---

## १९. मुक्तेश्वरांची शिकवण.

मुक्तेश्वरांचें निसर्गनिरीक्षणाप्रमाणें व्यवहारनिरीक्षणही फार सूक्ष्म होतें. डॉ. जॉन्सन् यांनीं जी कवितेची व्याख्या[1] केली आहे, ती मुक्तेश्वर, मोरोपंत, इत्यादि कवींच्या काव्यांला बहुशीं लागू पडते. मनोरंजन हा जरी या कवींच्या काव्यांचा तात्कालिक हेतु धरला, तरी अंतिम हेतु लोकशिक्षण हाच दिसतो. " ईश्वरभक्ति हाच आपला काव्यरचनेचा हेतु आहे; भक्तीशीं विसंगत अशीं वर्णनें असतील, तर तीं सज्जनांनीं खुशाल खोडून टाकावीं, " असें मुक्तेश्वरांनीं वाचकांना एके ठिकाणीं बजाविलें आहे. परंतु त्यांच्या काव्यांचें योग्य परिशीलन केलें असतां, केवळ ईश्वरभक्ति किंवा ईशकथासंकीर्तन हाच त्यांचा हेतु नसावा, हें समजून येईल. प्रत्यक्ष ईशभक्तीशीं ज्यांचा संबंध लागत नाहीं, असे शृंगार, वीर रसांचे प्रसंग, भोजनसमारंभ, राजनीति, समाजनियम, आचारविचार, सामान्य नीतितत्त्वें, यांवर मुक्तेश्वरांनीं जो पाल्हाळ केला आहे, त्याचा विचार केला तर तो निर्भेळ उत्कट भक्तीचा उद्रेक आहे, असें म्हणवत नाहीं. मुक्तेश्वर जरी साधुसंतमालिकेंत मोडत नाहीत, तरी त्यांच्या ग्रंथांकडे नीट लक्ष्य दिलें असतां, असें दिसून येतें कीं, त्यांचा आत्मा राष्ट्रहिताकरितां तळमळत होता. स्वधर्मीयांना सुस्थिति

---

१ The end of writing is to instruct; the end of poetry is to instruct by pleasing.–preface to Shakespeare.

यावी, आपल्या समाजांतील व्यंगें दूर होऊन तो उन्नत व्हावा, दुष्टांचें दंडन व साधूंचें पालन करणारी राजनीति असावी, आपल्या राष्ट्रबांधवांनीं मर्दानी पेशा कायम ठेवून दिग्विजयाचा झेंडा नाचवावा, अज्ञानाचा निरास होऊन बहुजनसमूहाला जागृति यावी, व त्यास आपल्या निकृष्ट अवस्थेचा उलगडा पडावा, ' टिळाटोपी ' करणाऱ्या दांभिक भोंदूंच्या कसबांतून आपला समाज सुटावा, सदाचारनीतीचा विजय व्हावा, अधर्माचे देव्हारे कमी व्हावे, इत्यादि महाविभूतींच्या अंतःकरणांत निरंतर चळवळणारे विचार मुक्तेश्वरांच्या अंतःकरणांतही खळबळत होते. त्यांनीं आपल्या काव्यांत, मनोरंजनाचें धोरण कायम राखून, प्रसंगानुरूप कधीं दृष्टान्तमिषानें, तर कधीं रूपकादि स्वरूपानें, कधीं मुग्ध दिग्दर्शनानें, तर कधीं प्रत्यक्ष व्यक्त रूपानें व्यावहारिक गोष्टींची सुंदर गुंफणी करून टाकली आहे, व सामाजिक चर्चेचा ज्या बाणेदारपणानें त्यांनीं ऊहापोह केला आहे व कित्येक स्थळीं तीसंबंधें त्यांनीं जो विस्तार केला आहे, त्यांकडे कटाक्ष ठेवला म्हणजे मुक्तेश्वर समाज–सुधारणेला किती महत्त्व देत होते, व समाजव्यंगावर बोट ठेवण्यांत ते किती कुशाग्र व निःस्पृह होते, हें ध्यानीं येण्यासारखें आहे. या दिशेनें मुक्तेश्वरांची कामगिरी तुकाराम, रामदास, वामनपंडित इत्यादि कवींच्या धोरणाचीच आहे; मात्र ती तेवढया विशाल प्रमाणावर नाहीं, व तिचा प्रत्यक्ष परिणाम काय घडला, हेंही आजमावतां येण्यासारखें नाहीं. ही कामगिरी व तिचें फळ हीं ठळक रीतीनें नजरेंत न भरण्याचें कारण मुख्यतः हेंच कीं, मनोरंजनाच्या पडद्याआड या कामगिरीचें तेज आहे. चिमणीच्या प्रखर तेजानें डोळे दिपूं नयेत म्हणून त्यावर कागद लावणें किंवा मुलांना जंतांची पूड साखरेच्या पाण्यांत देणें, अशांतलाच वरील प्रकार आहे; म्हणजे मनोरंजन हाच मुक्तेश्वरी काव्याचा तात्कालिक परिणाम आहे, तरी लोकशिक्षण–समाजसुधारणा, ज्ञानप्रसार, सदाचाराचा विजय, दंभस्फोट, इत्यादि–हाच त्याचा अंतिम हेतु आहे. मुक्तेश्वरांनीं देशस्थितीसंबंधें जे उद्गार व सामाजिक आणि राजकीय जे तात्त्विक व धार्मिक विचार, आपल्या काव्यांत व्यक्त किंवा मुग्ध रीतीनें गोंविले आहेत, त्यांवरून तत्कालीन राष्ट्रस्थितीचा चांगलाच अंदाज करितां येतो.

मुक्तेश्वरांच्या काळीं ब्राह्मणांमध्यें शास्त्राध्ययन बरेंच जारीनें चालत असे, व ठिकठिकाणीं निरनिराळ्या मतवाल्या पंडितांचे कडाक्याचे वाद होत असत. अर्थात्, या वादांमध्यें तत्त्वांपेक्षां शब्दांवर जोराच्या चकमकी उडत असल्यामुळें, ते वाद म्हणजे कुशाग्र बुद्धीच्या कसरतींचे खेळच होते. त्यांत ज्ञानापेक्षां अभिमानाला व ऋजुत्वापेक्षां आग्रहालाच जास्त महत्त्व आलेलें असे. त्यामुळें व्यवहारी, कर्मनिष्ठ व छळवादपराङ्मुख, अशा समंजस व्यक्तींना या वादांचा प्रत्यक्ष कोणताच उपयोग होत नसे, व म्हणून ते सर्वांसच सारखा मान देत असत. ज्याप्रमाणें हल्लीं क्रिकेट, आट्यापाट्या, बुद्धिबळें, वगैरे खेळांचे सामने होतात, त्यांतलाच वरील वादांचा थोडाबहुत प्रकार असे. त्यांत वाद मिटविण्याचा फारसा प्रयत्न नसून, वाद करण्याच्या चातुर्याचीच परीक्षा पाहण्याचा हेतु असे. या प्रकारचा वाद मुक्तेश्वरांनीं शकुंतलाख्यानांत कण्वाच्या तपोवर्णनांत आणला आहे, व त्यास व्यासकृतींत त्या ठिकाणीं मुळींच आधार नाहीं; तेव्हां पंडितमंडळीचा मुक्तेश्वरांस जो नित्याचा अनुभव असे, त्याचा पगडा येथें तपोवर्णनप्रसंगीं कवीच्या मनावर बसून तो अनुभव कवीनें शब्दांत वठविला आहे. या वादांत, कवीनें जाणतेपणाचा हक्क जरी वेशंपायांस दिला आहे असें भासतें, तरी

ऐसे नाना मतांचे वाद, रायें परिसोनी महाविनोद,
सांडोनियां भेदाभेद, एकभावें समस्तां ॥
साष्टांग करूनि नमन, राहवुनी सेनाप्रधान,
निःसंग एकाकी आपण, कश्यपाश्रमीं प्रवेशे ॥

आदिपर्व, १५–९३–९४.

असें वाद ऐकणाऱ्या राजाचें वर्णन करून, 'असे वाद म्हणजे केवळ महाविनोदाचीं स्थळें होत, त्यांतील भेदाभेद दूर न होण्यासारखा अतएव ऐकून विसरण्याजोगाच होय, हे मतवाले सर्वच नमनयोग्य होत,' असें आपलें मत मुक्तेश्वरांनीं स्पष्ट दर्शविलें आहे.

मुक्तेश्वरांच्या वेळीं निरनिराळ्या संप्रदायाचे साधुसंत मोठमोठे शिष्यपरिवार बाळगून हिंडत असत, असें दिसतें. हल्लींप्रमाणें त्यावेळींही या संतांळ्यांतून व गोसाव्यांच्या मेळ्यांतून पोटभरू दांभिकांचा व दुराचारी

सोंगाड्यांचा मोठा सुळसुळाट असे. अशा अधमांवर मुक्तेश्वरांचा साहजिक मोठा कटाक्ष होता व त्यांवर त्यांनीं कठोर फटकारे ओढले आहेत.

धर्माच्या नांवावर पैसे उकळणारे, भक्तीच्या नांवावर दंभ विकणारे, मंत्रोपदेशाच्या नांवावर अनाचार करणारे, निःसंगित्वाच्या नांवावर देशास भुर्दंड पाडणारे, बोकेसंन्यासी, सिद्धसाधक, ढोंगी, गोसावी समाजास रसातळास नेतील, असेंच मुक्तेश्वरांस वाटत होतें. खऱ्या सुस्थित व सुशील समाजांत यांना जागा मिळूंच नये असें ते म्हणतात. दुष्यन्तराजाच्या अंमलांत उत्तमोत्तम समाजस्थिति होती, अशी कल्पना करून जें वर्णन मुक्तेश्वरांनीं केलें आहे, त्यांत समाजाला भिकारी करणाऱ्या व त्यावर आपल्या पापकृत्यानीं दुष्काळादि संकटें आणणाऱ्या या भोंदूंना मुक्तेश्वरांनीं पायही ठेवूं दिला नाहीं.

मुक्तेश्वरांचीं ‘ मूर्खांचीं लक्षणें ’ म्हणजे त्या वेळच्या समाजांतील दुष्ट व्यवहारांचीं टिप्पणेंच आहेत. त्यांतील कित्येक वाचलीं म्हणजे मुक्तेश्वर व्यवहारांत किती चाणाक्ष, सूक्ष्मदृष्टि व तल्लख होते, हें स्पष्ट होतें.

गरिबाचें लग्न करून देणें हें कृत्य मुक्तेश्वरांच्या कालीं फार पुण्यकृत्य समजत असत, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष राज्यकर्त्यांनेंही त्या कामीं दक्षता ठेविली पाहिजे अशी स्वतः मुक्तेश्वरांची कल्पना होती.

विवाहकाळीं श्रीमंतांकडे किती टोलेजंग भोजनसमारंभ होत असत याची कल्पना, अभिमन्यूचा विवाह, राजसूययज्ञ, कौरवपांडवांचें वनभोजन इत्यादि प्रसंग वाचले म्हणजे थोडीबहुत होण्यासारखी आहे. अभिमन्यूच्या विवाहप्रसंगींच्या भोजनसमारंभाचें वर्णन म्हणजे मुक्तेश्वरांना माहीत असलेल्या शाकभाज्या, चटण्याकोशिंबिरी, गोडधोड पक्वान्नें यांची एक लांबलचक यादीच आहे! लग्नसमारंभांत बायकांचे मानपान, त्यांचें रुसणेंफुगणें, गोंधळ घालणें, धेंडा नाचविणें वगैरे प्रचार व कुळाचार हल्लींप्रमाणेंच मुक्तेश्वरांच्या वेळीं होते.

आईबापांस सोडून सासुरवाडच्या माणसांच्या नादानें चालणारे कुश्चित्ताचारी व सासूंना छळणाऱ्या सुना, यांचाही मुक्तेश्वरांस चांगला अनुभव आलेला दिसतो. त्यांनीं नारदनीतींत पुढील प्रश्न राजास घातले आहेत:—

मातापिता दवडूनी दुरीं, श्वशुरवर्ग सांठवी घरीं,
ऐशा कुश्चित्ताचार परी, तुझ्या देशीं नाहींत कीं ?
सुना छळिती सासुवांतें, पुत्र अव्हेरिती पित्यांतें,
सेवक अवगणिती स्वामींतें, ऐसें होत नाहीं कीं ?

सभापर्व, ३।१४४–४५.

आतांपर्यंतच्या प्रतिपादनावरून धार्मिक व सामाजिक बाबतींत महाराष्ट्र किती स्थिरप्रकृति आहे, याचा ताळा पडतो. सद्यःकाळीं महाराष्ट्रांत धार्मिक व सामाजिक क्रान्ति घडवून आणण्यास किती प्रबळ कारणें आहेत व किती निकराचे प्रयत्न चालले आहेत तें लक्ष्यांत घेतलें म्हणजे वरील स्थिरप्रकृतीचें विशेषच आश्चर्य वाटतें. मुक्तेश्वरांचे उद्गार आजच्या समाजालाही तंतोतंत लागू पडतात व ही समाजाची स्थिति त्यांच्या पूर्वीं किती शतकेंपर्यंत होती हें सांगणें बहुतेक अशक्यच आहे. शेंकडों वर्षांच्या मुसलमानांच्या करड्या अंमलाखालीं चुरडलेल्या हिंदु समाजानें आपलें स्वत्व सोडलें नाहीं, ही त्याच्या चिकाटीची उत्तम साक्ष आहे.

मुक्तेश्वरांच्या वेळीं हिंदुस्थानांत परदेशचे पुष्कळ व्यापारी येत असत. त्यावेळीं हिंदुस्थान फार सधन असल्यामुळें देशांत संपत्तिसंपादक अनेक धंदेही ऊर्जित दशेंत असल्यामुळें व हिंदुस्तानांत पैदा न होणाऱ्या चिजा या परकीय व्यापाऱ्यांच्या मार्फत लाभत असल्यामुळें एकंदरींत या व्यापाराच्या उलाढालीनें हिंदुस्तानचें कल्याण होत असे; त्याच्या कारागिरीच्या जिनसांना गिऱ्हाईक मिळे, त्याच्या कलाकौशल्याचा लौकिक पसरे, त्याच्या धनाढ्यतेनें परकीयांना वचक बसे व एकंदर व्यापारावर या गोष्टींचा अनुकूल संस्कार घडून येई. अशा परकी व्यापाऱ्यांना सवलती द्याव्या, त्यांच्याबरोवर विशेष आदरानें देवघेव करावी, त्यांना संतुष्ट ठेवावें असें मुक्तेश्वरांचें मत होतें. अर्थात् सांप्रत हिंदुस्थानावर आलेल्या औद्योगिक संकटाचें स्वप्न त्यावेळीं मुक्तेश्वरांस पडणें संभवनीय नसल्यामुळें अनियंत्रित व्यापाराला ते अनुकूल होते.

त्यावेळीं कापडाचा व्यापार मोठा चलतीचा असून हिंदुस्थानांत हरतऱ्हेचें तलम कापड तयार होत असे. द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगीं मुक्तेश्वरांनीं

अनेक प्रकारच्या चुनडया, लुगडीं, सावुलीं, पातळें, कुळडया, साडया, शेले, शेलारे यांचा निर्देश केला आहे. त्यावेळीं उत्तम प्रकारचीं चित्रें तयार होत असून त्यांवर विष्णुशंकरांचीं सहस्रनामें, मत्स्यादि अवतारांचीं चित्रें, भूगोलाचे नकाशे व शंकरपार्वत्यादिकांच्या प्रतिमा हीं रेखलेलीं असत.

धर्मनीतिपर राजाच्या अमदानींत देशांत दुष्काळ, दारिद्र्य, रोगराई येत नाहीं, असा मुक्तेश्वरांचा अभिप्राय आहे. पावसाची वाण पडली तरी शेतकीला धोका येऊं नये म्हणून तळीं, विहिरी खोदणें व पाटबंधाऱ्यांचीं कामें करणें हें राजाचें अवश्य कर्तव्य आहे असें ते समजत, व शेतकीच्या उत्तेजनार्थ गरीब शेतकऱ्यांस तगाई व बियाणें द्यावें असेंही ते म्हणतात.

राजानें जितेंद्रिय असावें. गोब्राह्मणांचें पालन करावें. कामगारांना योग्य पगार देऊन, लांचलुचपतीला जागाच ठेवूं नये. गुणांवर भार ठेवून कामदार नेमावे, तेथें वशिल्याला किंवा वर्णभेदाला शिरूं देऊं नये. अचाट कामें सेवकांकडून करवून घ्यावीं व त्यांना त्यांचा मोबदलाही अचाट द्रव्यानें व मानदानानें करावा. आपले मंत्री योग्य प्रकारें कारभार करीत आहेत कीं नाहींत हें समजण्यासाठीं गुप्त हेर ठेवावे. भिल्ल, ठक, कोळी इत्यादि शांतताभंग करणाऱ्यांच्या राहाट्या मोडून टाकाव्या. परराष्ट्र जिंकण्याच्या कामीं रणभूमीवर धाडसी सैन्य उभें करावें व युद्धार्थ समोर येणाऱ्या शत्रूंचें पीठ करावें. परंतु त्यावेगळ्या शांततेनें राहणाऱ्या प्रजेची उगीच नागवण करूं नये. मुंगी चावतांक्षणीं त्या टिकाणीं जसा हात आपोआप वळतो त्याप्रमाणें दुःखार्त दीनांना शोधून राजानें त्यांच्या साहाय्यार्थ धावावें. दुर्गांवर—किल्ल्यांवर—राज्याचें सामर्थ्य अवलंबून असल्यामुळें ते मुळींच नादुरुस्त होऊं देतां कामा नयेत. त्यांत अन्नसामग्री वगैरे वेळच्या वेळीं पुरवीत गेलेंच पाहिजे.

मठ, विहिरी, देवळें, यांचा जीर्णोद्धार करणें, गुणी जनांना मुक्तद्वार ठेवणें, राजपुत्रांना योग्य शिक्षण देणें, सैन्याचा पगार वेळच्या वेळीं चुकता करणें, खजिन्याची उधळपट्टी न करणें, सडका, रस्ते, यांची दुरुस्ती

ठेवणें यांकडे राजानें सूक्ष्म लक्ष पुरविलें पाहिजे. प्रजेचा संतोष हेंच राजाचें भूषण.

देशांत स्वास्थ्य नांदावें, व सर्व व्यवहार सुरळीतपणें चालावे, म्हणून देशरक्षणाची व रानांत राहाट्या करून राहणाऱ्या लुटारू लोकांचा बंदोबस्त करण्याची व्यवस्था राजानें केली पाहिजे.

'अग्नि, सर्प, चोर, व्याघ्र, रोग, राक्षस व परचक्र, यांपासून राज्याचें मोठ्या मर्दपणानें संरक्षण करावें, व शत्रुनाशास्तव जरूर पडल्यास अकबरी व अवरंगझेबी उपायही अंमलांत आणावे' असें मुक्तेश्वरांनीं सुचविलें आहे.

' वैद्यबोवा, चंपी करणारे न्हावी, कोष्टी, नापिक व जवळचे हुजरे, यांविषयीं राजानें फारच सावध राहिलें पाहिजे. ' कारण अनेक वेळां त्यांच्याच द्वारें फंदफितुरी व दंगे होत असतात.

मुक्तेश्वरांच्या वेळीं मर्दानी खेळांची, तालमीची, कुस्त्यांची. दांडपट्ट्यांची, महाराष्ट्रांत फार चलती होती असें दिसतें. मुक्तेश्वरांना या गोष्टींची किती हौस होती, हें त्यांचीं द्वंद्वयुद्धांचीं वर्णनें व कौरवपांडवांची धनुर्वेदपरीक्षा, हीं प्रकरणें वाचलीं म्हणजे स्पष्ट होतें. असो. एकंदरींत, या ऊहापोहावरून असें सिद्ध होतें कीं, मुक्तेश्वरांचा काव्यग्रंथांतील हेतु केवळ भक्तीचा गौरव नसून, लोकांत व्यवहारज्ञान यावें, राजनीतीचीं तत्त्वें त्यांस कळावीं, समाजांतील दोष दूर व्हावे, लोकांचा आळस झडून त्यांनीं मर्दानीपणा दाखवावा, राष्ट्रांत तेज चमकूं लागावें, इत्यादि गोष्टींचा त्यांनीं आपल्या काव्यहेतूंत अन्तर्भाव केलेला आहे.

मुक्तेश्वर—बा. अ. भिडे.

---

## २०. विनोद.

विनोद हें गंभीर व खेळकर अशा दोन परस्परविरुद्ध वृत्तींचें मिश्रण आहे, व संसाराची कोणतीही उपपत्ति घेतली, तरी ती समर्पक रीतीनें सर्वांशीं लागू पडत नाहीं. या गोष्टीमुळें तत्त्वज्ञानी हा विनोदी बनण्याचा संभव उत्पन्न होतो. आनंदवाद किंवा सदाशावाद घेतला, तर त्यांच्याशीं संसारांत प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या दुःखांचा मेळ चांगलासा घालतां

येत नाहीं; म्हणजे ज्यास मनुष्यमात्राबद्दल खरी कळकळ व सहानुभूति आहे, अशा मनुष्यास जर सांगितलें कीं, सकृद्दर्शनीं जीं दुःखें म्हणून दिसतात, तीं दुःखें नसून जीविताच्या किंवा जगाच्या आनंदरूपी होणाऱ्या पर्यवसानाचीं साधनें आहेत, तर तें त्यास फारसें पटावयाचें नाहीं. परंतु असा आनंदवाद किंवा सदाशावाद ज्यांस सर्वांशीं संमत नाहीं, असा मनुष्य जर विनोदी असेल, तर तो निराशावादी किंवा दुःखवादीही बनणार नाहीं. फक्त संसार हा दैवाचा मनुष्यांशीं एक प्रकारचा खेळ आहे, असा विचार त्याचे मनांत येईल; व तसें झालें म्हणजे अर्थातच गंभीर व गमतीच्या अशा विचारांचें मिश्रण होऊन त्यास विनोदप्रतीति होईल व हसू येईल. त्याला स्वस्वरूपाच्या अज्ञेयत्वाबद्दल निव्वळ खेद न वाटतां, तो आपल्याशीं बहुधा असें म्हणेल कीं, "हें सर्व गौडबंगाल दिसतें. कोणची उपपत्ति घेतली, तरी ती पुरत नाहीं व सर्वांशीं लागू पडत नाहीं; तेव्हां जाईना का? उगाच उपपत्ति रचीत बसण्याचे श्रम कशाला घ्या? आहे या स्थितीचें मनन केलें म्हणजे गम्मत व हास्यानंद होतो तेवढा आपला खरा."

आध्यात्मिक किंवा पारमार्थिक विचार व विनोद यांचा वरीलप्रमाणें संबंध आहे. परंतु तोही बाजूस ठेवून आपण विचार करूं लागलों, तरी जगांतील नीति वाढविण्यास विनोदाचा अप्रत्यक्ष रीत्या उपयोग होतो, हें सूक्ष्म दृष्टीनें पहाणारास कळून येईल. अनीतीचें आविष्करण करण्यास विनोदासारखें दुसरें कोणचेंच साधन समर्थ नाहीं. अनीतीची निंदा केवळ रागानें केली असतां, ती उलटून एखाद्या बेफाम घोड्याप्रमाणें अपायी होण्याचा संभव असतो. परंतु विनोदाच्या मऊ अशा शलाकेनें अनीतीच्या सदोष दृष्टींत अंजन फिरलें असतां, ती हळू हळू निवळूं लागते. खुद्द विनोदी स्वभावाला तुम्ही सद्गुणाच्या यादींत घाला किंवा न घाला, परंतु त्याच्या हातून जो नैतिक उपयोग होतो, त्याबद्दल वाद नाहीं. विनोदाला सद्गुण म्हणण्यासंबंधानेंही कांहीं हरकत आहे असें आम्हांस वाटत नाहीं. ज्याच्यापासून मनुष्याला स्वतःला इतकें सुख होण्याचा संभव आहे, व ज्याचे हातून दुसऱ्याची इतकी सुधारणा होणें शक्य आहे, त्यास सद्गुण कां म्हणूं नये, हें आम्हांस कळत

नाहीं. मनुष्याचे मनांत पापबुद्धि किंवा कित्येक दुष्ट व निंद्य विचार असूनही त्याला एक प्रकारें हसूं येईल, परंतु अशा प्रकारचें दोषी हास्य वगळलें असतां, इतर प्रकारचें म्हणजे निर्दोष हास्य ज्यांस येतें, ते खरोखर धन्य होत. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कार्लाईल यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, ज्या मनुष्यास आयुष्यांत एकदां तरी खळखळून व मनसोक्त हसूं आलें असेल, तो मनुष्य अगदीं टाकाऊ असणें कधींही शक्य नाहीं. त्याच्यांत कांहीं ना कांहीं तरी चांगले गुण असणें शक्य आहे. निदान इतकें तरी कबूल करावें लागेल कीं, विनोदास सद्‍गुण म्हटलें किंवा न म्हटलें, तरी तो असल्याशिवाय कोणताही मनुष्य, मग तो इतर रीतीनें कितीही सद्‍गुणी असो, पूर्णतेस पोंचला, असें म्हणतां यावयाचें नाहीं, व विनोदशीलता हा सुस्वभावांत मुख्य घटक आहे. कारणाशिवाय दुसऱ्यास न दुखविणें, त्यास खूष ठेवण्याचा योग्य प्रयत्न करणें, व त्याजविषयीं एक प्रकारचा कृपाळूपणा मनांत वागविणें या आपल्या स्वभावगुणांनीं विनोदी मनुष्य स्वतःच्या व दुसऱ्याच्या सुखास व आनंदास कारणीभूत होतो. मनुष्यकृत दुःखांधकार घालविण्यास मनुष्यकृत विनोदासारखें दुसरें कोणतेंही तेज प्रभावी होऊं शकत नाहीं. कोट्या करणारा मनुष्य हा मनुष्यजातीचा एक श्रेष्ठ उपकर्ता आहे, असें मानावें लागतें. शुद्ध भावानें केलेला विनोद हा एक प्रकारचा स्निग्ध असा गिलावा आहे. त्याचे योगानें स्नेह्यांतील स्नेह, आणि मानवी कुटुंबांतील मनुष्यांचें परस्पर प्रेम हें बळकट होतें. केवळ एकमेकांबद्दल आदर बाळगणाऱ्या स्नेह्यांचा स्नेह, आदर असूनही ज्यामध्यें विनोदशीलता आहे अशा स्नेह्यांमधील स्नेहापेक्षां कमी रम्य, कमी सुखकर व कमी टिकाऊ असतो. त्याचप्रमाणें असें एखादें कुटुंब घ्या कीं, ज्यांतील माणसें फक्त आपापल्या नात्याचे संबंध मनांत आणून परस्परांशीं वागतात; व दुसरें एक कुटुंब असें घ्या कीं, त्यांतील मनुष्यें हा नात्याचा संबंध न विसरतां मित्रत्वाच्या नात्यानें हसून खेळून व्यवहार करितात;—या दोन कुटुंबांपैकीं अधिक सुखप्राप्ति कोणाला बरें होईल ? कित्येक कुटुंबांत मुलग्यास मुलें झालीं, तरी तो आपल्या बापापुढेंही उभा राहात नाहीं, किंवा वानप्रस्थाश्रमास योग्य झालेल्या

नवराबायकोंचें मनोगत दिवसा परस्परांस कळवावयाचें झालें, तर त्यांना कोर्टांतल्याप्रमाणें एखादा दुभाष्या लागतो, व यांतच काय तें खरें बालबोध वळण आहे, अशा समजुतीनें आपल्या घरच्या या फाजील मर्यादेचा अभिमान बाळगणारीं व विनोदशत्रु अशीं कित्येक कुटुंबें अद्यापिही आढळून येतात. याच्या उलट समजा कीं, एखाद्या कुटुंबांत भाऊभाऊ, नवराबायको, आईबाप व मुलें, हीं सर्व परस्पर मिळून मिसळून नेहमीं बोलतात, चालतात; बसतात, उठतात; जो तो आपापल्या बुद्धिमत्तेप्रमाणें युक्तिवाद, कोट्या व विनोद करितो, व दुसरा —मग तो लहान किंवा वडीलधारा असो—आपल्या बुद्धिशक्तीप्रमाणें त्या युक्तिवादास, त्या कोटयांस व त्या विनोदास संवादी असें प्रत्युत्तर देतो, व सर्वजण मिळून सर्वजणांची हास्यविनोदद्वारें करमणूक करितात. अशी स्थिति असेल, तर त्या कुटुंबांत पृथ्वीवरच स्वर्गसुखाचा अवतार झाला आहे, असें मानण्यास काय हरकत आहे ?

शिक्षणशालांचीही अशीच गोष्ट आहे. शिक्षक व छात्रगण यांनीं मिळून विनोद केला म्हणजे गुरुशिष्यांच्या नात्यास रजाच मिळाली असें मानण्यास कारण नाहीं. एवढेंच नव्हे तर जो गुरु विद्वान् असून विनोदीहि दिसतो, तोच शिष्यवर्गास विशेष प्रिय व मान्य होतो.

**सुभाषित व विनोद—न. चिं. केळकर.**

---

## २१. जयाप्पा शिंद्यांचा खून.

[ मागील उताऱ्यांत वर्णिलेलें घनघोर युद्ध झाल्यावर, जयाप्पा शिंद्यांनीं विजयसिंगाच्या नागुरदुर्गास वेढा दिला. वेढा देऊन बारा महिने झाले. ]

नागुरांत बिजेसिंग यानें विचार केला कीं, " मल्हारराव यांचे भिस्तीवर आम्हीं हा अंगीकार केला. परंतु कागदींपत्रीं मात्र समाधान करितात. आम्हीं दम कोठवर धरावा ! एक वर्ष जाहलें. पांच मनुष्यांची कुमक नाहीं. " तेव्हां आपले वकिलासमागमें पत्र मल्हारराव यांस देऊन पाठविलें कीं, " पादशाही उमराव अथवा भुमे रजवाडे

यांचे भरंवशावर आम्हीं हिंमत केली नाहीं. तुम्हीं भरंवसा दिला म्हणोन आम्हीं या गोष्टीचा अंगीकार केला. आतां आमची गत काय ? " म्हणोन मल्हारराव यांस वर्तमान सांगतांच मल्हारराव यांनीं उत्तर केलें कीं, " शिंदे व आम्ही एक खावंदांचे चाकर. तेव्हां उघड तुमची कुमक आम्हांस करतां येत नाहीं. परस्परें या रानांतील उमराव व रजवाडे यांस पत्रें देऊन तुमची कुमक करवितों. " म्हणोन तमाम छोटेमोठे सरदार यांस साहित्यपत्रें दिलीं, आणि वकिलास हिंमत देऊन सांगितलें कीं, " तुम्हीं ठासून राहावें, म्हणजे त्यांच्यानें रोमहर्षण होत नाहीं. तसें करितां तुम्हांस कोणी मदत न करो, तरी कांहीं मोंगलाई मसलत करून तुम्हीं यश संपादावें. असें सांगोन वकील बिजेसिंग याजकडे रवाना केले. भुमे रजवाडे यांस पत्रें प्रविष्ट केलीं. तों मारवाडी यांचें पारिपत्य जाहालें, येणेंकरून सर्वत्रांची छाती फाटोन गेली. कोणी कुमक करीनात.

नागुरांत याणें आपले उमराव बोलावून मसलत केली कीं, " आतां आमची कोणी कुमक करीत नाहींत. मल्हारराव यांणीं इरेस घातलें, परंतु त्यांच्यानें उघड साहित्य होत नाहीं. समग्र सवा वर्ष जाहालें. आम्हीं आतां कोंडून कोठवर राहावें ? महागाई बहुत, आणि गनीमही शह सोडून जात नाहीं, हा पूर्ण भरंवसा कळोन आला. आतां मोंगलाई मसलतीनें होईल तें करावें. म्हणोन तिघे मारेकरी सिद्ध केले. धन्य ते रजपूत ! सतीचें वाण घ्यावें, तसे तयार जाहाले. त्यांणीं आपला जीव मुठींत धरिला. मग त्यानें त्यांस काय देऊं केलें, तें न कळे ! अस्तु, मारेकरी चार घटका रात्रीस बाहेर लावून दिले, आणि आंत आपले फौजेंत ताकीद करून, सिद्ध होऊन उभे राहिले.

नंतर मारेकरी लष्करांत येऊन पोंहोंचले; तों चार घटका दिवस आला. देवाचे डेऱ्यापुढें स्नानास जयाजी शिंदे गेले. तों नजीक घोड्यांची पागा होती. मारेकरी केवळ कंगाल भिकारी यांचा वेष घेऊन, अंगावर जीर्ण वस्त्र व गुप्त सुऱ्या, असे घोडयापुढें दाणे वेंचीत होते. तों जयाजी शिंदे यांणीं स्नान करून चौरंगावर उभे राहिले. खिसमतगार हांडीबासन सांभाळावयास गुंतले; अबदागिऱ्या मात्र डोईवर छाया धरून उभा होता. जयाजी शिंदे यांस संवय अशी होती कीं, स्नानानंतर मुखावर

घोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत राहावें. तों जसा राजा नळाचे द्वारीं कली वृषभाचें रूप धरून तिष्ठत होता, तसेच मारेकरी जपून होते. इतक्यांत संधि सांपडतांच मारेकरी यांनीं उठोन एकाएकीं दोहींकडून कुशीस सुऱ्यांचा मार केला. काम कारगर होतांच जयाजी शिंदे चौरंगावरून जमिनीवर आले. तेव्हां नजीक अबदागिऱ्या शरीरानें धष्टपुष्ट होता. त्याणें कव घालून एक धरिला. तों डेरियापुढें व पागेंत गडबड जाहाली, इकडे तिकडे 'मारा, मारा ' असें होऊन, ससे होलपट होऊन, एक ठार जाहाला. एक धरिला, तो मारिला. एक अशा अरिष्टांतून प्राण घेऊन नागुरांत पोहोंचला. मागें दत्ताजी यांणीं वर्तमान ऐकून धांवत येऊन जवळ आले. त्यांची अवस्था पाहून त्यांगीं केवळ धाय मोकालिली. घायाळ उचलोन डेऱ्यापुढें आणिला. तों तिकडे मारेकरी गांवांत पोहोंचतांच बिजेसिंग सिद्धच होता. तमाम सरदार यांस बोलावून सांगितलें कीं, " यार हो, आतां गनीम आहेत ते काय ? ' मुरगी मारी, बचेड दाणादाण, ' तैशी गत होईल ! " म्हणून बहुत संतोष मानून फौजेनिशीं युद्धास निघाला. तों आधींच हे गडबडीनें तमाम मोर्चे उठवून गोटांत आणलेच होते. बिजेसिंग याची फौज आलियावर लष्करांत ऐशी गडबड जाहाली कीं, पृथ्वीप्रलयच होतो, तैसा विचार जाहाला. तों जयाजी शिंदे मोठे हिंमतीचे सरदार; डोळे उघडून पाहिलें, तों जवळ बंधु दत्ताजी शिंदे केवळ धाय मोकलून शोक करितां देखिला. गडबड ऐकोन हस्तसंकेतें भावास हिंमत देऊन बोलता जाहाला कीं, " वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस हें क्षत्रधर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं, तुम्ही शत्रुपराभव करावा. "

असें ऐकतांच दत्ताजी शिंदे यांणीं नगारा करून, फौज घेऊन युद्धास गेले दोन्ही सैन्यांच्या गांठी पडल्या. मोठें तुंबळ युद्ध पूर्ववत् प्रमाणें जाहालें. मागती दत्ताजी शिंदे यांणीं शिलेजोरानिशीं मारवाडी मारीत मागें सारोन गांवांत घातले. दोनतीनशें मनुष्यें ठार जाहालीं. तैशींच घोडींही पडलीं. घोडें-मनुष्यें बहुतकरून घायाळ जाहलीं. मोर्च्यांपाशीं येऊन मागती जेथील तेथें मोर्चे कायम करून, शाहाजणें वाजवीत ढालेपाशीं आले, तों मागें जयाजी शिंदे यांचा प्राण निघोन गेला.

—भाऊसाहेबांची बखर.

## २२. ईश्वराचें स्मरण.

अवघा तो शकुन, हृदयीं देवाचे चरण ॥ १ ॥
येथें नसतां वियोग, लाभा उणें काय मग ॥ २ ॥
संग हरीच्या नामाचा, शुचिर्भूत सदा वाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे हरिच्या दासा, शुभ काळ अवघ्या दिशा ॥ ४ ॥

लौकिकांत कोल्ह्याचें दर्शन झालें, म्हणजे तो उत्तम शकुन झाला असें मानितात. एखादी विशेष लाभाची गोष्ट घडून आली असतां, 'आज प्रातःकाळीं कोल्ह्याचें तोंड पाहिलें होतें काय?' असें सहज कोणी तरी विचारतो. परंतु असला शकुन तुकोबाला नको होता.

हृदयाचे ठायीं परमेश्वराचे चरण पाहणें, हाच उत्तम शकुन. एकदां अन्तःकरणाच्या ठायीं परमेश्वराच्या चरणास वियोग नाहीं, असें झालें म्हणजे मग लाभाला कांहीं उणें नाहीं. देवाच्या नामाचा सदा संग, त्यामुळें वाचा सदासर्वकाळ शुचिर्भूत राहणार. अशा प्रकारच्या हरीच्या दासास सर्व दिशा सर्वकाळ शुभ वाटतात. तेव्हां हा असा शकुन आम्हांला झाला पाहिजे.

आपण नेहमीं व्यवहारांत पाहतों कीं, अहंकार काम क्रोध मद मोहादि जे रिपु आपल्या ठिकाणीं आहेत, त्यांच्याविषयीं कांहीं विचारच न करितां, मनुष्य व्यवहार करूं लागला, तर केव्हांच हे रिपु जोर करितात. व्यवहारांत आपल्या मनासारखें कांहीं झालें नाहीं, किंवा आपण जें योजिलें होतें त्याच्याविरुद्धच सर्व कांहीं झालें, तर अन्तःकरण क्षुब्ध होतें व खिन्नता प्राप्त होते. हा संभावितांतला प्रकार; परंतु अविचारी आणि खालच्या वर्गाचे जे लोक आहेत, त्यांच्यांत असे कांहीं प्रसंग आले म्हणजे परस्परांत निकरावर गोष्टी जाऊन, कारागृहवास किंवा त्याच्याहि पलीकडे प्राणहानीपर्यंत मजल जाऊन पोंचते. तेव्हां जे तुमच्या आमच्यासारखे संभावित म्हणविणारे त्यांच्या कामनेची सिद्धता झाली नाहीं कीं, मनाची खिन्नता, अप्रसन्नता, तामसी आचरण, क्षुब्धता इत्यादि परिणाम होतात, आणि इतर लोकांचे ते तसे वर सांगितल्याप्रमाणें परिणाम होतात. त्यामुळें मनाला समाधान नाहीं, आणि सर्व संसार दुःखमय, अशी नेहमीं कुरकुर; आणि हें सर्व व्हाव-

यास कारण त्या रिपूंविषयीं जागृति न ठेवतां व्यवहारांत वागणें हें होय. प्रपंचामध्यें आपण कांहीं प्रसंग आपण होऊन आपल्यावर आणतों, आणि कांहीं अवचित येत असतात. रस्त्यानें जात असतांना एकाएकीं पाय मुरगळणें अगर मोडणें, रोगबीजांचें वर्धन हल्लींच्या दिवसांत जसें होतें तसें होणें, इत्यादि; आणखी त्यांत इतर शोकाचे, लोभाचे, मोहाचे प्रसंग; अशा प्रकारच्या स्थितीचा अनुभव आज सर्वत्र येत आहे.

परंतु हरीचे चरण अन्तःकरणांत ठेवून जेव्हां मनुष्य व्यवहार करितो; सदासर्वदा लोकांत भाषण करितांना, रस्त्यांतून जातांना, घरीं येतांना, अनेक प्रकारचे व्यासंग करीत असतां, ज्यास परमेश्वराचा विसर पडत नाहीं, त्यास हा शुभ शकुनच होतो; आणि त्या शकुनाचें फळ शांति, समाधान, आनंद ह्या रूपानें त्यास मिळतें. अन्तःकरणांत कांहीं शल्य नसल्यामुळें त्याला सुखाची निद्रा लागते. हें असें कां होतें ? तर त्यानें आपल्या अंतःकरणांत हरीला वागविलें, हृदयीं देवाचे चरण ठेविले म्हणून.

आतां हें मात्र लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, हृदयीं देवाचे चरण ठेवणें हें नेहमीं 'हरि,हरि' या नामाचा उच्चार करण्याइतकें सुलभ नाहीं; तें अत्यंत कठीण आहे. म्हणूनच तुकोबांनीं म्हटलें आहेः—

सांठविला हरी, जिहीं हृदयमंदिरीं ॥ १ ॥
त्यांची सरली येरझार, झाला सफळ व्यापार ॥ २ ॥
हरि आला हाता, मग कैंची भयचिन्ता ॥ ३ ॥
तुका म्हणे हरी, कांहीं उरों नेदी उरी ॥ ४ ॥

परमेश्वर अनन्त आहे; त्याचें सामर्थ्य, त्याचें वैभव अपार, अतुल आहे. त्याचे सर्व व्यापार आपणांस अद्भुत व अगम्य अशा रीतीनें चालू आहेत. हें भव्य, अनेक तारागणांनीं मंडित असें आकाशमंडळ, चंद्रसूर्य ज्याच्यापुढें कांहींच नाहींत असे असंख्य चंद्रसूर्य ज्यानें निर्माण केले आहेत; ज्याचें सामर्थ्य अप्रतिहत असें आहे; पर्वताच्या भव्य स्वरूपाच्या योगें ज्याच्या भव्यपणाची कल्पनाही होणें नाहीं; सागराची गंभीर शांतता ज्याची शांति अस्पष्टपणें वर्णीत आहे; असा जो परम सामर्थ्यवान्, परम मंगल, परम श्रेष्ठ, परम कृपाळू, परम थोर, परमेश्वर विश्वाचा शास्ता,

नियामक, तो सर्वत्र नांदत आहे. त्याची सत्ता, त्याचें ऐश्वर्य, सर्वत्र गोचर होत आहे. तोच सात्त्विक भाव अन्तःकरणांत उत्पन्न करितो.

आपली स्थिति अत्यंत परावलंबी आहे. आपण सर्वपरी परमेश्वरावर अवलंबून आहों. आपल्या ठिकाणीं सामर्थ्य आहे, बल आहे, परंतु परमेश्वराचें सामर्थ्य व बल ह्यांची साक्ष अंतःकरणांस पटलेली असली, म्हणजे आपलें सामर्थ्य किती क्षुद्र आहे, ह्याची साक्ष पटते. आपली वृत्ति विनम्र होते व आपल्या ठिकाणीं विरक्ति उत्पन्न होते. अशा प्रकारचा विनम्र भाव ज्याचा झाला आहे, अशी विरक्ति ज्याच्या ठिकाणीं उत्पन्न झाली आहे, तो व्यवहारांत गेला असतां, आपली विनम्र वृत्ति ढळूं देणार नाहीं; सदोदित आपल्या हरीचें वैभव, ऐश्वर्य, गांभीर्य, व आपली क्षुद्रता आपल्या दृष्टीपुढें ठेवून व्यवहारांत वागेल व सदोदित जागृत असाच राहील.

परमेश्वर ज्याप्रमाणें अशा महात्म्यानें विशिष्ट आहे,त्याप्रमाणें तो सुंदरस्वरूप, प्रेमस्वरूप, आनंदस्वरूप, सत्य व न्यायस्वरूप असा आहे; याची साक्ष आपल्याला पदोपदीं पटते. कांहीं काळपर्यन्त आपल्याला असत्याचा, अन्यायाचा जय होत आहे, असें वाटून आपल्या मतीला भ्रम होण्याचा संभव आहे. परंतु, ज्या समाजांत, ज्या राष्ट्रांत, असत्याकडे व अन्यायाकडे प्रवृत्ति आहे, त्या समाजाचा व त्या राष्ट्राचा अंतीं ऱ्हासच झालेला आढळेल. परमेश्वराच्या योजनेनें असत्य व अन्याय ह्यांचा अंतीं पराभव होत असतो. अशा प्रकारें जेथें अन्याय व असत्य आहे, तेथें कालेंकरून सत्याचा व न्यायाचा जय न झाल्यास, त्या त्या ठिकाणीं न्यायाचें व सत्याचें अधिष्ठान न झाल्यास अंतीं नाश ठरलेलाच, ही गांठ मनांत बांधून चाललें असतां सत्याकडे प्रवृत्ति होते. आपल्या ठिकाणीं जे जे क्षुद्र भाव अहेत ते लयास जातात. परमेश्वराचें जें प्रेम, आनंद व सुंदर स्वरूप तें अन्तःकरणांत बिंबलें असतां आपणही अंशतः प्रेमरूप व आनंदरूप होऊन आपले व्यवहार त्या त्या वृत्तीस अनुसरून होऊं लागतात. ज्यानें केवळ अज्ञानानें आपला छळ केला, त्याजविषयीं अप्रेमाचा भाव न राहतां उलट त्याची दयाच येते. सारांश, अशा प्रकारें परमेश्वरास आपल्या अन्तःकरणाच्या ठायीं सांठवून आपण व्यवहारत गेलों

असतां, आपली खिन्नता नष्ट होऊन उत्तरोत्तर शुभाकडे आपली प्रवृत्ति होत असते.

परंतु ही स्थिति अगदीं सहज प्राप्त होण्यासारखी आहे, असें मात्र कोणीं समजूं नये. तुकोबासारख्यांनीं म्हटलें आहे कीं,

काम क्रोध आड पडले पर्वत, राहिला अनंत पलीकडे ॥ १ ॥

नुलंघवे मज, न सांपडे वाट, दुस्तर हा घाट वैरियांचा ॥२॥

म्हणून संसारांत असतांना आपण नेहमीं वैराग्यशील असलें पाहिजे. विषयांविषयीं अनासक्ति असली पाहिजे; आणि हें वैराग्य तरी दोन प्रकारचें आहे. एक ज्ञानगर्भ वैराग्य आणि दुसरें निर्वेद वैराग्य. परमेश्वराविषयीं जें सत्यज्ञान तें प्राप्त होऊन त्या योगें अन्तःकरण उन्नत झालें असतां विषयांविषयीं वैराग्य उत्पन्न होणें तें ज्ञानगर्भ वैराग्य. आपणावर अनेक आघात होऊन सर्वत्र दुःखच आहे, असें वाटून होणारें जें वैराग्य ते निर्वेद वैराग्य. सर्व स्वतः अनुभवून विवेकाच्या द्वारें जें वैराग्य झालें नाहीं, तें तें. म्हणून ज्ञानगर्भ वैराग्य श्रेष्ठ होय. तें आपल्याला झालें पाहिजे.

सारांश असा कीं, आतांपर्यंत परमेश्वराच्या ज्या स्वरूपाचें वर्णन झालें, तें अन्तःकरणांत जणूं उमटलें पाहिजे, आणि आपला अन्तरात्मा त्यास समर्पण करण्याची बुद्धि होऊन, तो आपण त्यास समर्पण केलाही पाहिजे. देवा, तूं तारणारा किंवा मारणारा, मी सर्वस्वीं तुझ्या हातीं असें म्हणून त्यास शरण जावयास पाहिजे. ही अवस्था कठीण तर खरीच; परंतु ती अत्यंत सुखाची, अत्यंत शांतीची होय.

**धर्मपर व्याख्यानें—डॉक्टर सर रा. गो. भांडारकर.**

---

## २३. माझ्या सासरची वडील मंडळी.

माझ्या मामेसासऱ्यांचें कुटुंब पुष्कळच मोठें होतें आणि त्याप्रमाणें एकंदरींत थाटानें चाललेंहीं होतें. माझे मामेसासरे दोघे; दोघांसही चांगल्या नोकऱ्या होत्या. धाकट्या सासऱ्यास दीडशें रुपये पगार होता, आणि वडिलास साठ कीं पाऊणशें होता. आजे मामंजी वारून बरेच

दिवस झाले होते, तेव्हां आण–ने करणें, इतर व्यवस्था ठेवणें हें सर्व प्रकारांनीं काकांकडे असे; हे आमचे चुलत आजेसासरे.

यांचा स्वभाव असा कांहीं तरफडया आणि त्रासिक असे कीं, कांहीं पुसूं नये. म्हातारा जेवायला बसला म्हणजे कधीं संतापल्याखेरीज रहायचा नाहीं. जो काय राग, जो काय संताप तो त्या वेळीं यायचा; आणि जेवण्याविषयीं भारी कुरकूर. ती आज अमुक चटणीच वाटली नाहीं, अमक्या भाजीला पीठच भारी लावलें, तमकी भाजी इतकी पातळ करायची नव्हती, अशी त्यांची एकसारखी कटकट ! मला असा एक दिवस खरें पुसाल, तर आठवत नाहीं कीं, आज म्हणजे साऱ्या दिवसांत मामंजी अगदीं कांहीं बोलले नाहींत. कशा ना कशाबद्दल तरी त्यांची कुरकूर असायचीच.

त्यांच्या अगदीं उलट स्वभाव होता त्यांच्या भावजयीचा म्हणजे माझ्या सख्या आजेसासूचा. त्या त्रास म्हणून कधीं कोणाला द्यावयाच्या नाहींत. पण अमुक एक गोष्ट करायची असें म्हटलें म्हणजे मग आपला हेका कधीं सोडायच्या नाहींत. जें आपण म्हणतील, तें स्थापन करतील. एकदां कोणाचें नांव घ्यायचें नाहीं असें म्हणाल्या कीं, मग तें वज्रलेप झालेंच असें समजावें. त्याशिवाय आणखी एक चमत्कारिक खोड त्यांना असे, ती ही कीं, लहान पोर असो, थोर असो, कोणी कुठें काय जें करीत, बोलत असेल तें आडून ऐकायचें आणि पहायचें, आणखी मग तें ध्यानीं धरून केव्हां ना केव्हां असा त्या माणसाला टोला द्यायचा कीं, कांहीं पुसूं नये; त्यानें अगदीं जीवच द्यावा जाऊन ! या त्यांच्या कुचकें बोलून माणसाला दुखवण्याच्या गुणामुळें जितका माणसांना त्रास होत असे, तितका आजेमामंजीच्या कुरकुरीनें आणखी कटकटीनें होत नसे म्हटल्यास चालेल. परंतु या अवगुणाखेरीज दुसरा कोणताही अवगुण त्यांचे अंगीं नसे. त्यांचें अन्तःकरण अतिशय मायाळू. माणूस एखाद्या दुखण्याबिखण्यानें पडलें तर त्यांच्या जीवाचा अगदीं थरकांप होऊन, त्या अगदीं प्राण टाकावयाच्या. कोणाला अधिक, कोणाला उणें, हें त्यांच्याजवळ कधीं नसायचें.

आमचे थोरले मामेसासरे, ज्यांना पगार थोडा होता ते, कोणत्या

तऱ्हेचे माणूस होते, हें मला अजून कांहीं कळलें नाहीं. त्यांच्या इतका खोल, कुरठा, कुचका, लहरी असा मनुष्य यावज्जन्मांत मीं कधीं पाहिला नाहीं. याचप्रमाणें आपमतलब म्हणजे त्यांच्या ठिकाणीं नंबर एकचा ! त्यांचें गूढ काय आणि नाहीं काय, हें कळणें मोठें दूरापास्त ! ते इतके लहरी होते कीं, आतां जें त्यांच्या मनांत येईल तें घटकेनें मुळींच नाहीं; त्यावेळीं दुसरेंच ! आणि बोलण्यांत बोल इतका नाहीं कीं, कांहीं पुसूं नये. आतां जें बोलतील त्याच्याशीं पुढच्या बोलण्याचा मेळ कधींच बसावयाचा नाहीं. द्रव्यलोभ आणि चिक्कूपणा तर इतका कीं, त्याला पारावार नाहीं. आपला पगार येईल तो आणि सरसकट प्राप्ति होईल ती-ही असली प्राप्ति त्यांना फार असे-सारी झाडून व्यांकेंत टाकलेली, नाहींतर व्याजीं लावलेली; घरांत खर्चण्याला कधीं कवडी देतील तर शपथ ! आपलें, आपल्या बायकोचें जितकें म्हणून निघेल तितकें घरांतून काढावयाचें. बायकोचे दागिने, पोराचे दागिने, सगळे आपल्या निजायच्या खोलींत पेटींत घालून ठेवायचे; दुसऱ्या कोणावर यत्किंचित् विश्वास असेल तर शपथ ! तीच त्यांची बायको म्हणजे अगदीं त्यांच्या उलट ! त्या गृहस्थाच्या अंगांत जितके अवगुण, तितके सारे तिच्यांत गुण. तिच्याइतकी गरीब व सालस बायको दुसऱ्या कोठेंही असेल असें मला तर कांहीं वाटत नाहीं. आतां माणूस आहे, कधीं एखाद वेळ राग येत नसेल का ? पण तो गिळून जाऊन मूग खाण्याची तिची हातोटी जबर ! एक दिवस देखील मीं तिला कधीं कोणावर तोंड टाकतांना पाहिलें नाहीं. घरांत साऱ्याजणी, आमच्या सासूबाईसुद्धां म्हणत कीं, ती फार कुरठी व खोल मनाची आहे. पण मला तसें वाटलें नाहीं, इतकेंच नव्हे तर तशी ती नाहीं, अशाबद्दल माझ्या मनाची पक्की खात्री आहे. पण तिच्या गरीब स्वभावामुळेंच, आणि ती थोडी कुरूप होती यामुळें तिला जे हाल सोसावे लागले, ते कांहीं अनन्वित होते. असो.

धाकटे मामेसासरे, ज्यांना पुष्कळ पगार होता, ते आमच्या थोरल्या मामेसासूबाईंची हुबेहूब प्रतिमा. बिचारीं बहीणभावंडें असतीं तर अगदीं शोभतीं. दोघांचा स्वभाव अगदीं एक. बिचाऱ्याला इतका पगार होता, परंतु अमुक हें असें कां केलें, आणखी अमुक कां केलें नाहीं,

असा चकार शब्द कांहीं तोंडांतून निघाला नाहीं. तुम्ही घरांत कांहीं करा, नका करूं, महिन्याच्या महिन्याला चुलत्याच्या जवळ शंभर रुपये आणून द्यायचे, आणखी पांच रुपये आईला देवधर्माला, कुणाला वाटेल त्याला, द्यायचे. बाकी रुपये कांहीं कांहीं कारणांना त्यांना लागत, ते ते आपल्याजवळ सांगून संवरून ठेवीत. त्यांची त्यांच्या भावजयीवर, आणखी बहिणीवर, म्हणजे माझ्या सासूवर, फार भक्ति असे. त्या दोघींनाही ते दोन दोन रुपये दरमहा देत. थोड्या थोडक्यांत जें आपल्या हातून होईल, तें करून सगळ्यांना संतोष द्यावा, आणि साऱ्यांनीं आनंदानें रहावें, हा त्यांचा मोठा हेतु ! आणि हा हेतु साधण्यासाठीं ते सर्व प्रकारांनीं झटत. आई बोलूं लागली आईला, बायको बोलूं लागली बायकोला, वडील भाऊ बोलूं लागला त्याला,—जो कोणी भांडण उपस्थित करूं लागेल त्याला, स्थिरस्थावर करून, ते सुखानें दिवस जावे म्हणून खटपट करीत. परंतु घरांतली स्थिति अशी होती कीं, त्यांना कांहीं कधीं खरें सुख झालें नाहीं. तथापि तो गृहस्थ कधीं दुर्मुखलेला नसे; पण त्यांची बायको—माझी धाकटी मामसासू—अग बाईग ! तिच्यासारखी आक्रसताळी बायको जगांत कोठें सांपडेल कीं नाहीं, कोणास कळे ! नवऱ्याला मोठा पगार, याबद्दल तिला असा डौल होता, कीं सुमार नाहीं. श्रीमंतीचा ताठा ताठा म्हणून जो म्हणतात, तो मूर्तिमंत तिच्या अंगीं झुलत होता ! त्या नटायच्या काय ! मुरडायच्या काय ! माणसाला टाकून किती बोलायच्या ! नवऱ्यांबद्दल काय वेडें वेडें बोलायच्या ! कधीं कधीं तर त्यांच्या तोंडावर, ' तुम्हाला कांहीं समजत नाहीं, ' असें त्यांनीं म्हणावें ! नवऱ्याच्या पगारामुळें तिला अगदीं अस्मान ठेंगणें झालें होतें. ती हवे त्याला हवें तसें टाकून बोले. केव्हां केव्हां सासूला सुद्धां. थोरल्या दिराबद्दल तर काय बोले आणि काय नाहीं, याचा नेमच नाहीं. तिचा स्वभाव इतका विलक्षण असे, तरी पण मामंजींचा स्वभाव असा होता कीं, ते आपलें सारें हंसण्यावरी घालवीत. कधीं तिला बोलत नसत. माझें लग्न होण्यापूर्वीं वेगळें निघण्यासाठीं तिनें नाना तऱ्हेच्या खटपटी केल्या, परंतु तिची डाळ कांहीं त्यांनीं शिजूं दिली नाहीं. आमच्या सासूबाईंना त्यांनीं नानातऱ्हेनें

बोलावें, त्यांचा हवा तसा पाणउतारा करावा, परंतु मामंजींनीं येऊन त्यांचें समाधान करावें, व तुला मीं आणलं, तूं आपली माझ्याकडे पाहून दिवस काढ; दुसऱ्या कोणीं कांहीं जरी म्हटलें, तरी यत्किंचित् देखील मनावर घेऊ नकोस, असें सांगावें.

परमेश्वराचा नेमानेम तरी कसा असतो तो पहा! गोपाळ मामंजी (धाकटे मामंजी) स्वभावानें अतिशय चांगले, तर त्यांच्या गळ्यांत राधा-सासूबाईसारखी आकस्ताळी बायको पडली; आणि शंकरमामंजी तसल्या वाईट स्वभावाचे, तर त्यांच्या नशिबीं आमच्या उमासासूबाई-सारखी सत्त्वशील बायको होती. देव कधीं योग्य जोडे जमवीत नाहीं म्हणतात, तें अगदीं अक्षरशः खरें आहे. आम्ही नेहमीं म्हणत असू कीं, गोपाळमामंजींना उमासासूबाई, आणखी शंकरमामंजींना राधासासूबाई पाहिजे होत्या. पण तसें कसें व्हावें! असें झालें असतां, सर्व गोष्टी ठीक झाल्या असत्या आणि तशा तर जगांत व्हायला नको आहेत.

आतां आमच्या खुद्द सासूबाईंच्या स्वभावाचें वर्णन करावयाचें आहे. त्यांचा स्वभाव इतका साळाभोळा होता कीं, कांहीं पुसूं नये. सगळ्या घरांत जें काय काम पडेल, तें यांनीं आणि यांच्या उमावहिनींनीं सारून टाकण्याचा विडाच उचलला होता. करूं का नको; हें मुळीं नाहींच. बरें, हा श्रीमंत याचें काम आधीं व काळजीपूर्वक करावें; तो गरीब त्याचें करूं नये; हा प्रकार कांहीं नाहीं. इथून तिथून एक मार्ग! कोणी कांहीं म्हणो, बोलो; आली वेळ पार पाडून न्यायची. पहाटे चार वाजल्यापासून उठून ज्या त्या कामाला लागत त्या संध्याकाळीं आठ वाजतां पाठ टेकीत आणि यांस मदत त्यांच्या उमावहिनींची. त्या दोघींची मोठी गट्टी असे. त्यांना आंत एक आणि बाहेर एक असा प्रकारच नव्हता. कोणाचें कांहीं वावगें दिसलें कीं, त्या त्याला स्पष्ट बोलल्याच म्हणून समजावें. मग तो कोण काय याचा मुळींच विचार नाहीं. याच त्यांच्या स्वभावामुळें त्यांस पुष्कळदां त्रास होत असे.

इतकी एकंदरींत वडील मंडळी झाली.

**पण लक्ष्यांत कोण घेतो?—ह.ना. आपटे.**

## २४. सत्संगति.

पारमार्थिक मार्गाचीं अनुभवी पुरुषांनीं जीं साधनें सांगितलीं आहेत, त्यांमध्यें सत्संगति हें मुख्य साधन होय. कारण भक्ति, ज्ञान, वैराग्य, शम, दम, तितिक्षा, मुमुक्षुत्व इत्यादि साधनें जरी मोठया महत्त्वाची आहेत, तरी त्या सर्वांची सिद्धि पुष्कळ अंशीं सत्संगतीवर अवलंबून आहे. समर्थ रामदास स्वामींनीं श्लोकरूपानें मनास जो बोध केला आहे, त्यांत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे--

"सदा सर्वदा सज्जनाचे नि योगें ।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे."

म्हणजे जर सतत सत्पुरुषांचा समागम असला, तर आपल्या हृदयांत भाव ठसतो, ईश्वराचे ठायीं भक्ति दृढ होते, आणि दया, क्षमा, शांति, इत्यादि गुणानुरूप आपलेकडून क्रिया घडून येते. नुसतें पारमार्थिक गोष्टींचें शाब्दिक ज्ञान आपल्यास झालें, किंवा क्वचित् सद्वृत्तीही अन्तः-करणांत उदित होऊं लागल्या, तरी त्यांपासून परमार्थाचा लाभ तादृश होतो, असें नाहीं. जें ज्ञान झालें, तें अनुभवास आलें पाहिजे; आणि तदनुरूप आपल्या कायिक, वाचिक व मानसिक सर्व क्रिया सदैव घडूं लागल्या पाहिजेत; तेव्हांच परमार्थिक साधनांची सिद्धि झाली, असें म्हणतां येईल व पारमार्थिक मार्गाचें अवलंबन केल्यानें आत्म्याची जशी सात्त्विक प्रेमळ व शांत स्थिति व्हावी तशी होईल. पण हा क्रियेचा पालट ज्यांच्या ठायीं साक्षात् घडून आलेला आहे अशांचा समागम केल्या-शिवाय कसा होणार आहे ? ब्रह्मनिष्ठाचें परमश्रेष्ठ लक्षण असें सांगितलें आहे--

'आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान् एष ब्रह्मविदां वरिष्ठः,' म्हणजे ज्याचें चित्त परमात्मचिंतनांत व परमात्मभक्तींत रममाण असतें व ज्याच्या सर्व क्रिया सद्भावास अनुसरून असतात तोच खरा ब्रह्मवेत्ता म्हणजे ईश्वरनिष्ठ पुरुष होय. सारांश, अन्तरीं सद्वृत्ति व व्यवहारांत तास अनुसरून आच-रण हीं परमार्थपरतेचीं मुख्य लक्षणें होत. परंतु हीं सत्पुरुषांच्या समागमा-वांचून कशीं प्राप्त होतील ? ग्रंथावलोकनानें यथार्थ ज्ञान होऊं शकेल, परंतु वृत्तीचा व क्रियेचा पालट सत्संगतीवांचून घडणे कठीण. म्हणून

साधेल तितकी परमार्थसाधकांनीं सत्संगति अवश्य केली पाहिजे. परंतु ती घडते कशी ? प्रस्तुत काळीं प्रल्हादनारदासारखे किंवा अंबरीशशुकासारखे किंवा ज्ञानेश्वरतुकारामासारखे भगवद्भक्त व सत्पुरुष कोठें आहेत, कीं ज्यांची आपण साधकांनीं संगति करावी ? होय ते किंवा तसे पुरुष हल्लीं नाहींत हें खरें; तरी ज्या वेळेस ते होते, त्या वेळेस तरी लोकांनीं त्यांचा कोठवर व कोणत्या रीतानें उपयोग करून घेतला बरें ? सर्वांस त्यांचा समागम इष्ट वाटत होता काय ? सर्वांस त्यांचा बोध रुचत होता काय ? नाहीं. म्हणून ज्यांस त्यांच्या समागमाची आवड लागून तो घडला असे पुरुष फारच विरळा. पण ज्यांस तशा प्रकारचा समागम घडला त्यांस तरी विशेष लाभ त्यांच्या प्रेमळ, सात्त्विक व आदरयुक्त बोधानेंच घडला यांत संशय नाहीं. तशाच प्रकारचा बोध त्या परोपकारी व कृपाळू सत्पुरुषांनीं आपल्या शुद्ध व प्रेमळ वचनांच्या रूपानें आपल्यामागें ठेविला आहे. जरा श्रद्धापूर्वक आपण त्या बोधवचनांचें वारंवार परिशीलन केलें तर भाग्यवशात् आपल्याही चित्तांत तो बोध कां ठसणार नाहीं ? अवश्य ठसेल. प्रस्तुत काळीं जरी पूर्वोक्त भक्तांच्या बरोबरीचे सत्पुरुष आपल्यास आढळले नाहींत, तरी कांहीं अंशीं तरी त्यांचे गुण कित्येक व्यक्तींमध्यें आपल्यास अवश्य आढळतील. कोणाचे ठायीं आपल्यापेक्षां भाविकपणा विशेष आढळेल. कोणामध्यें विनय जास्ती आहे असें दृष्टीस पडेल. कोठें भजनाची आवड, नामस्मरणाचा छंद, कोठें वैराग्य कोठें शांति, कोठें क्षमा व कोठें दया विशेष आहे असें शोधाअन्तीं आपल्यास कळून येईल. परंतु सात्त्विक बुद्धीनें या गोष्टीचा शोध केला पाहिजे. जर कुत्सित बुद्धीनें आपण पाहूं लागलों तर दुर्योधनाप्रमाणें आपली स्थिति होईल. आपल्यास चांगला मनुष्य मुळींच आढळणार नाहीं. परंतु जर भाविकपणानें पाहूं लागलों तर धर्माप्रमाणें आपल्यास प्रायः मनुष्यमात्रामध्यें कांहीं तरी चांगुलपण आहे असें प्रत्ययास येईल. मग सर्व पारमार्थिक गुण एकच मनुष्यामध्यें जरी सांपडले नाहींत, तरी जो जो सद्भाव ज्या ज्या पुरुषामध्यें विशेष आढळून येईल, तो तो त्या त्या पुरुषाशीं समागम करून आपण संपादूं म्हटलें तर कां होणार नाहीं ? अवश्य होईल. परंतु आपल्या भाग्यहीनतेमुळें आपण जर केवळ दोषैकदृष्टि झालों, तर साक्षात् नारदा-

दिकांचा समागम जरी आपल्यास झाला तरी त्यापासून काय फळ होणार आहे ? यास्तव भाविकपणानें पूर्वोक्त प्रकारांनीं सत्समागम संपादून हळूहळू परमार्थमार्गाचें क्रमण आपण करीत असावें.—

**वामन आबाजी मोडक.**

---

## २५. ज्ञानयोग व कर्मयोग.

परमेश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान करून घेऊन तें स्वरूप अंतःकरणापुढें ठेवणें व त्याचें सतत ध्यान करणें आणि तदर्थ कर्मांचा त्याग करणें, हा एक उन्नतीचा मार्ग भगवद्गीतेंत सांगितला आहे. ह्याला ज्ञानयोग असें म्हणतात. परमेश्वर अनादि आहे, अत्यंत मोठा आहे, सर्व प्राण्यांमध्यें विज्ञान म्हणून जें आहे तें त्याचा अंश आहे. हें विज्ञान म्हणजे खरेंखोटें, बरें वाईट, योग्य अयोग्य, उदार-अनुदार, उन्नत-अनुन्नत जाणण्याचें सामर्थ्य मनुष्याच्या हृदयामध्यें वास करितें; आणि ह्या रूपानें परमेश्वरच त्या ठिकाणीं वास करितो हें समजावयाचें. तो परमेश्वर सर्वांचा वशी म्हणजे सर्वांस आपल्या हस्तगत करणारा असा आहे, तो सर्वांचा राजा आहे; सर्वांचा प्रभु आहे. अमुक योग्य असें कर्म केलें म्हणजे तो पूर्वीपेक्षां बरा होतो, अमुक अयोग्य कर्म केलें असतां वाईट होतो, अशा प्रकारचा तो नाहीं. तो सदासर्वकाळ पूर्णपणें शुद्ध व पवित्र आहे. तो सर्वांचा ईश्वर आहे. तो सर्व भूतांचा चालक आहे. असंख्य पदार्थ जे आहेत त्यांच्या धर्मांचें सांकर्य होऊं नये म्हणून प्रत्येकामध्यें नियत धर्म ठेवून सर्वत्र व्यवस्था ठेवणारा आनंदमय, रम्यस्वरूप तो परमात्मा आहे ह्या प्रकारच्या स्वरूपाचें सतत ध्यान केलें असतां मनुष्याची वृत्ति उन्नत होते, शांत होते आणि समाहित होते.

ह्याच्या उलट दुसरा जो मार्ग आहे, त्याला कर्मयोग असें म्हणतात. म्हणजे प्रपंचांत राहून स्वस्थ न बसतां कर्म करीत जाणें. गीतेंत म्हटलें आहे कीं, ह्या दोन्ही मार्गांपासून अंतीं कल्याण होतें, म्हणजे मोक्ष प्राप्त होतो; परंतु कर्मांचा त्याग करून संन्यास घेऊन ध्यान करीत बसणें याच्यापेक्षां कर्म करीत जाणें हा मार्ग पहिल्यापेक्षां अधिक सुलभ आहे. मात्र कर्म करीत असतांना त्यापासून होणाऱ्या फलाकडे दृष्टि नसावी. तें

कर्म आपणांस कर्तव्य आहे याच बुद्धीनें करावें, किंवा परमेश्वराकडेस दृष्टि लावून त्याला तीं कर्मे प्रिय आहेत म्हणून करावीं. अशा बुद्धीनें कर्मयोग करीत गेलें म्हणजे त्या कर्मांचें बंधन आपणास लागत नाहीं. त्याच्यायोगें दुस्संस्कार मनावर उत्पन्न होत नाहींत. काम, लोभ, मत्सर यांस मनुष्य वश होत नाहीं. दृष्टि एक कर्तव्याकडे,सत्याकडे, न्यायाकडे, परमेश्वराकडे असें होऊन साधकाची वृत्ति उन्नत होते. ह्याप्रमाणें कर्मयोगाचा अभ्यास केला नाहीं आणि कांहीं तरी फलेच्छा मनांत धरून मनुष्य कर्म करूं लागला म्हणजे काम किंवा क्रोध किंवा लोभ किंवा मत्सर अशांसारख्या ज्या अंतर्वृत्तींनीं ती फलेच्छा उत्पन्न होते त्या वृत्तीच अंतःकरणांत वळावतात आणि मनुष्य पापें करावयास लागतो आणि धर्ममार्गापासून भ्रष्ट होतो; परंतु हें कर्म करणें योग्य आहे, ईश्वरास तें प्रिय आहे, याच बुद्धीनें जो तें कर्म करितो त्याचें अंतःकरण अशा प्रकारच्या सतत अभ्यासाच्या योगें कामक्रोधादि विकारवशतेपासून विमुक्त होतें आणि तो ब्रह्मनिष्ठ होतो.

परंतु ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, कर्माचें साक्षात् जें फळ त्याची उपेक्षा असणें एवढ्यानेंच सिद्धि होत नाहीं. कर्मापासून लोकांमध्यें आपली मानप्रतिष्ठा वाढते, लोक आपली स्तुति करितात, अशा प्रकारचें जें फल त्याचीही उपेक्षा केली पाहिजे आणि ह्याविषयीं तर विशेषेंकरून मनुष्यानें सावध असलें पाहिजे; कारण बडेजाव, मानमरातब याविषयींची इच्छा मनुष्यांच्या अंतःकरणांत अत्यंत प्रबळ असते. कबीरजी म्हणतात, " माया त्यजा तो क्या भया ? मान त्यजा नहीं जाय, जहि मानें मुनिवर ठगे मान सबको खाय! " खरोखर मानाची इच्छा सर्वांस खाऊन टाकते; मनुष्यानें केलेल्या सत्कृत्यांमधील गुण जो आहे तो नाहींसा करिते; त्या कृत्याचें श्रेय त्याजला प्राप्त होत नाहीं आणि अशा प्रकारें विचार न करितां दंभासाठीं सतत जो क्रिया करीत जातो त्याचा आध्यात्मिक नाश होतो. " दंभमान माझा करूं पाहे घात" असें तुकोबा म्हणतात आणि हें मोठें सत्कृत्य मीं केलें अशी मनामध्यें बुद्धि उदित होऊन जो गर्व उत्पन्न होतो त्याजविषयीं तुकारामबोवा नेहमीं फार भीति बाळगीत असत. "अंगीं वसूं पाहे गर्व । माझें हरावया

सर्व ।" अशी एक त्यांची उक्तिही आहे. आणि मानप्रतिष्ठेची इच्छा मनांत राहूं दिली तरी आपली अंतर्वृत्ति क्षुब्धच राहावयाची. कारण, आपल्या मतें आपण सत्कृत्य केलें आणि दुसऱ्यानें नाक मुरडलें म्हणजे त्याच्याविषयीं आपल्या मनांत किती क्रोध उत्पन्न होतो ! आणि मग आम्ही त्याचा द्वेष करावयास लागतों. ही वृत्ति आपणास कधीं तरी सुखकर होईल काय ? शांतीचीच वृत्ति सुखकर आणि ती जर उत्पन्न झाली पाहिजे, तर मानप्रतिष्ठारूप जें कर्मफल त्याचाही त्याग केला पाहिजे. 'त्यागात् शान्तिरनन्तरम्' असें गीतेचें वाक्य आहे. सर्व प्रकारच्या फलेच्छा सोडून कर्तव्यतेकडे आणि परमेश्वराकडे ज्यांचें धोरण असतें ते उत्तरोत्तर अधिकाधिक सत्यनिष्ठ होतात आणि परमात्म्याचे निष्ठावंत भक्त होतात. जन प्रमाण नाहीं, मान प्रमाण नाहीं, केवळ सत्य आणि परमेश्वर हींच प्रमाण आहेत, अशा वृत्तीनें साधनक्रम निष्ठेनें चालत गेला म्हणजे मनुष्याची परमात्म्याविषयीं आवड वाढते; तो परमात्म्याचा भक्त होतो; जिकडे तिकडे देवच त्याला दिसतो, आणि "अवघाचि भूतीं नारायण" असें त्याजला झालें म्हणजे दुःख नाहींसें होतें, शांति आनंद त्याच्या हृदयांत वास करितात आणि भक्तीनें देवाशीं एकरस होऊन प्रेमरूप जो बोध त्यांतच मनुष्य बुडून जातो. असें झालें म्हणजे ज्ञानयोगाचें जें आरंभीं सांगितलें तेंच फळ प्राप्त होतें. कर्मयोगाच्या योगें ज्ञानयोगाचाच लाभ होतो.

ज्ञानयोगाचा स्वीकार जर केला तर त्याच्या योगानें साध्यसिद्धि होणें कठीण. कारण अनेक वासना व कामना यांचा जाड लेप ज्या अंतःकरणावर बसला आहे त्याला ईश्वराच्या स्वरूपाचें ध्यान साध्य कसें होईल ? देवाकडेस मन लावण्याचा यत्न जों करितो तों पूर्वीं उत्पन्न झालेली इच्छा ही त्या मनास कोठच्या कोठेंच नेऊन टाकिते ! कदाचित् परमेश्वराच्या सुंदर आनंदमय अशा स्वरूपाच्या विश्वाचें अवलोकन करून साक्षात्कार झाला म्हणजे त्या वासना आणि कामना क्षणभर विगलित होतात खऱ्या; परंतु जावत् आत्मा शरीराशीं बद्ध झाला आहे तावत् अशा प्रकारचें सतत ध्यान करून परमेश्वराचा साक्षात्कार एकसारखा होणें अशक्य आहे. म्हणून कर्मयोगाच्या प्रकारें

हळूहळू देवास आणि सत्यास प्रमाण धरून वागण्याचा संस्कार दृढ धरून त्या वासना व कामनांचीं मुळें खोदून काढिलीं पाहिजेत, तेव्हां कर्मयोगच अधिक श्रेयस्कर; परंतु एकंदरींत पाहातां जें अनुभवास येतें, तें हें कीं, दोन्ही योग पाहिजेत. कर्मयोग शिथिल पडून परमेश्वर प्रमाण न होतां आपली इच्छाच जेव्हां प्रमाण व्हावयास लागते तेव्हां परमेश्वरास प्रमाण धरून चालण्यासाठीं जें बळ पाहिजे आहे तें परमेश्वराचें स्वरूप अंतःकरणापुढें आणून ठेविल्याच्या योगेंकरून म्हणजे ध्यानाच्या योगेंकरून अर्थात् ज्ञानयोगानें आपणास प्राप्त होतें आणि वर सांगितल्याप्रमाणें ज्ञानयोग शिथिल पडला म्हणजे कर्मयोगाच्याच उपायाची योजना केली पाहिजे.

प्राच्य धर्मामध्यें ज्ञानयोगाकडे विशेष भर आहे आणि पाश्चात्य धर्मामध्यें कर्मयोगाकडे आहे, असें सामान्य लोकांचें म्हणणें आहे; परंतु वर सांगितल्याप्रमाणें एकावरच भार असला तर सिद्धि व्हावयाची नाहीं. कर्मच करीत गेलें तर त्याच्या योगानें उत्पन्न होणारा जो अभिमान किंवा इतर फलाची इच्छा हीं नाहींशीं करावयाचीं जर आहेत, तर देवाचें स्मरण आणि ध्यान हीं पाहिजे आहेत. त्यांच्या योगें देवाचें अत्यंत उन्नत, सुपरिशुद्ध स्वरूप अंतश्चक्षूपुढें उभें राहून अभिमान आणि ज्यापासून फलेच्छा उत्पन्न होते अशा क्षुद्र वासना विगलित होतात आणि निष्काम कर्म करण्याचा क्रम पुढें चालतो; आणि ज्ञानयोगाचें अवलंबन करून ध्यान करीत बसणें याविषयींचीं विघ्नें, जीं वर सांगितलीं आहेत तीं नाहींशीं करण्याकरितां परमेश्वरास प्रमाण धरून निरिच्छतेनें कर्म करण्याचा क्रम पुढें चालविला पाहिजे. त्याच्यायोगें वासनेनें आलेलें जें ज्ञानयोगास विघ्न तें दूर होतें. याप्रमाणें दोन्ही योगांची सांगड लावून साधनक्रम चालविणें श्रेयस्कर आहे.

**डॉ० भांडारकर ह्यांचीं धर्मपर व्याख्यानें.**

---

## २६. चरित्र.

चरित्र हा तरी व्यक्तिविषयक इतिहासच आहे. जसे उत्तम इतिहासग्रंथ निर्माण होणें हें समाजाच्या कल्याणासाठीं अवश्य आहे, तसे उत्तम चरित्रग्रंथहि निर्माण होणें त्याच कारणामुळें अवश्य आहे. कारण चरित्रनायक थोर व अनुकरणीय व्यक्ति असल्यास त्याच्या चरित्राच्या वाचनापासून अनेक जणांच्या मनांत सत्कृत्याविषयीं प्रेरणा उत्पन्न होईल, प्रथमदर्शनीं अशक्य वाटणाऱ्या गोष्टीसुद्धां कर्तृत्ववान् मनुष्य श्रद्धा, दृढनिश्चय, बुद्धिबळ, चातुर्य, उद्योगसातत्य इ० गुणांच्या जोरावर घडवून आणूं शकतो, हें त्याचें चरित्र दाखवील; वाचकांच्या मनांत तें आत्मविश्वास उत्पन्न करील; निराशेला हांकून लावील; उमेदीला ताजीतवानी करील; जगाच्या कल्याणार्थ, मातृभूमीच्या गौरवार्थ, धर्मरक्षणार्थ किंवा स्वाभिमानाच्या रक्षणार्थ सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा करील. चरित्रविषयक व्यक्ति थोर किंवा उच्च कोटींतली नसली, अगदीं सामान्य कोटींतली असली, तरी तिच्याहि चरित्रवाचनापासून वाचकांना फायदा करून घेतां येईल. व्यक्ति लहान असो वा थोर असो; जगांत कोणाचेहि अनुभव वायां जात नाहींत. वाईट माणसाच्या चरित्रापासून सुद्धां बोध घेतां येतो व मनुष्यानें कोणते दोष टाळावे तें त्यापासून कळतें. रामाचें व रावणाचें दोघांचींहि चरित्रें बोधप्रदच आहेत. त्या चरित्राकडे पाहण्याची दृष्टि काय ती निरनिराळी, येवढाच काय तो फरक आहे.

कोणाचेंहि चरित्र लिहावयाचें असो, त्याच्यापासून इष्ट परिणाम घडावा अशी इच्छा असेल तर त्या चरित्रांत त्या व्यक्तीची मूर्ति जितकी हुबेहूब आणि स्पष्टपणें उठवितां येईल तितकी उठविली जाणें अवश्य आहे. उत्तम चरित्र म्हणजे माणसाची कुशल चितान्यानें काढलेली उत्तम तसबीर, किंबहुना सिनेमांतला चित्रपट म्हटला पाहिजे. चित्रविषयक व्यक्तीच्या शरीराचा प्रत्येक बारीक सारीक भाग त्याच्या कपाळावर आठया, गालांवर सुरकुत्या, डोळ्यांत फूल किंवा मानेवर वळ्या असल्या तर त्यासुद्धां-तसबिरींत आल्या पाहिजेत. इतकेंच नाहीं तर त्या माणसाचा स्वभाव, त्याची बुद्धिमत्ता, त्याचें सगळें अन्तरंग त्याच्या तसबिरींत प्रतिबिंबित झालें पाहिजे. तर तो खरा चित्रकार. त्याचप्रमाणें

माणसाची जन्मप्राप्त शरीराची ठेवण, संवयी, मनाची व स्वभावाची रचना, बुद्धि व तिच्यावरील संस्कार, त्याचा वर्तनक्रम, आयुष्यांतल्या घटना, त्या घटनांचें त्याच्या मनावर, विचारांवर व वर्तनावर घडलेले परिणाम, त्याची आप्तमंडळी, इष्टमित्र इत्यादिकांच्या सहवासाचे व सगतीचे परिणाम. माणसाचा खाजगी व त्याचप्रमाणें सार्वजनिक आयुष्यक्रम, त्यांत आलेले नानाविध अनुभव व प्रत्येक वेळची त्याच्या मनाची स्थिति, त्याचीं बरींवाईट कृत्यें, त्या कृत्यांच्या मुळाशीं असलेले त्याचे हेतु व अपेक्षित किंवा अनपेक्षित परिणाम, त्याच्या आवडी निवडी, त्याच्याशीं संसर्ग घडलेल्या इतर माणसांचें त्याच्याविषयीचें मत इ० झाडून साऱ्या गोष्टींची परंपरा योग्य क्रमानें माणसाच्या चरित्रांत स्पष्ट दिसली पाहिजे तर तें त्याचें खरें चरित्र म्हणावयाचें. असें चरित्र लिहिणारा मनुष्य चरित्रनायकाच्या सान्निध्यांत अहर्निश असला पाहिजे व त्यानें प्रत्येक गोष्ट बारकाईनें पाहून तिचें टांचण करून ठेविलें असलें पाहिजे, तरच हें शक्य आहे. अशा रीतीनें लिहिलेलीं कांहीं चरित्रें—उदाहरणार्थ बॉस्वेलनें लिहिलेलें जॉन्सनचें चरित्र किंवा श्रीसमर्थांच्या अत्यंत निकटवर्ती शिष्यांनीं लिहिलेलीं चरित्रें उपलब्ध आहेत. पण त्यांत सत्यतेबरोबर अंधश्रद्धेचें वरेंचसें मिश्रण झालेलें दिसतें. चरित्रकाराला चरित्रनायकाच्या प्रत्यक्ष सान्निध्याचा लाभ घडलेला नसला तर, निदान चरित्रनायकाशीं विश्वस्त रीतीनें बोलण्याचालण्याचे प्रसंग, चरित्रनायकाच्या हातचे कागदपत्र, रोजनिशा, अस्सल पत्रव्यवहार, दस्तऐवज, त्याच्या समवयस्क मित्रमंडळीकडून व कुटुंबीयांकडून मिळालेली विश्वसनीय माहिती इ० साधनांची तरी अनुकूलता पाहिजे. कुशल लेखकाच्या हातीं येवढें साहित्य लागल्यावर तो उत्कृष्ट चरित्रग्रंथ निर्माण करूं शकेल. याचें उत्तम उदाहरण म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे बंधु रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनीं लिहिलेलें चरित्र हें आहे. समकालीन नसलेल्या कुशल लेखकालाहि साहित्याचा चांगला पुरवठा झाल्यास तो आपल्या बुद्धीच्या व विचक्षणशक्तीच्या जोरावर उत्कृष्ट चरित्रग्रंथ कसे लिहूं शकतो याचीं उदाहरणें पाहावयाचीं असल्यास लॉर्ड मोर्ले यांनीं इंग्रजींत लिहिलेलीं बर्क, रूसो वगैरेंचीं चरित्रें पहावीं.

चरित्रनायकाच्या गुणांबरोबर त्याच्या दोषांचेंहि वर्णन करावें कीं नाहीं, असा एक वाद मधून मधून डोकावत असतो. एका पक्षाचें म्हणणें आहे कीं, आपल्या अंगच्या गुणांच्या सामर्थ्यावर ज्यांनीं अनेक समाजोपयोगी कृत्यें करून समाजाला उपकारबद्ध करून ठेविलें आहे अशा व्यक्तीच्या अंगच्या थोड्याशा दोषांकडे दुर्लक्ष करणें चांगलें. कारण, त्या दोषांशीं आपणांस कांहीं कर्तव्य नसतें. गुण अनुकरणीय असतात म्हणून ते तेवढे सांगावे म्हणजे झालें. गुणांबरोबर दोषांचेंहि विवेचन केल्यास त्या गुणांची अंशतः तरी हानि होऊन त्याबरोबर चरित्रलेखनाचा उद्देश निष्फल होण्याचा संभव आहे. चरित्रनायकांच्या लौकिक कर्तबगारीशीं दोषांचा निकट संबंध येत असला आणि ते दोष क्षुद्र नसून दुर्गुण म्हणण्याइतके गंभीर स्वरूपाचे असले व त्यामुळें ते दोष सांगणें अपरिहार्य झालें तर मात्र त्यांचा चरित्रांत निर्देश करणें भाग आहे. हें दोषदर्शन सुद्धां केव्हां करावयाचें व केव्हां नाहीं याचा विचार केला पाहिजे. दोषदर्शन न केल्यास चरित्रग्रंथाला अपूर्णता येत असेल तर तें बेताबातानें करावें. पण छोटक चरित्रलेखांत विशेषतः मुलांसाठीं लिहिलेल्या चरित्राच्या पुस्तकांत किंवा लेखांत तें करूं नये. ठळक दोषार्ह कृत्यांचा नुसता उल्लेख करून सोडून द्यावें.

यावर दुसऱ्या पक्षाचें उत्तर असें आहे, कीं, लहान मुलांसाठीं लिहिलेल्या चरित्रांत दोषार्ह कृत्यांचा नुसता उल्लेख करून सोडून द्यावें या म्हणण्यास कोणाचाहि विरोध असण्याचें कारण नाहीं; पण जाणत्या माणसांसाठीं लिहिलेल्या चरित्रग्रंथांतहि दोषांचा परिस्फोट करूं नये किंवा अपरिहार्य असेल तरच व तोहि बेताबातानें करावा असें म्हणणें म्हणजे चरित्रलेखकानें जाणूनबुजून सत्याचा अपलाप करावा असें म्हणण्यासारखें आहे. कोणत्याहि समतोल बुद्धीच्या व विचारवंत माणसाला असलें एकांगी चरित्रलेखन पसंत पडणार नाहीं. फार काय पण चरित्रनायक खरोखर थोर व्यक्ति असेल तर तो चरित्रनायक सुद्धां अशा तोंडपुज्या चरित्रकाराची तिरस्कारानेंच संभावना करील. ' Paint me as I am. " म्हणजे मी आहें तसें माझें चित्र काढ, ही ऑलिव्हर क्रॉमवेलनें चित्रकारास दिलेली सूचना दंडेलीची ठरेल. यथार्थ चरित्र आणि यथार्थ

चित्र यांची जगांत किंमतच नाहीं असें होऊं पाहील; आणि ज्या वाचकांच्या हितार्थ चरित्रकारावर हें अन्यायाचें बंधन घालण्यांत येत आहे, त्यांना स्वतःची गुणदोषविवेचकशक्ति मुळींच नाहीं. चरित्रकार जेवढें त्यांना दाखवील, तेवढयांत त्यांनीं संतोष मानावा, इतकी त्यांची असहाय मानसिक दुर्बलता आहे हें गृहीत केल्यासारखें होईल. चरित्रकाराला वाटलें तर त्यानें चरित्रनायकाला सद्गुणांचा पुतळा बनवून सोडावें, पण तो दोषाचें नांव काढील तर पाठींत सोटा बसेल, असा या निर्बंधाचा अर्थ होतो. कोणीहि स्वाभिमानी व जबाबदार लेखक असला तोंडपुजेपणा पतकरून चरित्रग्रंथ लिहिण्यास तयार होणार नाहीं, आणि अशा एकांगी चरित्रग्रंथांपासून वाङ्मयाला व समाजाला तरी कोणता लाभ होणार आहे ? देवतांची मूर्तिपूजा नाहींशी होऊन तिच्या जागीं किंवा तिच्या जोडीला ही माणसांची तोंडपुजा येऊन बसेल. यानें समाजाची उन्नति होईल, असें वाटतें काय ?

हा वाद निरर्थक आहे असें कोणीही सुज्ञ मनुष्य सांगेल. चरित्रनायक हा आपल्याच सारखा गुणदोषांनीं युक्त असा प्राणी आहे—देव नाहीं—अशी भावना वाचकांच्या ठायीं जागृत आहे तोंपर्यंतच ते माणसाचें चरित्र वाचण्याला हातीं घेतील, आणि आपल्या या मर्यादित जगांत, सर्व बाजूंनीं अडचणींनीं व्याप्त अशा परिस्थितींत सुद्धां कर्तृत्ववान् माणसाला आपली कर्तबगारी दाखविण्यास विस्तृत क्षेत्र मोकळें आहे हा बोध त्या कर्तृत्ववान् पुरुषाच्या चरित्रापासून ते घेतील. पण त्या चरित्रनायकाच्या दोषांवर पांघरूण पडून देवत्वाचा मुखवटा त्याच्यावर चढविला गेल्यावर बोध घेण्यासाठीं नव्हे तर रामकृष्णादि देवावतारांच्या चरित्रांप्रमाणें केवळ भाविकपणानें व पुण्यप्राप्तीच्या उद्देशानें लोक त्या चरित्राचें पठन करूं लागतील, आणि अशा प्रकारें पुराणांच्या संख्येंत मात्र भर पडेल. हा प्रकार इष्ट आहे असें कोण म्हणेल ? इंग्लंडांत १८ व्या शतकांत हाच वाद उपस्थित झाला होता. आणि त्यावेळीं डॉ. जॉन्सननें या वादाचा निकाल कायमचा लावून टाकिला. या महापंडितानें स्पष्टच सांगून टाकिलें कीं, "If nothiug but the right side of characters were shown, we should sit down in despondency, and think

it utterly impossible to imitate them in anything." उघडच आहे. दोषहीन मनुष्य म्हणजे देवाची विभूतिच म्हटली पाहिजे. तिचें अनुकरण करण्याची महत्त्वाकांक्षा मानवी सामर्थ्याच्या आटोक्यांत कशी यावी ? आणि आकांक्षा धारणाऱ्याच्या वांट्याला निराशेवांचून दुसरें काय येणार आहे ? चरित्र लिहितांना लेखकानें साधारणपणें कोणतें धोरण ठेवावें याविषयींच्या पुढील सूचना होतकरू चरित्रकारांनीं लक्ष्यांत ठेवण्याजोग्या आहेतः—

"चरित्रनायक कोणत्याही पक्षाचा आणि मताचा असला तरी चरित्र लिहितांना खंडणमंडण फारसें येऊं नये. त्यानें आपल्या मताप्रमाणें जें केलें, तेंच कितपत विचारणीय व अनुकरणीय आहे व तें सुपरिणामी झालें कीं काय हें पहावें. लिहिणाराच्या मनांत फाजील पक्षाभिमान, द्वेषभाव अथवा कुत्सितपणा असूं नये. होऊन गेलेल्या पुरुषाबद्दल लिहितांना आपण मृत पुरुषाविषयीं लिहीत आहों, तो उत्तर देण्यास हजर नाहीं, हें लक्षांत ठेवावें. टीका करावी, पण ती थोर मनानें सरळपणें जरूर तेवढीच करावी. हवें त्यानें हवें त्याचें चरित्र लिहिण्यांत अर्थ नाहीं. मतें आणि विचार मान्य असोत वा नसोत, त्यांचें पूर्ण आकलन पाहिजे. चरित्रनायकाची योग्यता, परिस्थिति, स्वभाव, साधनें, यांकडे सहानुभूतीची दृष्टि असावी; सर्व प्रकारची माहिती शक्य तेवढी मिळवावी, आणि खरेखोटेपणा नीट तपासून पहावा; एकाच गोष्टीवर किंवा अनुमानांवर अवलंबून राहूं नये. चरित्रकार प्रामाणिक व सत्याभिमानी पाहिजे; नायकाविषयींचें प्रेम आणि आदरबुद्धि विचारपूर्वक मर्यादित राखली पाहिजे."

लेखनकला—वा. गो आपटे.

# परिशिष्ट.

## ग्रंथकारांची त्रोटक माहिती.

१ रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए. एल् एल्. बी. ( जन्म १८७१ )—हे खानदेशांत वकिली करतात. यांचा नाटककार, कवि, टीकाकार, विनोदी लेखक, व कादंबरीकार ह्मणून महाराष्ट्रांत फार लौकिक आहे. यांनीं लिहिलेलीं वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, जन्मरहस्य, सहचारिणी, परिवर्तन, इत्यादि नाटकें वाङ्मयदृष्टीनें आदरणीय असून यांतील बरींच मराठी रंगभूमीवरही लोकप्रिय झालीं आहेत. ‘ सुदाम्याचे पोहे. अर्थात् ‘साहित्यबत्तिशी ’ हा यांचा विनोदी लेखांचा संग्रह फार नांवाजलेला आहे, या ग्रंथामुळें व त्यांच्या नाटकांतील विनोदस्थळांमुळें, हे मराठी विनोदी वाङ्मयाचे आद्य प्रवर्तक गणले जातात. त्यांच्या विनोदाची मदार बहुश: विरोधाभास, वक्रोक्ति व शब्दश्लेष यांवर अवलंबून असते ‘ दुटप्पी कीं दुहेरी ’ व ‘ श्यामसुंदर ’ या कादंबऱ्या यांनीं लिहिल्या आहेत. यांचे धार्मिक, सामाजिक व नैतिक विचार प्रगतिपर असून, त्यांची छटा त्यांच्या सर्व लिखाणावर वठलेली आढळते.

२. रा. विष्णु कृष्ण ऊर्फ विष्णुशास्त्री चिपळूणकर, बी. ए., ( १८५०–१८८२ ) हे बी. ए. झाल्यावर सरकारी शिक्षण खात्यांत नोकरीस लागले. परंतु १८७९ सालीं नोकरीचा राजीनामा देऊन ते स्वतंत्र उद्योगास लागले नोकरीचा राजीनामा देण्यापूर्वींच त्यांनीं १८७४ सालापासून ‘ निबंधमाला ’ नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें होतें. या मालेंत त्यांनीं अनेक सामाजिक व राजकीय विषयांवर आणि वाङ्मयचर्चात्मक व चरित्रपर लहान मोठे निबंध प्रसिद्ध केले यांतील कांहीं निबंध इतके मोठे आहेत कीं, त्यांना स्वतंत्र ग्रंथ समजण्यासही हरकत नाहीं निबंधमालेच्या भाषेची ओजस्विता, विचाराविर्भावाचा आवेश, आणि शब्दप्रयोगांतील अलंकारिक खोचदारपणा, याचा महाराष्ट्रांतील सुशिक्षित तरुण पिढीवर इतका ठळक परिणाम झाला, कीं, विष्णुशास्त्र्यांना, ‘ आधुनिक निबंधवाङ्मयाचे व राष्ट्रीय भावनांचे जनक, अशी पदवी देण्यांत येत असते. पुण्याचे न्यु इंग्लिश स्कूल, किताबखाना

चित्रशाळा, आर्यभूषण छापखाना, आणि केसरी व मराठा हीं दोन साप्ताहिक वर्तमानपत्रें, या संस्थांचे हे मूळ उत्पादक होते. यांची राहणी साधी पण स्वतंत्र बाण्याची होती. राष्ट्राचा स्वाभिमान जागा करण्यासाठीं, त्यांनीं धार्मिक व सामाजिक बाबतींत नव्या सुधारक मतांवर बरेच वेळां कठोर टीका केलेली आहे. आणि कांहीं ठिकाणीं ती असमर्थनीय आहे तरी पण त्यांचे विचार एकंदरींत प्रगतिपरच होते आणि प्रसंग पडलाच तेथें जुन्या वेड्यावांकड्या चालींचा व विचारांचा त्यांनीं खरपूस समाचार घेतला आहे.

३. **वामन मल्हार जोशी एम्. ए,**—हे हिंगणें एथील भारत महिला-विद्यापीठातील अध्यापकमंडळांत आहेत. तात्त्विक ग्रंथकार, निबंधलेखक मार्मिक टीकाकार, व कादंबरीकार, म्हणून यांची फार ख्याति आहे. रागिणी, आश्रमहरिणी, नलिनी, व नवपुष्पकरंडक, ही यांचीं पुस्तकें ललित वाङ्मयांत लोकादरास पात्र झालेलीं आहेत. नीतिशास्त्रप्रवेश व साक्रेतिसाचे संवाद हे तात्त्विक ग्रंथही यांनींच लिहिलेले आहेत. अनेक मासिक पुस्तकांतून यांचे तात्त्विक, पुस्तकपरीक्षणात्मक, व वाङ्मयचर्चात्मक, लेख प्रसिद्ध झाले आहेत. यांची विचारसरणि नेहमीं मुद्देसुद असून भाषापद्धति बरीच खोंचदार व वेधक असते, यांच्या लेखांत गूढ व सभ्य विनोदही वारंवार अनुभवास येतो.

**४ रा. नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए., एल्. एल्. बी.,** ( जन्म १८७. )—हे महाराष्ट्रांत अष्टपैलू ग्रंथकार म्हणून नांवाजलेले आहेत. हे नाटककार, कवि, चरित्रकार, इतिहासलेखक, निबंधकार, व्याख्याते, आणि केसरी व मराठा या साप्ताहिकांचे संपादक म्हणून मराठी वाचकांच्या निकट परिचयाचे आहेत. यांच्या लेखणींत गांभीर्य, विनोद, व विचिकित्सा, यांचा बेमालूम मिलाफ आढळांत येतो. यांची भाषासरणि सोपी, पण ठसकेदार, अलंकारिक, व मार्मिक, असते. तोतयाचें बंड, कृष्णार्जुनयुद्ध, वीरविडंबन, व भानुदास हीं नाटकें, लो. टिळकांचें चरित्र ( भाग १ ला ), ग्यारिबाल्डीचें चरित्र, आयरलंडचा इतिहास, मराठे व इंग्रज, सुभाषित आणि विनोद, व्याख्यानें व लेख, इत्यादि बहुमोल ग्रंथांचीं यांनीं मराठी सारस्वतांत भर घातली आहे.

**५. रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए,** ( जन्म १८७४ )—हे मुरुड-जंजिरा येथील हायस्कूलचे हेडमास्तर आहेत. मराठी कवींचे बोल, बोधमणिमाला, फुलांचे झेले, वामनपंडित, तुकाराम, मुक्तेश्वर, इत्यादि पुस्तकें यांनीं लिहिलीं

आहेत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, व मोरोपंती केकावलि, हे ग्रंथ यांनीं संपादिले आहेत. हे खेळगडी व काव्यसंग्रह या मासिकांचे अनेक वर्षे संपादक होते. अनेक मासिकांतून व लेखसंग्रहांतून यांचें पुस्तकपरीक्षणात्मक व वाङ्मयचर्चापर लिखाण प्रसिद्ध झालें आहे.

**६. डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, एम्. ए, एल् एल्, डी.- पी. एच्., डी.**, इत्यादि. (१८३७–१९२५)—हे, सिंध हैद्राबाद व रत्नागिरी येथील हायस्कुलांत हेडमास्तरचें काम केल्यावर, इ. स. १८६८ सालीं एल्फिन्स्टन् कॉलेजांत संस्कृत भाषेचे अध्यापक झाले. नंतर डेक्कन कॉलेजांत अनेक वर्षे संस्कृताध्यापकाचें काम केल्यानंतर इ. स. १९०० सालीं यांनीं पेनशन घेतलें. कॉलेजांतील अध्यापकाचें काम करीत असतांच, यांनीं शिलालेख व नाणीं यांचा अभ्यास करून प्राचीन ऐतिहासिक संशोधनाचे कार्याचा उपक्रम केला. या कार्यांत अत्यन्त परिश्रम करून त्यांनीं आपली कुशाग्रबुद्धि विद्वद्वर्गाच्या प्रत्ययास आणून दिली, व ‘ प्राच्यविद्याविशारद ’ म्हणून त्यांचें नांव सर्वत्र गाजूं लागलें. अनेक युरोपीय व हिंदी विद्यापीठांनीं आणि ब्रिटिश सरकारनें त्यांचा गौरव करून त्यांस बहुमानाच्या पदव्या अर्पण केल्या. संशोधकाप्रमाणेंच हे मोठे धार्मिक व सामाजिक उद्धारक व सुधारक होते. हे, मुंबईतील प्रार्थना समाजाचे संस्थापकमंडळांत मोडत असून, मोठे नैष्ठिक भक्त होते. यांच्या धार्मिक, सामाजिक, व नैतिक, लेखांचा व व्याख्यानांचा संग्रह सुबोधपत्रिकेचे मराठी संपादक रा. वैद्य यांनीं प्रसिद्ध केला आहे. हा बहुमोल ग्रंथ सर्व लहानथोर वाचकांस सन्मार्गदर्शक होण्यासारखा आहे.

**७. रा वामन आबाजी मोडक. बी. ए, ( १८३५–१८९७ ).**—मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. च्या पहिल्याच परीक्षेंत हे इ. स. १८६२ सालीं पास झाले. १८६७ सालापासून पंधरा वर्षेपर्यंत सिंध हैद्राबाद, धारवाड, रत्नागिरी, सुरत व पुणें, येथील हायस्कुलांत ते हेडमास्तरच्या हुद्यावर होते. १८८२ सालीं ते मुंबईतील एल्फिन्स्टन् हायस्कुलचे प्रिन्सिपाल झाले. ही जागा या पूर्वी हिंदी गृहस्थास कधींहि मिळाली नव्हती. याच जागेवर असतांना, वामनरावजींनीं १८९३ सालीं पेनशन घेऊन, पुणें शहराचे रहिवासी होण्याचा बेत मुकर केला. त्यांचा उत्तम अध्यापक म्हणून फार लौकिक होता, व छात्रवर्गांत त्यांचा मोठा दरारा असे. शाळेला शिस्त लावण्याचे कामीं त्यांचा हात-

खंडा होता. वामनरावजी डॉक्टर भांडारकरांप्रमाणेंच प्रार्थनासमाजाचे अध्वर्यु, ईश्वराचे प्रेमळ भक्त, व सामाजिक बाबतींत उद्धारक व सुधारक होते. त्यांनीं शारीरभाष्य व उपनिषदें यांचा आस्थेनें अभ्यास केला होता. भगवद्गीतेबद्दल तर त्यांच्या मनांत अत्यंत प्रेमादर असे. त्यांनीं बऱ्याच उपनिषदांचें सार मराठींत लिहिलें होतें, व गीतेवर ओवीबद्ध टीका रचली होती. परंतु हें लिखाण हल्लीं उपलब्ध नाहीं. प्रार्थनासमाजाच्या तत्त्वांचें प्रतिपादन करणारें 'सद्धर्मानुशासन' या नांवाचें त्यांचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. ते उत्तम वक्ते व कीर्तनकारही होते. कीर्तनांत ते स्वकृत पद्यांचा उपयोग करीत असत. मराठी भाषेचा त्यांस मोठा अभिमान असे. मोरोपंत, श्रीधर व रघुनाथ पंडित यांच्या काव्यांवर त्यांची मोठी मेधा होती. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, व तुकारामी अभंग, यांबद्दलही त्यांना फार प्रेम वाटत असे रा. रामचंद्र भिकाजी जोशी लिहितात कीं, 'वामनराव यांची भाषा सोपी, सरळ, शुद्ध, आणि भारदस्त असे. त्यांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत संस्कृत शब्द पुष्कळ येत, आणि भाषेची घाटणी इंग्लिश तऱ्हेची नसून अगदीं स्वाभाविक मराठी किंवा संस्कृत तऱ्हेची असे. त्यांचा स्वभाव जसा शांत, सौम्य, गंभीर आणि भारदस्त असा असे, तशी त्यांची भाषासरणिही असे."

८. **वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.**— हे आधुनिक बालोपयोगी वाङ्मयाचे मुख्य प्रवर्तक आहेत. यांनीं लहान मुलांकरितां 'आनंद' नांवाचें मासिक आज सतत २० वर्षें चालविलें आहे. अलीकडे त्यास प्रौढांकरितां एक भारदस्त विषयाची पुरवणीही जोडली असते. धर्म, नीत, सदाचार, इतिहास, गोष्टी, नाट्य, चरित्र, वगैरे नानाविध विषयांवर लहान लहान पुस्तकें लिहून बालवाचकांची त्यांनीं चांगलीच सोय केली आहे. शिवाय मराठी भाषेचे संप्रदाय, शब्दरत्नाकर, सौंदर्य व ललितकला, लेखनकला व लेखनव्यवसाय, वगैरे महत्त्वाचे ग्रंथ त्यांनीं रचिले आहेत. माणिकबाग, दुःखाअंतीं सुख, वगैरे कांहीं कादंबऱ्याही त्यांनीं लिहिल्या आहेत. यांना महाराष्ट्रसंस्कृतीचा सदभिमान आहे, आणि शारीरिक चोचल्यांचा मोठा तिटकारा आहे. यांची भाषासरणि फार आटोपशीर, सरळ व सुबोध असते.

---

# मराठी वेंचे.

## ( गद्य )

## टिप्पणी.

पृष्ठ ओ.

१ २ ' **श्यामसुंदर** '—हा एक ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याच्या हातून शाळेंतला रेखींव अभ्यासक्रम चांगलासा तडीस जाईना, म्हणून त्याच्या कठोर बापानें त्याला घरांतून हांकलून दिलें होतें. श्यामसुंदराची आई सुंदराबाई ही फार प्रेमळ माउली होती, परंतु तिचें कर्दनकाळ नवऱ्यापुढें कांहीं चालत नसे. असो. श्यामसुंदर घरांतून बाहेर पडल्यावर एका ब्राह्मणेतर सज्जनाबरोबर चमणपुरास आला, आणि तेथलि हमालपुऱ्यांतील निरक्षर व हीन समाजांत ब्राह्मणेतर म्हणूनच राहिला. नंतर त्या व्यसनाधीन झालेल्या दीन व दरिद्री समाजाची स्थिति सुधारण्याकरितां त्यानें स्वयंस्फूर्तीनें कसा प्रयत्न केला, तें या उताऱ्यांत वर्णिलें आहे.

१० ' **अड्डा** '—फड, मेळा. असा फड किंवा मेळा जमण्याच्या जागेलाही ' अड्डा ' म्हणतात.

११ ' **प्रार्थना संगीत** '—हें एक मुंबईच्या प्रार्थनासमाजानें प्रसिद्ध केलेलें पुस्तक आहे. यांत प्रार्थनेचीं व भक्तीचीं अनेक पदें, अभंग, इत्यादि आहेत.

१४ ' **पार्थिव द्रव्य** '—माती, रेव, करळ, छेडू, वगैरे पृथ्वीचे घटक पदार्थ.

२ ८ ' **सुंदराबाई** '—श्यामसुंदराच्या आईचें नांव. प्रेमळ आईची आठवण झाली म्हणजे श्यामसुंदराला गहिंवरून येत असे.

३ ७ ' **तरल** '—चपल, चलाख, तलख.

८ ' **आकलन** '—ग्रहण, समजूत. '**पल्लेदार**'—व्यापक, विशाल.

२७ ' **संस्कृत** '—प्रकाशित, सुधारलेल्या.

| पृष्ठ | ओ. | |
|---|---|---|
| ४ | २ | ' **साहचर्य** '—एकत्र वसति, सोबत, सख्य. |
| | ३ | ' **कोटी** '—वर्ग, विभाग. |
| | १५ | ' **सांसर्गिक** '—संसर्गानें म्हणजे संगतीसोबतीनें उत्पन्न होणारी. |
| | १६ | ' **तैलबुद्धि** '—पाण्यावर पडलेल्या तेलाप्रमाणें प्रसरणशील बुद्धि. |
| | २० | ' **भूमितिश्रेणी** '—ठरावीक गुणकानें वाढ होण्याचा प्रकार. उदा० १, ३, ९, २७, ८१, २४३, इत्यादि. श्यामनें दोन विद्यार्थ्यांस शिकवून तयार केलें, कीं, ते प्रत्येकीं दोन दोन विद्यार्थी तयार करीत; हे नवे चार विद्यार्थी पुन्हां प्रत्येकीं दोन दोन विद्यार्थी शिकवीत, म्हणजे नवे आठ विद्यार्थी होत. अशाप्रकारें विद्येचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला. |
| | २८ | ' **कुटुंबवत्सल** '—ज्यांचे मुलांबाळांचे परिवार मोठे होते, असे. |
| ५ | २ | ' **वज्रलेप** '—अक्षय. ' **वज्र** ' हें इंद्राचें आयुध आहे आणि तें अत्यन्त कठीण द्रव्याचें बनविलेलें आहे. |
| | ८ | ' **जन्मदात्यांचें ऋण** '—आयांनीं केलेल्या प्रेमाचा व उपकाराचा भार. ' **ऋण** ' = कर्ज. |
| | १० | ' **अद्वितीय** '—ज्याच्या जोडीचा दुसरा नाहीं असा, अप्रतिम. |
| | २१ | ' **बाबापुता करून** '—आंजारून गोंजारून, गोडीगुलाबीनें समजावून. ' **बाबा** '—मुलाला प्रेमानें बाबा म्हणतात. ' **पूत** '—पुत्र, मुलगा. |
| | २४ | ' **लाजेनें मरून चूर होणें** '—अगदीं ओशाळून गयावया होणें. |
| | २९ | ' **सार्थक** '—योग्य कारण. ( विरुद्ध ) निरर्थक. |
| ६ | १ | ' **सहकारी पतपेढी** '—पतपेढी म्हणजे गरजूंना पतीवर कर्ज देणारी सावकारी संस्था. अशी संस्था ज्या वेळीं वर्गणीनें उभारलेल्या भांडवलावर स्थापण्यांत येते आणि त्या भांडवलांतून जेव्हां फक्त वर्गणीदारांनाच, कांहीं वर्गणीदार हमी घेऊन, हलक्या व्याजानें कर्ज देण्याचा नियम करण्यांत येतो, तेव्हां त्या संस्थेला 'सहकारी पतपेढी' असें म्हणतात; कारण, वर्गणीदार स्वतःच समाईक भांडवल उभारून |

पृष्ठ ओ.

परस्परांची गरज भागवतात व अशा रीतीनें ते एकमेकांचे सहकारी, म्हणजे जुटीनें साह्य करणारे, होतात.

६ ६ '**नियतकालिकें**'--दररोज, आठवड्यास, दर महिन्यास, अगर अशा प्रकारें कोणत्याही नियत म्हणजे ठरावीक वेळीं प्रसिद्ध होणारीं वर्तमानपत्रें, पुस्तकें, लेखमाला, इत्यादि.

९ '**नेमस्त, जहाल**'--हे दोन राजकारणांतले पक्ष आहेत. नेमस्त पक्ष हा शांत डोक्यानें, देवाण घेवाण करीत, विशेषशी चिडवाचिडव न करतां, एकंदर स्थितीचें तानमान पाहून, राजकारण हांकीत असतो. जहाल पक्ष हा भावनेच्या तडफेनें, सत्याग्रहानें, प्रतिपक्षास डंवचून व सतावून, आपल्या अन्तिम ध्येयावर दृष्टि रोखून, राजकारण चालवतो.

१८ '**कृपण, कृपाळू**'—हे दोन्ही शब्द 'कृप्'–जपणें, या संस्कृत धातूपासून निघाले आहेत व त्यांचा धात्वर्थ 'जपणारा, जतन करणारा,' असा आहे.

२१ '**जोगवण**'—योग्य व्यवस्था, जतन, लालनपालन.

२३ '**गोल**'—आकाशांतील तारे, ग्रह, व उपग्रह, यांचे आकार पृथ्वीप्रमाणेंच वाटोळे असल्यामुळें त्यांना गोल किंवा आकाशस्थ गोल म्हणतात.

७ ३ '**अनुकंपनीय**' —कींव करण्याजोगा, दीनदुबळा.

५ '**विषयवासना**'—ऐहिक उपभोगाच्या, मिजाशीच्या, व चैनीच्या, वस्तु मिळविण्याची हांव.

१० '**पुरुषार्थ**'—आपल्या आयुष्यांत पुरुषानें संपादन करण्याजोग्या गोष्टी. या चार आहेत-धर्म, अर्थ, काम,आणि मोक्ष. धर्म=पुण्य कृत्यें. अर्थ=पुण्य कृत्यें करण्याचीं द्रव्यादि साधनें. काम=द्रव्यादि साधनें मिळविण्याची व त्यांचा उपभोग घेण्याची वासना. मोक्ष=पारमार्थिक कल्याण, उत्तम गति. पहिल्या तीन साध्यांची उत्तम संपादणी झाली, म्हणजे हें चवथें साध्य हस्तगत होण्यासारखें असतें.

११ '**सूत्र**'—धोरण, उद्देश.

२३ '**अपव्यय**'—दुरुपयोग. ( विरुद्ध ) सद्व्यय.

२९ '**शिखर**'—कळस, कमाल, कडेलोट.

पृष्ठ ओ.

८ २ ' दील '—मर्जी, खुषी, मन, लहर.

१० ' पर्याय '—समानार्थक शब्द, दुसरें नांव.

१५ ' चारी ठाव '–चारी वेळ; सकाळ, दुपार, संध्याकाळ, व रात्र.

२० ' पायांनीं जावें '–पायांनीं दुर्बळ व्हावें, लुळें पडावें.

२१ ' सोहाळे '–रंगढंग, सौभाग्य.

९ ८ ' क्रियाशून्यत्व '–निष्क्रिय स्थिति, मोंधळा होणें, आळस.

२४ ' द्वंद्व '–जोडी, दुकल. ' परस्पर सापेक्ष '–एकमेकांवर अवलंबून असणारें.

१० १७ ' व्यापारशून्य '–क्रियाहीन, निष्क्रिय, अचेतन.

२४ ' सकृद्दर्शनीं '–प्रथमदर्शनीं, ऐकल्याबरोबर, एकदम.

११ ८ या श्लोकाचा मराठी अनुवाद—

कुंडल न, वेद कर्णा भूषण; कंकण न, दान हाताला;
शोभाढ्य सदय कायहि परोपकारें, न चन्दनें झाला.

२६ ' पथ्यावर पडण्यापुरती '–आपल्या फायद्यापुरती, पैसा वांचवण्यापुरती.

१२ १४ ' सार्वांगीण '–सर्व अवयवांस व्यापणारी, सर्व गात्रांत राहणारी.

१७ ' बलदाढ्यं '–शारीरिक सामर्थ्याचा घटींवपणा.

१३ ७ ' वारी '–फेरी, जा–ये, येरझारा.

१८ ' कुचेष्टेनेंराज प्रतिष्ठा वाढत नाहीं '–एकाद्या मोठ्या मनुष्यावर किंवा त्याच्या कृत्यावर विषारी व खोडसाळ टीका केली, म्हणजे अशी टीका करणारा क्षुद्र प्राणी ताबडतोब प्रसिद्धीला येतो.

२१ ' बाणांचें लक्ष्य '-शब्दरूपी बाणांनीं विंधण्याची वस्तु; टीकेचा विषय.

१४ २ ' प्राज्ञा '—अवसान, ताकद, छाती, धैर्य.

४ ' अट्टहासानें '—मोठ्या आवेशानें व आग्रहानें; जोराच्या धडाडीनें.

८ ' उद्धोषण '—गर्जना, गडगडाट, चढत्या आवाजांत केलेली पुकारणी.

पृष्ठ ओ.

१५ १ ‘ **हातखंडा** ’—कसलेला हात, उत्तम हातोटी, अजत्र कसब.

६ ‘ **सुखसंवाद** ’—मनाला आल्हाद देणारा व चांगल्या भावना जाग्या करणारा असा संभाषणप्रसंग. विजयगांवची कांहीं मंडळी हिमालय प्रदेशापर्यंतचा प्रवास करण्यास निघाली होती. या मंडळींत जुन्या पद्धतीनें अध्ययन केलेले, परंतु नवीन विचारांस व नवीन सुशिक्षितांस सर्वस्वीं तिरस्करणीय व त्याज्य न मानणारे, असे एक शास्त्रीबोवा होते. नानासाहेब, त्यांची पत्नी, आणि त्यांची अविवाहित पण प्रौढ वयाची व चांगली शिकलीसवरलेली मुलगी उत्तरा, हें एक कुटुंब त्या मंडळींत होतें. उत्तरा ही मोठी धीट, बोलकी, तलख, पण शुद्ध व मोकळ्या मनाची, मुलगी होती. कल्पना व श्रद्धा यांपेक्षां तर्क व बुद्धि यांना ती जास्त मान देत असे. याच मंडळींत भाऊसाहेब व त्यांची मुलगी रागिणी, हींही होतीं. रागिणी ही हुशार व सुशिक्षित होती. तिचा स्वभाव फार शांत, विचारी, व मनमिळाऊ, असल्यामुळें तिच्या भाषणांत नेहमीं नेमस्तपणा, पोक्तपणा, व मतामतांची एकवाक्यता करण्याचा हेतु, हे गुण दिसत असत. उत्तरेचा उल्लूपणा व तडफ, हीं तिला फारशीं आवडत नसत. असो; या प्रवासांत विजयगांवकर मंडळीची एके ठिकाणीं प्रियब्रह्मस्वामी नांवाच्या एका योगनिष्ठ सत्पुरुषाशीं गांठ पडली. स्वामींच्या सहवासांत या मंडळीनें कांहीं दिवस घालविले. या वेळीं स्वामींबरोबर अनेक धार्मिक, पारमार्थिक, सामाजिक, व नैतिक, विषयांवर त्यांचे वादविवाद चालत. यांपैकींच एक प्रसंग प्रस्तुतच्या उताऱ्यांत आहे.

९ ‘ **तत्त्वचर्चात्मक** ’—व्यावहारिक बाजू किंवा लौकिक भावना सोडून, केवळ ज्ञानाच्या दृष्टीनें ऊहापोह करणें, हा ज्यांचा विषय आहे अशीं.

१४ ‘ **उदास** ’—कंटाळवाणी, त्रासदायक.

२१ ‘ **कोटि** ’—शब्दांची गंमत.

१६ २ ‘ **अविचारणीय** ’—विचार न करतां स्वीकारण्याजोगें, श्रद्धाग्राह्य.

६ ‘ **विमलात्म** ’—शुद्ध अंतःकरणाची, सरळ मोकळ्या मनाची.

८ ‘ **सात पावलांची संगति** ’—संस्कृत वचन:—‘सतां सप्तपदी मैत्री’ मराठी अनुवाद.

पृष्ठ ओ.

संत म्हणति सत्पदें सहवासें सख्य साधुशीं घडतें:
सन्मित्रचि न व्यसनीं, अन्याखिलमित्र संकटीं पडतें.
——मोरोपंत.

१० 'प्रयतात्म'–ज्यांनीं आपल्या इंद्रियांसह व अहंकारादि जीवभावांसह आत्म्याचें नियमन केलें आहे असे.

१४ 'अदृश्यवाद, दृश्यवाद'—मनुष्याचीं ज्ञानेंद्रियें मर्यादित सामर्थ्याचीं आहेत. तेव्हां या इंद्रियांच्या प्रत्यक्ष ज्ञानावरच विसंबून सर्व गोष्टींचें ज्ञान होणार नाहीं. शिवाय, हीं इंद्रियें वारंवार स्वतः फसतात, आणि त्यामुळें त्यांवर विश्वासून चालणारा प्राणीही फसतो. म्हणून पारमार्थिक तत्त्व जाणण्याला भावना व श्रद्धा यांचेंच साह्य घेतलें पाहिजे, हा अदृश्यवाद. उलटपक्षीं, ज्ञानेन्द्रियें व बुद्धि हींच मनुष्याचीं ज्ञानसाधनें आहेत. कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन या मर्यादेच्या पलीकडे भरारी मारणें हें समंजसपणाचें नाहीं. जें अज्ञेय आहे, त्याच्याविषयीं कांहींतरी काल्पनिक चऱ्हाट वळीत बसणें, म्हणजे मनुष्यानें आपल्या शक्तीचा दुरुपयोग करणें आहे, हा दृश्यवाद.

१६ २१ **मराठी अनुवाद**—

संदेह जैं होइल साधु-चित्तीं,
तैं ग्राह्य होई हृदय-प्रवृत्ती.

२७ '**प्रतिभा**'—नवीन नवीन कल्पना व वस्तुभाव प्रसवण्याची तेजस्वी शक्ति.

१७ १० '**सिद्धान्त**'—भरपूर पुराव्यासह निश्चित केलेलें तत्त्व.

१३ '**उदात्त**'—उच्च प्रकारचीं व मनास मोहून संतुष्ट करणारीं.

१८ '**वनवासी फूल**'–हें ना. वा. टिळक यांचें एक खंडकाव्य आहे.

१८ १९ '**बुद्धिवादानें**'—केवळ बुद्धीच्या साह्यानें ऊहापोह करून.

२४ '**वावदूक तार्किक**'—केवळ कार्यकारणाच्या नियमास चिकटून वाद घालणारा.

२५ '**हृदयगम्य**'—अन्तःकरणांतील भावनांसच कळणारें.

२६ '**तर्कप्रतिपादनीय**'—नुसत्या कार्यकारणमीमांसेनें सिद्ध होण्याजोगें.

१९ २ '**निरपेक्ष स्वहितत्याग**'—मोबदल्याच्या स्वरूपानें आप-

पृष्ठ ओ.

१९ त्यास कांहीं प्राप्ति व्हावी, अशी अपेक्षा—इच्छा—मनांत न धरतां, केवळ परोपकारासाठीं स्वतःच्या हितावर पाणी सोडणें.

४ '**कर्ण**'— या भारती योद्धयाला जन्मतःच अंगावर एक प्रकारचें कवच व कानांत कुंडलें लाभलीं होतीं व तीं त्याच्या शरीरसंरक्षणाचीं महत्त्वाचीं साधनें होतीं. परंतु कर्ण हा इतका उदार होता, कीं, एकदां इंद्रानें ब्राह्मणाचा कपटवेष घेऊन या कवचकुंडलांची याचना केली असतां, या महात्म्यानें यत्किंचित्‌ही कांकूं न करतां देऊन टाकलीं. अशा प्रकारें ब्राह्मणाच्या संतोषाकरितां आपल्या संरक्षणाचीं साधनें गमावून कर्णानें अलौकिक स्वहितत्याग केला.

५ '**खिस्त**'—हा ख्रिस्ती धर्माचा संस्थापक. तो देवास 'पिता' व स्वतांस 'देवाचा पुत्र' म्हणत असे, आणि सर्व मनुष्यें एकाच परमेश्वराचीं लेंकरें आहेत, म्हणून सर्वांनीं बंधुभावानें वागावें व ईश्वराच्या मार्गास अनुसरावें, असें तो प्रतिपादीत असे. जुन्या यहुदी धर्मांविरुद्ध त्यानें चळवळ चालविली; व समता, दया, प्रेम, ईश्वरभक्ति, आणि सदाचार, या तत्त्वांवर त्यानें नवीन धर्मसंप्रदाय चालू केला. यामुळें यहुदी लोकांचा त्याच्यावर मोठा राग झाला व त्यांनीं त्याला धर्मद्रोही व देशद्रोही ठरवून सुळीं दिलें. येशू ख्रिस्तानें जगाचें पाप धुवून टाकण्याकरितां आपलें रक्त सुळावर सांडलें, असें ख्रिस्ती धर्माचे अनुयायी मानतात; आणि तें खरेंच आहे. कारण, ज्या चळवळीमुळें ख्रिस्तास प्राणास मुकावें लागलें, त्या चळवळींत त्याचा कोणताही स्वार्थी हेतु नव्हता.

१४ '**कृतनिश्चय**'—ज्यांचे सर्व संदेह व शंका दूर झाल्या आहेत असे.

१७ '**योगसिद्धि**'—एकान्तवास, आत्मचिंतन, व कर्मेन्द्रियें आणि ज्ञानेन्द्रियें यांचें पूर्ण संयमन, यांनीं अंगीं येणारें अलौकिक सामर्थ्य.

२० ११ '**अनिरुद्ध**'—अखंड; अस्खलित.

१८ '**चारित्र्य**'—सद्गुण.

२५ '**केन्द्र**'—मध्यवर्ती स्थान; मूळ ठिकाण.

२१ ३ '**पक्षपाती**'—अनुकूल.

१३ '**दुबेरजी**'—एकाच जातीच्या किंवा बाबीच्या जमेकडील व खर्चाकडील रकमांची वजावाट.

पृष्ठ ओ.

२३ ‘ **खानदानीची** ’--बादशाही, साम्राज्याची.

२२ १० ‘ **मर्यादित स्वराज्य** ’--लष्कर व परराष्ट्रीय राजकारण, या दोन बाबी वगळून, इतर सर्व बाबतींत हिंदी प्रजेला पूर्ण हक्क देण्याची राज्यपद्धति.

२२ २५ ‘ **बोअर** ’--दक्षिण आफ्रिकेंतील डच वसाहतवाल्यांना बोअर म्हणतात. ऑरेंज नदीचा प्रान्त व ट्रान्सव्हाल येथें यांच्या स्वतंत्र वसाहती होत्या. इ. स. १८७७ सालीं ब्रिटिश सरकारनें बोअर लोकांना झुलु लोकांपासून आपला बचाव करण्याचे कामीं साह्य करून, त्यांच्या वसाहती ब्रिटिश राज्यच्छत्राच्या संरक्षणाखालीं आणल्या. परंतु १८८३ सालीं अगदीं स्वतंत्र होण्याच्या इच्छेनें बोअर लोकांनीं बंड केलें. या युद्धांत ब्रिटिशांस माघार आली आणि १८८४ च्या तहानें बोअर वसाहतींचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत आलें यानंतर ट्रान्सव्हालच्या वसाहतींत सोन्याच्या खाणी चांगल्या सांपडल्यामुळें बरेच इंग्रज व इतर युरोपीयन व्यापारी त्या वसाहतींत जाऊन राहिले. परंतु तेथें त्यांच्यावर जबर कर बसविण्यांत आले व त्यांना नागरिकाचे हक्क देण्याचें ट्रान्सव्हालचे अध्यक्ष क्रूगर यांनीं साफ नाकारलें. या गोष्टीमुळें १८९९ सालीं बोअर व ब्रिटिश यांच्यामध्यें पुन्हा युद्ध जुंपलें. याच युद्धाच्या वेळीं, ‘ आम्ही सर्व जगाला थक्क करून सोडूं.’, असे जाहीर उद्गार अध्यक्ष क्रूगर यांनीं काढले; आणि युद्धाच्या आरंभीं बोअर लोकांनीं फारच धडाडी दाखविली. परंतु हें फार दिवस टिकलें नाहीं. लवकरच ते ब्रिटिशांच्या लष्करी सामर्थ्यापुढें टेंकीस आले. त्यांचा बरेच ठिकाणीं पराजय झाला आणि अध्यक्ष क्रूगर यांनीं युरोपांत पळून जाऊन आपल्या स्वतांचा बचाव केला ! यानंतर वर्ष दीडवर्षपर्यंत बोअर सेनापति डी वेट् यानें लपूनछपून गनिमी काव्याची लढाई आरंभली. पण तीही फारशी यशस्वी न झाल्यामुळें १९०१ सालीं लढाईचा शेवट होऊन बोअर लोकांच्या वसाहती ब्रिटिश साम्राज्यांत सामील करण्यांत आल्या.

२६ ‘ **बेलजम** ’--इ. स. १९१४ सालीं जर्मनीनें रशिया व फ्रान्स् यांबरोबर युद्ध पुकारलें. तेव्हां फ्रान्सला अचानक शह देतां यावा, म्हणून जर्मनीनें,आपलें सैन्य फ्रान्समध्यें आणण्याकरितां,वाटेवर असणाऱ्या बेलजम देशाच्या स्वातंत्र्याला धक्का देऊन, त्या देशांत आपलें सैन्य घुसविलें. जर्मनी आपल्यापेक्षां फारच बलाढ्य आहे, हें पक्कें

पृष्ठ ओ.

जाणूनही बेल्जमनें केवळ आपल्या स्वातंत्र्याची इज्जत राखण्याकरितां जर्मनीला पदोपदीं तोंड दिलें. या साहसानें बेल्जमचें अपरंपार नुकसान झालें, परंतु त्यामुळें त्याला सर्व जगाची सहानुभूति संपादन करतां आली आणि शिवाय फ्रान्सचेंही संरक्षण झालें.

२३ ८ '**देहाभिमान**'—देहाहंकार, जड शरीराविषयीं ममत्व. या शब्दांत सर्व लौकिक व्याप, वासना, व भावना यांचा अन्तर्भाव केला पाहिजे, कारण या सर्वांचें मूळ देहांतच आहे.

११ '**परमार्थबुद्धि**'—या जड जगाच्या व्यापाहून भिन्न असें जें आत्मस्वरूप आहे असें आपल्यास वाटतें. तें प्राप्त करून घेणें हा परमार्थ म्हणजे श्रेष्ठ साध्य, परम कल्याण. तो अर्थ साध्य करून घेण्याची इच्छा म्हणजे परमार्थबुद्धि.

२४ येथें संस्कृत कवि भर्तृहरि याच्या एका श्लोकाचा उल्लेख आहे. त्या श्लोकाचा मराठी अनुवाद--

तनुवचनमनीं जे स्नात पुण्यामृताचे,
बहुपरि उपकारीं लाडके जे जनाचे,
अणुहि परगुणांचा बांधुनी भव्य डोंगला,
विकसित हृदयीं जे, ते किती सन्त ? बोला.

२४ २ '**त्रिगुणात्मक**'—सत्त्व, रज, आणि तम, हे तीन गुण. चांगल्या वासना, लौकिक वासना, आणि दुष्ट वासना, ह्या तीन गुणांपासून अनुक्रमें उत्पन्न होतात. मनुष्यामध्यें या तिन्ही गुणांचें कमीजास्ती प्रमाणांत मिश्रण झालेलें आढळत असल्यामुळें अत्यन्त निर्दोष असा माणूस सहसा आढळत नाहीं.

२५ ४ श्लोकाचा अनुवाद--

लोकीं अम्हांस अवमानिति जे सुजाण,
जाणोत ते, मुळिं तयांस्तव यत्न हा न

'**भवभूति**'-हा संस्कृत कवि मोठा भावनासंपन्न व कल्पनाशाली आहे. त्याचे विचार फार उदात्त व निर्मळ आढळतात. मालतीमाधव व उत्तररामचरित्र हीं त्याचीं नाटकें सुप्रसिद्ध आहेत. त्यांत करुणरसाचा परिपोष उत्तम झालेला आहे. तरी पण त्याच्या कृतीचा धिक्कार करणारे कांहीं शहाणेसुतें लोक होते; त्यांस अनुलक्षून त्या कवीनें वरील निर्वाणीचे उद्गार काढले आहेत.

पृष्ठ ओ.

२६ ३ ‘ **निरामय** ’—निरोगी, ‘ **शतवत्सर** ’—शंभर वर्षे.

७ ‘ **पांचभौतिक** ’—पृथ्वी, आप. तेज, वायु, आणि आकाश हीं पांच महाभूतें. या पांची तत्त्वांचे अंश निरनिराळ्या प्रमाणांत मिसळून गेले म्हणजे हें देहाकार विश्व तयार होतें. म्हणून जें जें साकार आढळतें, तें तें पंचमहाभूतांपासून झालेलें म्हणजे पांचभौतिक समजावें.

२७ ९ ‘ **सामानाधिकरण्य** ’—एकत्रवास, साहचर्य. ‘ **अधिकरण** ’—स्थान, आश्रय, आधार.

२९ ७ ‘ **एकान्तिक** ’–एकमार्गी, अखंडित.

१२ मराठी अनुवाद–

वेड्या, सोड धनाचा घोशा;
राख, अजाणा. मनिं संतोषा.
धनिका सुताहिपासुन भीती,
सर्वत्राहि ही दिसते रीती.

३४ ८ ‘ **समयास येणें** ’—मांडेवाल करणें, तडजोड पाडणें, दे-वाण घे-वाण करून मतभेद मिटवणें.

३५ २ ‘ **तोडी** ’—उपाय, युक्त्या.

३५ १६ ही **मारवाडावरील स्वारी** इ. स. १७५४।५५ सालीं करण्यांत आली.

२६ ‘ **निर्माल्यवत्** ’—देवावर एकदां वाहिलेलें व वापरून टाकलेलें जें फूल तें निर्माल्य. असें फूल पुन्हा वाहण्यांत येत नसतें, म्हणजे तें निरुपयोगी होतें. म्हणून ‘ निर्माल्यवत् करणे ’ म्हणजे निरुपयोगी व निस्तेज करून सोडणें.

२७ ‘ **अर्थ** ’-कार्य, गोष्ट.

३६ १ ‘ **हांडी** ’—अन्न शिजविण्याचें भांडें. ‘ **हांडी चढवणें** —सोय करणें, कार्य साधणें, बाजू उचलून धरणें. याच्या उलट ‘ **हांडी उतरणें.** ’

२ ‘ **हटेले** ’–हट्टी, निग्रही. ‘ **हाडे** ’—हाडाचे पक्के, कट्टे.

३ ‘ **आजिज** ’-दीन, दुबळें.

पृष्ठ ओ.

३६ | ५ | ' **गनीम** '-लुटारू. हें नांव मुसलमान लोकांनीं मराठ्यांस दिलें होतें, म्हणून या उताऱ्यांत सर्वत्र ' गनीम ' म्हणजे ' मराठे '; असें समजावें.

६ | ' **कुंभेरी** '-हा गड भरतपुराच्या वायव्येस आहे. हा या वेळीं सुरजमल्ल जाटाच्या मुलखांत होता.

८ | ' **नेकजात** '-पतीचे, अब्रूदार.

' **पगडीभाई करणें** '-एकमेकाच्या पगडीचा आदर घेऊन व एकमेकांस मदत करण्याची आणभाक करून कार्यसिद्धीकरितां भावासारखें मानणें.

९ | ' **म्हणोन** '-- याप्रमाणें. ' **मनसबा** '-योजना, ठराव.

१२ | ' **कच्चापक्का** '-सर्व, साद्यन्त, इत्थंभूत.

१४ | ' **खुरनीस** '-लवून केलेला सलाम. ' **जाबसाल** '-प्रश्नाचें उत्तर.

१६ | ' **कूच** '-प्रयाण, लष्कराची दौड. ' **कूचदरकूच** '-दौडीवर दौड.

१८ | ' **नागूर** '-हें मारवाडांतील एका टापूचें मुख्य ठिकाण होतें. येथील गडाच्या आश्रयास विजयसिंगाचें सदर ठाणें या वेळीं होतें.

२० | ' **गंजिफा** '-दारूगोळा.

२१ | ' **कैची** '-( बाणांच्या जुड्या ठेवण्याचा ) लांकडी घोडा. ' **सुतरनाला** '-उंटावरची तोफ. ' **जेजाला** '-हातबंदूक.

२२ | ' **बरकंदाज** '-बंदुकस्वार.

२४ | ' **तमाम** '-सर्व, झाडून सारे, दरोबस्त.

२५ | ' **कबंध** '-मस्तकावेगळें धड.

२६ | ' **शर्थ** '-शिकस्त.

२७ | ' **गोडहत्यारी** '--तरवार, भाले, इत्यादि हत्यारांनीं लढणारे; लपूनछपून व दूर अन्तरावरून ज्यांचा प्रयोग करतां येतो अशा बंदुका, तोफा, नाळे, इत्यादिकांनीं लढणारे नव्हत असे. ' **निसवले तरी** ' इ०-एकदां त्यांनीं मागता पाय घेतला, म्हणजे जरी त्यांना झाडाला बांधले, तरी त्या झाडालाही घेऊन पळतील, इतके पळपुटे !

पृष्ठ ओ.

३६ २९ ‘ **जुगांतून निघालों** ’—जुटींतून फुटलों, फडांतून वेगळे झालों.

३७ ६ ‘ **नामोहरम** ’—निराश.

७ ‘ **जालेपणाचें** ’—जन्मास आल्याचें, जन्माचें. ‘ **जघन्यता** ’—अपकीर्ति, दुर्लौकिक.

१० ‘ **छाटा** ’—अन्तर, तफावत.

११ ‘ **बक्तरें** ’—लहान लहान कड्यांचीं चिलखतें.

१२ ‘ **जिरेटोप** ’—लोखंडी टोपी, शिरस्त्राण. ‘ **पेश्या** ’—कपाळापासून गाल व नाक यांपर्यंतच्या तोंडाच्या भागाचें रक्षण करणारी शिरस्त्राणास जोडलेली पट्टी. ‘ **तंगबार** ’—आंवळून जखडबंद. ‘ **मुहूर्तें** ’—शुभ वेळा पाहून.

१७ ‘ **बमयसामान** ’—सामानासह, साहित्यासकट, सरंजामसुद्धां. ‘ **रिसाला** ’—घोडेस्वारांचें पथक.

२९ ‘ **इर्षेनें दांतांटिकीस येणें** ’—ईर्षेनें-उत्तेजन नें हट्टास पेटणें.

३८ १ ‘ **खेत** ’—रणमैदान, युद्धभूमि. ‘ **जीवाआधिक केली** ’—जीवाबाहेर लढाई केली, जीवाची पर्वा न करतां लढले.

८ ‘ **तंबी** ’—दहशत, धोका.

११ ‘ **साहाजनें** ’—नगारे, काहला, ताशे, वगैरे रणवाद्यें.

१२ ‘ **अन्नप्रसाद** ’—अग्नि लावण्याचा संस्कार, प्रेताचें दहन.

१७ ‘ **छबिना** ’—पाहारा. ‘**राऊत**’—घोडेस्वार.

२२ ‘ **कुरवंडी करणें** ’—ओंवाळणें, अक्षता टाकून दिव्याची ओंवाळणी करणें.

२४ ‘ **समूर** ’—समोर, तोंडावर, शरीराच्या पुढच्या भागावर, शत्रूला पाठ न दाखवितां.

४० १३ ‘**अदृश्य होत चालली**’—नष्ट होऊं लागली.(वृद्ध लोकांची) संपत्ती.

२१ ‘ **अतिथिदेवो भव** ’—अतिथीला देवतुल्य मान, अतिथीचा भक्त हो, मनापासून आतिथ्य कर.

४१ २२ ‘ **उन्नतावनत** ’—उंचावलेली किंवा खालावलेली.

२३ ‘ **विकास** ’—वाढ, प्रसार. ‘**अन्तःसृष्टि**’—भावनांची व मनाची घटना व स्थिति.

४२ ३ ‘ **रसपरिपाकासाठीं** ’—ग्रंथाच्या गोडीची भट्टी नीट उतरावी या हेतूनें. ‘ **तंगड्या मुरगळणें** ’—विद्रूप करणें, फिरवाफिरव करणें. ( पुढें ओळ ९, ‘**अत्याचार करणें.**’ )

पृष्ठ ओ.

४२ | ११ | ' **साहित्य** '—वाङ्मय, सारस्वत, ग्रंथसृष्टि.

१२ | ' **पीनलकोड** '—दंडनीतीचें पुस्तक, अपराध्यास शिक्षा सांगणाऱ्या कायद्याचें पुस्तक.

२२ | ' **विपर्यास** '—उलटापालट, फिरवाफिरव.

४३ | ३ | ' **अशोक** '—हा क्रि. पू. दुसऱ्या शतकांत उत्तर हिंदुस्थानचा बलाढ्य सम्राट् होता. यानें बुद्धसंप्रदायाचा स्वीकार करून, त्याचा फैलाव करण्याच्या कामीं आपली सत्ता व संपत्ति ह्यांचा सढळपणें उपयोग केला. बुद्धसंप्रदायाच्या प्रसारार्थ त्यानें पुढील उपाय योजिले—( १ ) बुद्ध भिक्षूंच्या परिषदा भरवणें; ( २ ) बुद्धसंप्रदायाचे नियम स्तंभांवर, शिलांवर, धातूंच्या पत्र्यांवर, वगैरे खोदून कायम स्वरूपांत जाहीर करणें; ( ३ ) समाजाच्या धर्माचारावर लक्ष ठेवण्याकरितां एक स्वतंत्र सरकारी खातें स्थापणें; ( ४ ) धर्मप्रचारक दूरदूर देशांस पाठवणें; ( ५ ) बुद्धसंप्रदायाचे धर्मग्रंथ निर्दोष व निश्चित स्वरूपांत तयार करणें. ' **बुद्ध** '—भगवान् बुद्ध क्रि. पू. सहाव्या शतकांत झाले. यांनीं वैदिक कर्मकांडप्रधान धर्मविरुद्ध व चातुर्वर्ण्यविरुद्ध चळवळ करून स्वतंत्र संप्रदाय स्थापला. या संप्रदायाची उभारणी अहिंसा, समता, आचारशुद्धि, इन्द्रियदमन, आणि चिन्तनसमाधि, या तत्त्वांवर झालेली होती. इ. स. दुसऱ्या शतकापर्यंत हा संप्रदाय स्वतंत्रपणें जोरांत होता. परंतु पुढें वैदिक धर्मानें अहिंसातत्त्व आत्मसात् केलें, वैदिक कर्मकांडाचें प्रस्थ कमी झालें, भगवान् बुद्धांचा भगवन्ताच्या दहा अवतारांत समावेश करण्यांत आला, आणि भक्तिप्रधान भागवत-संप्रदायानें उचल केली. यामुळें बुद्धसंप्रदाय हिंदुधर्मांत लय पावून त्याच्या स्वतंत्र अस्तित्वास नाट लागला ' **विक्रमादित्य** '—हा उज्ज-नीचा प्रभावशाली सम्राट् क्रि. पू. पहिल्या शतकांत झाला. वायव्ये-कडून हिंदुस्थानांत घुसून हुतुतू घालणाऱ्या अनार्य शक लोकांचा यानें पराजय करून त्यांस पिटाळून लाविलें, म्हणून हा ' शकारि ' या उप-पदानें प्रसिद्ध आहे. संवत् शक यानेंच क्रि. पू ५७ व्या वर्षीं चालू केला व तो अद्याप उत्तर हिंदुस्थानांत वहिवाटींत आहे.

१७ | ' **मध्ययुग** '—इ. स. पांचव्या शतकापासून ते दहाव्या शतका-पर्यंतच्या काळखंडाला ' मध्ययुग ' म्हणण्याचा हिंदुस्थानासंबंधें प्रघात आहे.

४४ | ११ | ' **सामुदायिक** '—व्यापक, ठोकळ.

पृष्ठ ओ.

४४ | १२ | 'पार्श्वभूमि'–मुख्य चित्राच्या आजूबाजूला व मागचा चितारलेला भाग. ( पुढें ओळ १४, 'पृष्ठभूमिका.' )

'ओढणी'–बुरखा.

४७ | १ | 'जोत्याजी केसकर'–हा कोल्हापूर प्रान्तातील पुंजाळ गांवचा पाटील, संभाजी राजांचा मोठा विश्वासू व एकनिष्ठ सेवक होता. संभाजींची पत्नी येसूबाई व मुलगा बालशिवाजी ( शाहु ) हीं, औरंगजेबाच्या कैदेंत असतांना, जोत्याजी त्यांच्या सोबत होता. याच्याच खटपटीनें औरंगजेबाच्या कैदेंतच शाहूचें लग्न झालें. राजारामाचा येसूबाईबरोबरचा पत्रव्यवहार ह्याच्याच मार्फत होत असे. पुढें शाहू मराठ्यांच्या सिंहासनावर आरूढ झाल्यावर त्यानें जोत्याजीला सरदेशमुखीच्या कारभारावर मुख्य अधिकारी केला.

४९ | १७ | 'नाक मुठींत धरणें'–प्राणायामाला तिरस्कारानें हा शब्दप्रयोग लाविला आहे.

५० | २ | 'अवयवभूत'–मोठ्या वस्तूच्या निरनिराळ्या अंगांच्या किंवा विभागांच्या रूपानें असणारीं, मोठ्या संघाच्या घटकव्यक्ती झालेलीं.

२० | 'उपाधि'–मर्यादा, अटक

२७ | 'शब्दच्छळ'–शाब्दिक कोट्या, सुका शब्दवाद.

५३ | ११ | 'आकर्षण व उत्सारण'–ओढणें व ढकलणें.

१७ | 'यदृच्छेनें'–सहजासहजीं, निर्हेतुक योगायोगानें.

५४ | २६ | विवाहविधींत वर, विवाहहोमातील अग्नि व वैदिक ब्राह्मण यांना साक्षी ठेवून, वधूला तिचा सर्व परींनीं सांभाळ करण्याचें वचन देतो.

५५ | १६ | 'शिष्टता'–बहुमान्यता, संभावितपणा.

५७ | २३ | भर्तृहरिश्लोकाचा मराठी अनुवाद–

ढळे स्वर्गांतून प्रथम शिवशीर्षी, मग पडे
हिमाद्रीचे शृंगीं, क्षितिवर पुढें, अम्बुधिकडे; ।
अशी खालीं खालीं गडगडत गंगा घडपडे,
विवेकभ्रष्टांचा शतमुख अधःपातचि घडे. ॥

६५ | ४ | 'रसिकोपजीवी'–काव्याचें खरें रहस्य सहृदय मनुष्यालाच समजतें. त्यामुळें रसिक वाचक मिळाला तरच काव्याचें चीज होतें; म्हणून काव्याला 'रसिकांवर जीवनासाठीं अवलंबून असणारें,' असें येथें म्हटलें आहे.

पृष्ठ ओ.

८ ‘ **मुक्तेश्वर** ’–हा कवि शहाजी महाराजांच्या वेळीं होऊन गेला. तेव्हां या उताऱ्यांत वर्णिलेली समाजस्थिति शहाजी व शिवाजी यांच्या काळची म्हणजे इ. स. सोळाव्या व सतराव्या शतकांतली आहे.

१२ ‘**तात्कालिक** ’–तात्पुरता, तेवढ्या वेळापुरता.

२१ ‘ **उद्रेक** ’—उभडा, उमाळा.

६६ १० ‘ **दिग्दर्शन** ’—दिशा दाखवणें, सुचवणें, सूचना.

१६ ‘ **निःस्पृह** ’–भीड न ठेवणारे, स्पष्टवक्ते.

६७ ८ ‘ **छळवाद** ’—शब्दांच्या कोट्या करून व दुराग्रह धरून वाद-विवाद करणें.

२१ ‘ **निसंग** ’—परिवाराशिवाय, सडा.

२९ ‘ **संताळें** ’–साधूंची टोळी.

६८ ६ ‘ **बोकेसंन्यासी** ’–महाभारतांत उद्योगपर्वांत एका बोक्याची गोष्ट आहे. हा बोका म्हातारा झाला होता व त्याला उंदीर पकडण्याची ताकद नव्हती. तेव्हां त्यानें उंदीरमंडळींत अशी भूमका पसरविली, कीं, आपण आतां संन्यास घेतला आहे आणि मांसाहार साफ सोडला आहे. याप्रमाणें कांहीं दिवस त्यानें स्वस्थ उपाशीं राहून काढले. तेव्हां उंदरांना त्याचा विश्वास आला व ते त्याच्या भजनीं लागले. पुढें त्या नादावलेल्या उंदरांनीं त्याला आपल्या पिलांच्या संरक्षणासाठीं आपल्या राहत्या ठिकाणींच प्रत्यक्ष आणून ठेवलें. ही संधी सांपडल्यावर मात्र बोक्यानें उंदरांच्या पिलांचा संहार चोरून करण्याला सुरवात केली. कांहीं दिवस हा चोरटा व्यवहार पचला, पण अखेर उघडकीस आला, आणि त्या बोक्याला यःपलायन करावें लागलें. तेव्हां ‘ बोके संन्यासी ’ म्हणजे लबाड संन्यासी.

२५ ‘ **घेंडा नाचविणें** ’–लग्नांत नवरानवरीची वरात वराच्या घरीं परत जाण्याच्या वेळीं गृहप्रवेश होत असतां वधूवरांना खांद्यावर घेऊन एक मनुष्य कांहीं वेळ नाचतो. त्याला ‘ घेंडा ’ असें म्हणतात.

२७ ‘ **कुश्चिताचारी** ’–कुत्सिताचारी, दुर्वर्तनी.

६९ १ ‘ **श्वशुरवर्ग**’–सासुरवाडची मंडळी.

२ ‘ **कुश्चिताचार परी** ’–दुर्वर्तनाचे प्रकार.

७ ‘ **स्थिरप्रकृति** ’–स्थितींत सहसा बदल न होऊं देणारा, धिम्मा.

२६ ‘ **अनियंत्रित व्यापार** ’—मालाच्या आयातीवर व निर्गतीवर कोणताही निर्बंध ज्या पद्धतींत ठेवण्यांत येत नाहीं, ती व्यापारपद्धति.

पृ. ओ.

७० १ ‘ साडलें ’— ‘ कुलडी ’—सुती व रेशमी तलम साड्या व चिरड्या.

२ ‘ शेलारा ’-नेसण्याचा उंची शेला. पांघरण्याच्या अशा उंची जरीकांठी वस्त्राला ‘ शेला ’ म्हणतात.

७० १२ ‘ **जितेंद्रिय** ’—ज्यानें इंद्रियांचा निग्रह करून त्यांना आपल्या स्वाधीन ठेवलें आहे. असा पुरुष. ‘ गोब्राह्मण ’—येथें ‘ गो ’ हा शब्द धर्मवाचक व ‘ ब्राह्मण ’ शब्द सज्जनवाचक समजावा.

७० १५ ‘ **अचाट** ’—पराक्रमाचीं व साहसाचीं.

७१ ६ ‘ **राक्षस** ’—दुराचारी, दुष्ट मनुष्य. ‘**परचक्र**’--परकी लोकांनीं केलेली स्वारी.

७ ‘ **अकबरी व अवरंगजेबी उपाय** ’—प्रतिस्पर्ध्याला बाहेरून विश्वास दाखवून, गुप्तरीतीनें त्याला विष घालून किंवा त्याच्यावर मारेकरी घालून त्यास दगाफटका करणें व अशा प्रकारें मार्गांतले कांटे काढून आपली सत्ता निर्भय करणें, या विश्वासघातकी उपायांचा अवलंब अवरंगजेब व अकबर यांनीं वारंवार केला होता. म्हणून मराठी बखरींत अशा दगाबाजीस ‘ मोंगलाई मसलत ’ हें नांव दिलेलें आढळतें.

२५ ‘ **उपपत्ति** ’--उलगडा, खुलासा, सयुक्तिक कार्यकारणसंबंध.

७२ १९ ‘ **स्निग्ध** ’—मऊ व गिलगिलीत.

२९ ‘ **वानप्रस्थाश्रम** ’—वैदिक धर्मांत पुरुषाच्या राहणीचे चार प्रकार गणलेले आहेत; यांना ‘ **आश्रम** ’ असें नांव आहे. ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थत्व, व संन्यास, हे चार आश्रम, व या आश्रमां-प्रमाणें राहणी ठेवणाऱ्या पुरुषाला अनुक्रमें ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, व संन्यासी, असें म्हणतात. ब्रह्मचाऱ्यानें अविवाहित राहून विद्यार्जन व भगवत्सेवा करावयाची असते. गृहस्थानें कुलाचार, धर्माचार, नीट संभाळून, अतिथिसत्कार, दानधर्म, इत्यादि यथायोग्य करून, संसारांत राहावें. वानप्रस्थानें सर्व लौकिकव्याप सोडून शान्त जागीं आत्मचिंतनांत काळ कंठावा. संन्याशानें सर्वसंगपरित्याग करून सदा फिरतें रहावें. त्यानें कोणत्याही प्रकारचा परिग्रह करूं नये, व कोणत्याही स्थळीं गुंतून राहूं नये. कोणत्याही मनुष्याला एकाच आश्रमांत सर्व आयुष्य कंठण्यास वास्तविक हरकत नाहीं, परंतु कायमचें ब्रह्मचर्य व संन्यास हीं संभाळण्याचें फार कठीण असल्यामुळें त्यांचा निषेधच आढळतो. सामान्यतः प्रत्येक पुरुषानें क्रमाक्रमानें हे सर्व आश्रम

पृष्ठ ओ.

भोगावे, असें सर्वमान्य मत आहे. पूर्ववयांत ब्रह्मचर्य, मध्यमवयांत गृहस्थपणा; आणि उतारवयांत प्रथम वानप्रस्थाश्रम स्वीकारून अखेर साधल्यास संन्यास घ्यावा; असा परिपाठ आढळतो.

७४ २७ ' **भुमेरजवाडे** ' -स्थानिक राजपूत.

७५ ८ ' **रोमहर्षण** ' केसासही इजा; यत्किंचित् वांकडें.

७५ ९ ' **मोंगलाई मसलत** '—पृ. ७१, पं. ७, टिप्पणी पहा.

१५ ' **साहित्य** '-मदत, साह्य.

२७ ' **खिजमतगार** '—हुजऱ्या. सेवक. '**हांडीबासन**'-भांडकुंडीं

२८ ' **अबदागिऱ्या** '—छत्रधार.

७६ १ ' **नळ** '—हा राजा फार पुण्यशील होता. परंतु दमयन्तीनें आपल्यास न वरतां, नळराजास वरलें, म्हणून इंद्रादि देव त्याचे शत्रु झाले आणि त्यांनीं नळास छळण्याकरितां कलीला चिथावून व वचनबद्ध करून पाठविलें. हा कली बैलाच्या रूपानें नळाच्या दाराशीं त्याच्यावर आपला पगडा बसविण्याची संधी पहात बरेच वर्षे तिष्ठत राहिला होता

७ ' **ससेहोलपट** '—सशाच्या शिकारींत शिकारीलोक त्याचा पाठलाग करतात व लांकडाचे होलपाट त्याच्यावर फेंकतात.

१३ ' **मुरगी** '—कोंबडी.

१४ ' **बचडें** '—( कोंबडीचें ) पिलूं.

२५ ' **शिलेजोरांनिशीं** '—हत्यारांपात्यारांसह.

२७ ' **बहुत करून** '—पुष्कळ. ' **मोर्चा** '—तोफा उंचावर मांडण्याकरितां रचलेला ओटा, धमामा, २ पहारा, चौकी, ३ तोफखान्याचें तोंड.

७७ ६ ' **लौकिक** '— लोकांच्या व्यवहारांत असलेला.

२१ ' **संभावित** '—सुशिक्षित व सभ्य, शहाणेसुते.

७८ १२ ' **शल्य** '—खुपणारी गोष्ट, टोंचणारा विचार.

१९ ' **येरझार** '—जा—ये, जन्ममरणाच्या खेपा

२६ ' **अप्रतिहत** '—अलोट, ज्याचा प्रतिकार करतां येत नाहीं असें.

२९ ' **शास्ता** '-नियन्ता, सत्ता चालविणारा.

७९ २ ' **गोचर** '—दृश्य आढळणारें. ' **सात्त्विक** '—प्रेमळ व निर्मळ.

२२ ' **गांठ मनांत बांधणें** '—निश्चयानें समजणें, गृहीत धरणें.

२९ ' **व्यवहारत** '—व्यवहार करीत, वागत, वर्तत.

८० ८ ' **अनासक्ति** '—विरक्ति, उदासीनता.

| पृष्ठ | ओ. | |
|---|---|---|
| | ९ | ' **निर्वेद** '—दुःख, कष्ट. |
| ८२ | २ | ' **कुरठा** '—आंतल्या आंत जळणारा, आंतल्या गाठीचा, डुक्या. |
| | २५ | ' **अनन्वित** ' ज्याची संगति लावतां येत नाहीं असें; जें सांगतां-वर्णन करतां-येत नाहीं असें, विलक्षण, भयंकर. |
| ८३ | १२ | ' **स्थिरस्थावर** '—शान्त. |
| ८३ | १६ | ' **आक्रसतळी** '—अकरतळी, हटवादीपणानें कज्जे करणारी, भांडकुदळ, कांगावखोर. पुढें पृ. ८४, पं. ७ मध्यें या शब्दाचें 'आक्रस्ताळी' असें रूप आलें आहे. |
| | २८ | ' **डाळ शिजणें** '—मात्रा चालणें, नखी रुपणें, प्रयत्नाला यश येणें. |
| ८४ | १ | ' **पाणउतारा** '—पाणी-वजन किंवा मात्रा—कमी करणें, उपमर्द; अपमान. |
| ८५ | ४ | ' **शम** '—मनाचा निग्रह, शान्ति. ' **दम** '—इंद्रियांचा आवर. ' **तितिक्षा** '--सहनशीलता, क्षमाशीलपणा. ' **मुमुक्षुत्व** '—जन्ममरणाच्या फेऱ्यापासून मुक्त होण्याची इच्छा. |
| | १४ | ' **उदित** '—प्रकट, उदय पावलेला. ' **तादृश** '—तेवढासुद्धां, म्हणण्यासारखा, विशेषसा. |
| ८७ | १९ | ' **सांकर्य** '—सळमेसळ, सावळा गोंधळ, घोंटाळा. |
| | २० | ' **नियत** '—निश्चित, ठरावीक. |
| | २२ | ' **समाहित** '—समाधानयुक्त, संतुष्ट. |
| | २२ | ' **ठगे** ' ठकवला जातो. |
| ८८ | | |
| ८९ | १२ | ' **साधनक्रम** '—इष्ट हेतु साध्य करून घेण्याकरितां पायरीपायरीनें करण्यांत आलेले प्रयत्न. |
| | १७ | ' **एकरस** '—एकरूप, तन्मय. |
| ९२ | ३ | ' **घटना** '—घडून येणाऱ्या गोष्टी, प्रसंग. |
| | २९ | ' **बर्क** '—( इ. स. १७२९-१७९७ ) इंग्लंडांतील एक तत्त्वज्ञ व मुत्सद्दी. हा उदार मताचा होता व प्रजेच्या मागण्यांला याचा नेहमीं पाठिंबा असे. हिंदुस्थानांत वारन् हेस्टिंग्जनें अन्यायाचीं व जुलमाचीं कृत्यें केल्याबद्दल त्याची जी पार्लमेंटपुढें चौकशी झाली; तींत यानेंच पुढाकार घेतला होता. तो जरी प्रजासत्तावादी होता तरी जेव्हां फ्रान्समध्यें इ. स. १७८९ सालीं राज्यक्रान्ति होऊन सामान्य प्रजाजनांनीं हुल्लड करून अघोर अत्याचार केले, तेव्हां त्या अनन्वित कृत्यांचा निषेध करण्यांत बर्कनें प्रमुखत्वानें भाग घेतला. |

' **रूसो** '–( इ. स. १७१२-७८ ) फ्रान्सदेशांतील एक तात्त्विक ग्रंथकार. याच्या तत्त्वविचाराची मदार वस्तुज्ञानापेक्षां कल्पनेवर जास्त होती. म्हणून त्याच्या तत्त्वज्ञानाचा डोल्हारा बराचसा पोकळ व फोल होता. परंतु त्याची लेखनपद्धति फारच साधी, वेंचक, व मोहक, होती आणि तिची छाप वाचकांवर तत्काळ बसे.

'**लॉर्ड मोर्ले**'–(इ. स. १८३८-१९२२) इंग्लंडांतील एक उदारमताचा मुत्सद्दी व उत्तम चरित्रकार, निबंधलेखक, व वाङ्मयविशारद. मोर्लेसाहेबांनीं लिहिलेलीं बर्क, रूसो, कॉब्डेन, वालपोल, क्रॉमवेल, व ग्लॅड्स्टन, यांचीं चरित्रें सुप्रसिद्ध आहेत. त्यांचे वाङ्मयावरील लेख अत्यंत मोहक व महत्त्वाचे आहेत. हे इ० स० १९०५ सालीं हिंदुस्तानचे स्टेट सेक्रेटरी ( भारतमंत्री ) झाले. यांच्याच अमदानींत १९१० चा ' मोर्लेमिंटो योजना ' या नांवानें लोकविख्यात झालेला हिंदुस्तानच्या राज्यकारभारांतील सुधारणांचा कायदा मंजूर करण्यांत आला. १९१४-१८ या काळांत जें युरोपांत भयंकर युद्ध झालें त्यांत इंग्लंडनें पडूं नये असें यांचें मत होतें. परंतु इंग्लंडला परिस्थितीच्या ओघानें त्या युद्धांत गुंतावें लागलें, व मोर्लेसाहेबांनीं आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

REFBK-0003023

मराठी ग्रंथ
3023
ग्रं. क्र.